laws by the said bleeding to which India is subjected that is destroying".[25] He analysed that the drain was the principal and even the sole cause of India's poverty. In the forty-three years from April 1862 to March 1905, the excess of exports of merchandise over imports was Rs. 1,288.23 crores. The annual average of the excess of exports can be said to have been Rs. 29.3 crores during those years. Against this India imported gold and silver worth Rs. 508.81 crores. The remainder, Rs. 780.42 crores, was used for the discharge of the country's obligations arising from her political and economic connections with Great Britain. It was regarded as "unrequired" exports.[26] Dadabhai Naoroji and Romesh Chandra Dutt called such payment the "tribute" extracted by England from India. According to them this "annual drain of wealth from India" was responsible for increasing impoverishment of India.[27] Dadabhai Naoroji, R.C. Dutt and S.N. Banerjee pointed out the harmful effects on employment and income within the country, as the spending abroad of certain portion of national income caused not only that much loss of income, but also further loss of employment and income that would have been generated in the country, had the amount, instead of being drained out, been spent internally. R.C. Dutt explained it thus: "For when taxes are raised and spent in a country, the money circulates among the people, fructifies trade, industries and agriculture, and in one shape or another reaches the mass of the people. But when the taxes in a country are remitted out of it, the money is lost to the country forever, it does not stimulate her trade or industries or reach the people in any form."[28] Dadabhai's analysis chiefly emphasised the aspect of the drain that it resulted in the depletion of productive capital. Not only that he wanted to prevent such depletion of capital, but he also invited British capital for the development of the resources of India. He said, ".... it is English capital that she (India) needs, not the English invasion to come also and eat up both capital and produce". He wanted the State to undertake all those great undertakings which India herself was unable to carry out. He insisted that such undertakings though

undertaken by the State must be carried out chiefly by native agency and by preparing Natives for the purpose. The drain theory, developed and crystallised, brought about remarkable change in the attitude of Dadabhai towards the British Government in course of time. In 1867, he said that under the British rule India was 'being continuously bled.'[29] In 1901, he criticised the 'unnatural' policy of British rule of ignoring India's interests. In 1904, he condemned the British rule as barbaric and in 1906, he advised his country and countrymen to 'achieve Self-Government, so that the millions now perishing by poverty, famine and plague and the scores of millions that are starving on scanty substance may be saved, and India may once more occupy her proud position of yore among the greatest and civilised nations of the world."[30] According to Dadabhai, under British rule, "the drain was a part of the existing system of Government and was therefore ceaseless and continuous, increasing from year to year. The wounds kept perpetually open and the drain was like a running sore. The former rulers of India were like "butchers" chopping irregular here and there but the mechanised efficiency of England was cutting the very heart of the country almost with sharp surgical knives."[31]

**Drain as a Cause of the Small Accumulation of Capital in India**

G.V. Joshi, agreeing with the view that drain caused a loss of capital, showed deep insight in pointing out that drain should be regarded not as a proportion of the annual gross national product but as a proportion of the annual net potential surplus or saving. He held that as drain did not bring any economic return, it accounted for small accumulation of capital in the country.[32] He wrote : "No nation can stand such a drain and yet hold its own in the industrial field."[33] Some other leaders also agreed with him in viewing that drain had its impact which retarded or arrested industrial development. Even the impoverishment of peasantry was causally attributed to drain by R.C. Dutt.

His argument was based on the fact that the drain was mainly paid out of the land revenue.[34]

**Drain Worsened India's Terms of Trade**

In addition to the direct primary loss caused by the drain of unilateral transfer of wealth without any quid pro quo, several nationalist leaders also emphasised the indirect secondary loss resulting from the worsening of India's terms of trade. India's exports had to be pushed up at any price in order to create the required surplus of exports.[35]

The net annual export surplus of India between 1835 and 1871 was £ 4.1 million,[36] which rose to £ 21 millions or Rs. 21.03 crores,[37] in 1871-72 falling thereafter to remain around Rs. 16 to 18 crores till 1890-91. After that it again rose to Rs. 27.3 crores in 1891-92, Rs. 30.28 crores in 1892-93 and Rs. 34 crores in 1894-95 and £ 24.9 million or Rs. 37 crores in 1903-04. It is worth mentioning here that the "Home Charges" had gone up in the same way over the period from 1884-85 to 1904-05 as £ 11.4 millions in 1884-85, £ 14.8 millions in 1888-89, £ 17.4 millions in 1901-02 and £ 19.4 millions in 1904-05. It may be noted here that according to a Minute of Sir Richard Temple dated 14th Sept. 1872, the value of merchandise exported from England was £ 1012 millions and of the imports was £ 583 millions which left a balance of £ 429 millions. Out of this the net receipt of treasure by India during the period was £ 275 millions. That left a balance of £ 154 millions, which divided by 37 gave the annual average of £ 4.1 millions. In his "Poverty and Un-British Rule" Dadabhai Naoroji arrived at a figure of £ 5.25 million per annum for this period after taking into consideration the profits on trade and the net opium revenue not accounted for in the trade returns. (Pp. 33-34). It may also be noted that export surplus of Rs. 21.03 crores was approximately £ 21 millions at the then rupee sterling rate of exchange of Rs. 10 = £ 1.

## M.G.. Ranade's View Examined

Even such a stalwart thinker, a scientific pioneer, and a first Indian economist who laid down the conditions of economic progress of India and showed the whole range of possible policy to achieve the economic progress,[37] at one time supported the view of protagonists of Britain like Theodore Morrison,[38] and Vera Anstey[39] that the annual payment on account of the export surplus, called as 'a heavy tribute, represented interest charges and dividends on the capital that British invested in this country. Addressing the Industrial Conference Ranade said, 'There are people who think that as long we have a heavy tribute to pay to England which takes away nearly 20 crores of exports, we are doomed and can do nothing to help ourselves. This is however hardly a fair or manly position to take up."[40] Opinions of some eminent Englishmen have already been cited above and there were numerous other Englishmen, official and non-official who took a contrary stand on the subject. The Financial Statement Resolution No. 1911, dated 18th March 1878, para 52 also said that India's being compelled to send to Europe every year about 20 million sterling worth of her products without receiving in return a direct commercial equivalent, was described as tribute and it caused the trade of India to be in abnormal position, preventing her from receiving in the shape of imported merchandise and treasure the full commercial benefit which otherwise would spring from her vast material resources.[41] Ramsay MacDonald described these charges as 'dear charges' and emphasised the double seriousness of such dead charges under foreign government. In the first place they were withdrawn from Indian production and secondly they were withdrawn from India itself.[42] He further pointed out that the heavy exported tribute adversely affects widespread growth of prosperity. A well-known American writer, Leyland Jenks also criticised the burdens of expenditure charged to the account of the unrepresented ryot. These preposterously burdensome expenditures included the cost of the Mutiny (1857), the price of the transfer of the Company's rights to the Crown,

the expenses of simultaneous wars against China and Abyssinia, every governmental item in London, the remotely related to India down to the fees of the charwoman in India House and expenses of ships that sailed but did not participate in hostilities and the cost of Indian regiments for six months training at home before they sailed.[43] He had said elsewhere, "The Company treated its domain as an oriental despot, his estate to be exploited not improved, an important economic difference being that the European landlord was an absentee."[44] These contrary views of English and American Writers are mentioned here in juxtaposition to bring home to the readers, the limitations of Ranade's view. Ranade did not attribute the poverty of India to the economic drain of the country. Ranade's attitude as distinguished from that of Dadabhai will be clear from his following words, "So far from complaining, we have reason to be thankful that we have a creditor who supplies our needs at such a low rate of interest."[45] This view may be contrasted with the following view of Dadabhai Naoroji, "...... the material destruction and impoverishment of India .... was mainly caused by the unnatural treatment it received at the hands of its British rulers, in the way of subjecting it to a large variety of expenditure upon a (financially) crushing foreign agency both in India and England, whereby the children of the country were displaced and deprived of their natural rights and means of subsistence."[46] Even Gokhale held the view that British rule had produced disastrous results in that insufficient attention had been paid to raising living standards of the people to 'the growing military expenditure' and 'the increasing Home Charges'[47]. Hence the Theory of Economic Drain as propounded by Dadabhai Naoroji was more appealing and inspiring to the Indian nationalist mind. It is true that Ranade was the first economist who laid down the conditions of economic progress for India and showed a whole range of possible policy to achieve the Indian economic progress. Ranade is undoubtedly to be regarded as founder of modern Indian economics with all its interest in problems of economic development. He emphasised the importance of the growth of Indian manufacturers and commerce. He advised them to

learn by organized co-operation to compete with the foreigner According to him the poverty of India was mainly because of the dependence of the majority of the people of India on agriculture. But, unlike Dadabhai, he could not see that the policy of the British rulers and the economic drain was responsible for de-industrialisation, thwarting of the process of capital accumulation, stagnation of Indian economy and industrial retardation. Nevertheless he called upon the government to encourage and develop industries in India and also criticised it for its lack of initiative in this connection.

**Indian Nationalists Criticised Expenditure**

The theory of drain explained how the expenditure policy of the Government of India resulted in huge annual drain of resources from India into England and impoverished the Indian people. So most of the Indian nationalist leaders like Dadabhai Naoroji, M.G. Ranade, R.C. Dutt, G.K. Gokhale, G.V. Joshi, and others like William Digby criticised the Government of India's expenditure policy adopted after the conquest of India and especially after 1850 onwards. They criticised the heavy expenditure incurred by the Government of India on defence, on payment of high salaries and pensions to the British personnel in the civil service and the Indian army etc. Ranade criticised the railway policy of Government of India because Railways had made competition with Europe more hopeless over large areas and facilitated the conveyance of foreign goods. They criticised expenditure on railway construction designed mainly from the defence point of view, neglecting expenditure on irrigational projects. Dadabhai Naoroji had made strenuous effort in the House of Commons in favour of financial reforms in India. Hence Royal Commission was appointed in 1895, under the chairmanship of Lord Welby, "to inquire into the administration and the management of the military and civil expenditure, and the apportionment of charges between the Government of the United Kingdom and the Government of India". Dadabhai was a member of the Commission. Gokhale was extremely critical of the huge expenditures on

fighting imperial wars and that interests of the United Kingdom occupied the top priority in the enormous expenditure incurred annually by Government of India.

**Foreign Trade Thwarting Economic Development**

The nature and composition of exports, the annual drain of wealth and the free trade policy thwarted the economic development of India, instead of promoting it, for want of capital formation, technical change and reallocation of resources. The rate of capital formation was kept down as a result of the increasing annual "drain". The concentration of agricultural products in the export trade prevented allocation of labour and capital. Under such circumstances, less rather than more trade might have proved beneficial for the country's economic development.

**Conclusion**

The theory of 'economic drain' and 'bleeding' propounded by Dadabhai Naoroji, had laid the foundations and provided the philosophy and precepts that were necessary for the new awakening in political sentiment and economic enterprise. Eminent writers like Naoroji, Dutt and William Digby and so many other English administrators, thinkers and American writers presented a huge collection of facts and pieces of information regarding British exploitation, and increasing annual drain of wealth from India into England. The economic drain has been the main cause of poverty in India. Low rate of accumulation of capital in India, de-industrialisation, worsening of terms of trade, foreign trade not being helpful to economic development have all been the harmful consequences of the Economic Drain. The nationalist demands for Indianisation of civil and military services, for reduction of the Home Charges for expectation that England should shoulder large part of the Home Charges, for reduction of interest and capital payments in India's public debt held in England, for purchasing government stores in India itself, for checking the increasing import of private foreign capital or at least invasion of foreign capitalists

etc. were all prompted and inspired by understanding of the Theory of Economic Drain.

## REFERENCES


1. Quoted in Dutt R. Palme 'India To-day People's Publishing House Ltd., 1949, P. 94.
2. Report of the East India Company for 1812, quoted in Parshad, "Some Aspects of India's Foreign Trade" P. 49.
3. Mahajan Vidya Dhar, 'Leaders of the Nationalist Movement' Sterling Publisher Pvt. Ltd., New Delhi, 1975. P. 46.
4. Dadabhai Naoroji Essays, P. 50.
5. Ibid. P. 115.
6. Naoroji Dadabhai, Poverty P. 566.
7. Ibid. P. 667.
8. Joshi, G.V., Speeches and Writings PP. 639-43.
9. Congress Presidential Addresses PP. 604, 606.
10. Ibid. P 709.
11. Dutt R.C. Economic History of India Vol. II. PP. 21, 48, 85.
12. Montgomery Martin's Eastern India, London, 1838. Introductions to Vols. I and III quoted in Dutt, Romesh, The Economic History of India under Early British Rule, Fifth Edition, London, Kegan Paul, Trench, Truber & Co. Ltd., PP. 409-410.
13. Honourable F.J. Shore's Notes on Indian Affairs London 1837, Vol. ii. P. 516. quoted in Ibid. P. 411
14. Ibid. P. 28 quoted in Ibid. P. 412.
15. Minutes of Evidence taken before the select committee, 1832, Vol. i, PP. 65 and 66, quoted in Ibid. P. 412.
16. Third Report of the Select Committee, 1853, PP. 19 and 20. quoted in Ibid. PP. 412-413.
17. Holt Mackenzie's Minute, dated 1st October 1830, Para 67. quoted in Ibid. PP. 414.
18. Minute of Evidence taken before the Select Committee, 8C. 1832. Vol vi. PP. 30 and 31.
19. Dutt Romesh, Op. Cit. P 417.
20. Major Wingate, Our Financial Relations with India, London, 1859, quoted in Ibid. pp. 418-20.
21. Brooks Adams, "The Law of Civilisation and Decay". P. 259-60.
22. Dutt Romesh, Op. Cit. Preface, PP. xi-xii
23. Knowles L.C.A. "Economic Development of the Overseas Empire"
24. Porter, "Progress of the Nation, 1847, P. 750.
25. Naoroji D. Poverty., P. 216.
26. Tara Chand, History of the Freedom Movement in India, Volume Two, Publications Division, Government of India, 1974, P. 316.
27. Naoroji Dadabhai, "Poverty and Un-British Rule (London 1901), PP. 33-36. Dutt Romesh, "The Economic History of India in the Victorian Age, (1906 Edition) PP. 126-127 et passim.

28. Dutt R.C. Speeches Vol. II Page XIV
29. Naoroji Dadabhai, Essays, Speeches, etc. edited by C.L. Parekh, P. 31. (A paper read before the East India Association, London, in 1867, on 'Englands Duties to India .
30. Naoroji Dadabhai, Speeches and Writings, P. 250. Congress Presidential Address, Calcutta 1906.
31. Mahajan Vidya Dhar, Leaders of The Nationalist Movement, P. 47
32. Joshi G.V. Op. Cit. P 683.
33. Ibid. 641.
34. Dutt R.C. Op. Cit. Vol. II. P. XIV and PP. 372-373.
35. Joshi G.V. Op. Cit. P. 641.
36. Moral and Material Progress Report 1872-73, P 107 quoted in Tara Chand History of Freedom Movement in India, Volume Two P. 317.
37. Mahajan Vidya Dhar, Op. Cit. P. 66.
38. Morrison Theodore, The Economic Transition in India, Chapter VIII
39. Anstey Vera, Economic Development of India, Appendix G.
40. Ranade M.G., Essays on Indian Economics, (1906) quoted in Tara Chand Op. Cit. P 317.
41. Quoted in Tara Chand, Op. Cit. P 318.
42. Mac Donald Ramsay, "The Government of India, P. 148."
43. Jenks L.H. 'Migration of British Capital" 1875, PP. 323-34.
44. Ibid. P. 209.
45. Quoted in Mahajan Vidya Dhar, Op. Cit. P. 66.
46. Naoroji Dadabhai, Poverty and Un-British Rule (London Swan Sonnenschein & Co., 1901) quoted in Appendix A. 'Indian Political Thinking in the Twentieth century from Naoroji to Nehru, Oxford University Press, 1971, P.2.
47. Gokhale, Speeches of Gopal Krishna Gokhale, 3rd Edition, (Madras, G.A. Natesan & Co., 1920) quoted in Ibid. P. 2.

**Mr. L.B. Kurkure**
Vidyawardhini Sabhas
Arts and Commerce
College, DHULE.

•

# राष्ट्रीय चळवळ व भारतीय आर्थिक राष्ट्रवादाची जडण-घडण

व. गो. बोकरे

भारतीय राष्ट्रीय चळवळ हा आपला एक अमोल राष्ट्रीय ठेवा आहे. दोन-अडिचशे वर्षांच्या या स्वातंत्र्यपूर्व कालखंडात भारतीय जीवनाशी संबंधित अशा बहुतेक सर्वच विषयांचा सखोल उहापोह झालेला आहे. जुन्या-नव्या दृष्टिकोणातून जीवनाशी संबंधित अशा सर्व प्रमुख प्रश्नांचे विश्लेषण व मांडणी झाली आहे; पाश्चात्त्य तसेच पौर्वात्त्य, विशेषतः भारतीय, शास्त्रे व ज्ञान यांचा अभ्यास झाला आहे. विचार व कृति यांनी परिपूर्ण असा हा ज्ञाननिष्ठ व जनहितदक्ष, त्यागी नेतृत्वाचा कालखंड आहे. परंतु अत्यंत महत्त्वाची बाब म्हणजे या राष्ट्रीय आंदोलनात हिंदुस्थानाच्या आर्थिक प्रश्नाचे, हिन्दी जनतेच्या दैन्य-दारिद्र्याचे सतत व सर्वकाळ भान होते. किंबहुना, हिन्दी दारिद्र्याची आर्थिक चिकित्सा, आर्थिक आधुनिकीकरण, अर्थव्यवस्थेची पुनर्रचना, औद्योगिकरण, राष्ट्रीय उत्पन्नाचे मोजमाप व तुलना, भांडवल-संचय व आर्थिक विकास यांतील सहसंबंध, संचयातील विविध अडचणी, शेती व ग्रामीण जीवनाची आर्थिक चिकित्सा, शेतीतील अर्थ-संबंधांची पुनर्रचना, शेतसारा, रेल्वे की पाटबंधारे? हिन्दी अर्थव्यवस्थेचे औद्योगिक साम्राज्यशाहीकडून शोषण, अंतर्गत व बहिर्गत निस्सारण, " दोन देश " — ग्रामीण व शहरी भारत, स्वदेशी, बहिष्कार, आर्थिक स्वावलंबन, खादी, आर्थिक स्वातंत्र्य इ. हिन्दी आर्थिक जीवनाशी संबंधित प्रश्नांची चिकित्सा, वादविवाद धोरण - दिग्दर्शन वा कार्यक्रम बांधणी या स्वरूपात राष्ट्रीय चळवळीतून भारतीय आर्थिक राष्ट्रवाद प्रवर्तित होत होता. उदाहरणार्थ, भारतीय राष्ट्र सभेच्या १८८६ मधील दुसऱ्या अधिवेशनातील अध्यक्षीय भाषणातून दादाभाई नवरोजी यांनी हिन्दी जीवनातील या प्रमुख प्रश्नासंबंधीची राष्ट्रीय जाणीव पुढील शब्दात व्यक्त केली : " भारतीयांना नोकऱ्यांमध्ये प्रवेश मिळावा म्हणून आम्ही जेव्हा संघर्ष करतो, तेव्हा प्रायः असे मानले जाते की चार सुशिक्षितांच्या आकांक्षा पूर्ण करण्यासाठीच आम्ही तसे करतो. परंतु तुम्ही जर हा प्रश्न बारकाईने अभ्यासला तर तुम्हाला असे आढळेल की हिन्दी जनतेच्या दारिद्र्याचा प्रश्न बऱ्याच मोठ्या प्रमाणात सोडविण्यासाठी या सनदी नोकऱ्यांचा उपयोग होणार आहे. " याच भाषणात दादाभाई पुढे म्हणतात : " हिंदुस्थानची श्रीमंती व संपत्ती यासंबंधी दुर्दैवाने भ्रामक कल्पना आहे. जर आमची प्रतिनिधित्वाची मागणी

मान्य झाली, तर हिन्दुस्थानची संपत्ती व वैभव कोणत्या कारणांमुळे लयाला जात आहे, व मोठ्यात मोठा जो कलंक हिन्दी जनतेचे दारिद्र्य, तो धुऊन काढण्यासाठी कोणती उपाययोजना करावयास पाहिजे हे आमचे प्रतिनिधी कौन्सिलांना व सरकारला स्पष्ट करून देतील." पुढे प्रत्येक वार्षिक अधिवेशनात दारिद्र्याचा प्रश्न चर्चेला येणे चालूच राहिले. असे नोंदवून व राष्ट्रीय आंदोलनाचा एकूण आढावा घेऊन ताराचंद म्हणतात: " ब्रिटिश सत्तेला विरोध निर्माण होण्यास अनेक गोष्टी कारणीभूत झाल्या असल्यातरी, आर्थिक दैन्य व असंतोष ही त्यातील सर्वात महत्त्वाची बाब होती.... हिन्दी समाजावरील इंग्रजी आघातामुळे जो हिन्दी राष्ट्रवाद निर्माण झाला त्या राष्ट्रवादात हिन्दी जनतेच्या दारिद्र्याने गतिमानता व आग्रहीपणा आणला "

या विचार व कृतीने भरगच्च अशा प्रदीर्घ राष्ट्रीय चळवळीच्या कालखंडाचा मागोवा पुढील प्रकारे घेऊन भारतीय आर्थिक राष्ट्रवादाचा विकास व स्वरूप स्पष्ट होऊ शकते :—

(अ) इंग्रजी आक्रमणाचे स्वरूप व वेगळेपणा

(ब) इंग्रजी आक्रमणाच्या वेगळेपणाची कारणे

(क) इंग्रजी शिक्षणाचा प्रसार व परिणाम

(ड) ईस्ट इंडिया कंपनीमागील " व्यापारवादाचे " आर्थिक तत्त्वज्ञान

(इ) हिन्दी-नेतृत्वाची पहिली पिढी, भारतीय राष्ट्रसभेची स्थापना.

(फ) राष्ट्रसभेच्या पहिल्या पर्वातील घटनात्मक आंदोलन — इंग्लंडमधील उदारमतवाद (उदारमतवादी साम्राज्यवाद) व येथील घटनात्मक आंदोलन यातील सहसंबंध

(ग) इंग्लंडचा आक्रमक साम्राज्यवाद व येथील जहाल राजकारण (स्वदेशी, बहिष्कार) यांचा परस्पर संबंध

(ह) साम्राज्यवादाची अर्थशास्त्रीय मिमांसा व राष्ट्रीय आंदोलनातील खादी, ग्रामोद्योग, असहकार, इ.

(ई) आर्थिक राष्ट्रवाद व स्वातंत्र्योत्तर आर्थिक विकासाचा राष्ट्रीय कार्यक्रम

वरील सर्वच बाबींचे सविस्तर परिक्षण व स्पष्टीकरण करणे या लेखाच्या मर्यादा लक्षात घेता शक्य नाही. मात्र या आराखड्याचा संदर्भ मनात ठेवूनच मांडणी करण्याचा प्रयत्न करता येईल.

## [ १ ]

१७५७ ते १८३७ या काळात भक्कम पायावर हिन्दुस्थानात स्थिर झालेले इंग्रजी राज्य परकीय आक्रमणांच्या मालीकेतील परंपरागत स्वरूपाचे आक्रमण नव्हते. इंग्रजी आक्रमण व त्यापूर्वीची हिन्दुस्थानवरील परकीय आक्रमणे यांमध्ये गुणात्मक फरक आहे. दादाभाई नवरोजी यांनी हा फरक स्पष्ट करताना म्हटले की " आक्रमकांच्या टोळ्यांनी इथे यावे, संपत्तीची लूट घेऊन निघून जावे; शिवाय अशा प्रत्येकी दोन आक्रमणांमध्ये असा दीर्घ कालावधी की झालेली हानि भरून निघावी व जनजीवन पुन्हा स्थिर व्हावे. परंतु इंग्रजी आक्रमणात असा तुटकपणा नाही; अखंड लूट व संपत्तीच्या कायम दोहनाची एक व्यवस्थाच ह्या नवीन आक्रमणात आहे. "

इंग्रजी आक्रमण यशस्वी होण्यात वैयक्तिक शौर्यापेक्षा राष्ट्रीय चारित्र्याला, सामुदायिक शिस्त, आधुनिक शस्त्र व शास्त्र यांना जास्त महत्त्व होते. एका प्रगत व्यावसायिक व् विज्ञानप्रधान व्यवस्थेचे जुन्या मध्ययुगीन व्यवस्थेवरील ते आक्रमण होते. वासुदेवशास्त्री खरे ' मातीचे भांडे व लोखंडाचे भांडे ' अशा शब्दांत हा फरक स्पष्ट करतात. ते म्हणतात " हिन्दुस्थान जर इंग्रजांनी घेतले नसते तर फ्रेंचांनी घेतले असतेच. प्रवाहात पडलेली भांडी एकमेकांवर आदळली असता त्यातले कोणते फुटायचे, मातीचे की लोखंडाचे, हे ठरलेलेच आहे. " फंदफितुरीचे कारण देऊन हा गुणात्मक फरक दुर्लक्षित करता येत नाही. व्यापारी, भट-भिक्षुक व इतर सामान्यजन यांच्याशी संबंधित फितुरीची कारणे आपल्या तत्कालीन समाजव्यवस्थेत व राज्यकर्त्यांच्या नादानपणातच शोधावी लागतील, विज्ञानप्रधान व्यवस्थेत संस्थात्मक जीवन उदयाला येते. सामाजिक व राजकीय निर्णय बैयक्तिक लहरीवरून न ठरता माहिती व चर्चेच्या पद्धतीने घेतले जातात. लेखीपद्धती, व्यवस्थितपणा व नियमबद्धता यांना महत्त्व प्राप्त होते. इंग्रजी राज्यव्यवस्था संस्थाप्रधान होती. मोगल, मराठा, शीख इ. राज्यव्यवस्था व्यक्तिप्रधान होत्या. संस्थात्मक राज्यव्यवस्था ' लोखंडाच्या भांड्या 'प्रमाणे यशस्वी ठरली.

इंग्रजी आक्रमणाच्या या गुणात्मक वेगळेपणाचा प्रत्यय १८५७ मध्ये पुन्हा एकदा आला. परकीय सत्तेला घालवून लावण्यासाठी झालेल्या या हिन्दी प्रयत्नाचे स्वरूप फार व्यापक होते, पण ताराचंद म्हणतात की त्याचे अपयश ठरलेलेच होते कारण " या प्रयत्नाची प्रेरणा च नकारात्मक होती. अधिक चांगली सामाजिक व्यवस्था अथवा उच्चतर राज्यपद्धती निर्माण करण्याची दृष्टी या प्रयत्नात नव्हती .... संघटन, नियोजन व अर्थप्रबंधन यांची उणीव होती. शत्रूच्या राजकीय संघटनेची समज नव्हती. व्यक्तींना मारून व्यवस्था नष्ट करता येत नसते याचे भान नव्हते. ... शत्रूपक्षाचे युद्धतंत्र विज्ञानावर आधारित होते. शत्रूच्या फौजांचे नियंत्रण संघटीत सरकारकडून होत होते व हिन्दुस्थानातील या सरकारच्यामागे ब्रिटिश सरकार आपल्या प्रचंड साधन-बळासहित उभे होते. आणि समुद्रमार्गे हे साधन - बळ पाठविण्याची जोपर्यंत व्यवस्था होऊ शकत होती तोपर्यंत हिन्दुस्थानातील ब्रिटिशांच्या सत्तेला येथील वादळांपासून भीती नव्हती. गमावलेले वैभव पुन्हा आणण्याचा १८५७ चे स्वातंत्र्य समर हा शेवटचा प्रयत्न होता. "

इंग्रजी आक्रमणापूर्वी युरोपातील काही शहरांबरोबर हिन्दुस्थानचे व्यापारी संबंध असल्याची इतिहासात नोंद आढळते. परंतु या देशाची संपूर्ण अर्थव्यवस्था जागतिक अर्थव्यवस्थेशी जोडण्याचे काम इंग्रजी आक्रमणामुळे हिन्दुस्थानच्या इतिहासात प्रथमच घडले. परंतु या जागतिक संपर्काचा फायदा हिन्दुस्थानला न मिळता इंग्लंडची अर्थव्यवस्था विकसित करण्याचे एक साधन असे वसाहतीचे आर्थिक उप'व्यवस्थेचे स्वरुप हिन्दुस्थानला आले. ' इंग्रजी राज्य ही अप्रत्यक्ष क्रान्ती होती ' असे म्हणून कार्लमार्क्सने इंग्रजी आक्रमणाचे गुणात्मक वेगळेपण फारपूर्वीच स्पष्ट केले आहे. इंग्रजी राज्यामुळे हिन्दी लोक पाश्चात्त्य शास्त्रे, विद्या व दळणवळणाची साधने यांच्या संपर्कात येऊन त्यांच्यात राजकीय जागृती निर्माण होईल हाच ' अप्रत्यक्ष क्रान्ती ' चा अर्थ होता. परंतु इंग्रजी आक्रमणामुळे हिन्दी'वसाहतीच्या आर्थिक शोषणाची एक व्यवस्थाच स्थापन होणार असाही संकेत मार्क्सने १८३१ मध्ये डॅनियल्सनूला

लिहिलेल्या पत्रातून अप्रत्यक्षपणे व्यक्त करून ठेवला : " बदल्यात काही एक न देता ब्रिटिश लोक हिन्दी लोकांकडून जे घेतात (त्या वार्षिक भेट म्हणून जाणाऱ्या वस्तूंचे मूल्य) भारतातील सहा कोटी शेतकरी व औद्योगिक कामगार यांच्या एकत्र उत्पन्नाएवढे असते — प्रत्यक्ष हिन्दुस्थानात ब्रिटिश लोक स्वतः जे मिळवितात त्याचा यामध्ये समावेश नाही. " अर्थात आर्थिक व्यवहारातील या लुटीचे उल्लेख १७८७ पासूनच इंग्लंडमध्ये झालेले आहेत. पुढे दादाभाईंनी या प्रश्नाचा बारकाईने अभ्यास करून स्वतंत्र " निस्सारण सिद्धान्तच " मांडला व हिन्दी जनतेच्या दैन्याच्या मुळाशी हे " निस्सारण " कसे आहे हे ब्रिटिश व हिन्दी जनतेला सांगून भारतीय राष्ट्रवादाला आर्थिक आधिष्ठान प्राप्त करून दिले.

इंग्रज राज्यकर्त्यांमध्ये हा वेगळेपणा कसा आला ? आपल्या राज्यकर्त्यांना हे वेगळेपण का कळले नाही ?

या प्रश्नांची उत्तरे मिळण्यासाठी युरोपातील " धर्म-सुधारणा " व " प्रबोधना "च्या कालखंडातच डोकवावे लागते. धर्मपीठे व राजसत्ता यांतील दीर्घकाळ चाललेल्या संघर्षामुळे सर्व युरोपात राष्ट्रवादाने मूळ धरले, राष्ट्रीय जाणिवेने परिपूर्ण अशी राष्ट्रे युरोपात निर्माण झाली. या देशांच्या बलशाली राजांनी व्यापार व संपत्ती वाढविण्याच्या हेतूने नवीन भू-प्रदेश शोधून काढण्यासाठी दूरदूरच्या सागरी-सफरी व शोध-प्रवास यांना खास उत्तेजन दिले. वास्को-द-गामा ह्या पोर्तुगीज दर्यावर्दीने १५ व्या शतकातच (१४९८) हिन्दुस्थानला जाण्याचा सागरी मार्ग शोधून काढला. आणि आशिया खंडाचे हे द्वार उघडल्यावर पोर्तुगिजांच्या मागोमाग डच, इंग्रज, फ्रेंच हे युरोपीय धर्मप्रसार व व्यापाराच्या हेतूने इकडे आले. या सर्व युरोपीय मंडळींचा आशिया खंडातील प्रवेश पुढे १८ व्या शतकापर्यंत इतक्या मोठ्या प्रमाणावर वाढला की त्याला साम्राज्यवादी हालचालींसारखेच स्वरूप आले.

धर्मसुधारणेच्या युरोपातील चळवळीनंतर तेथे ज्ञानाच्या पुनरुज्जीवनाला प्रारंभ झाला. प्रश्नांची शास्त्रीय पद्धतीने चौकशी व विश्लेषण करून निष्कर्ष काढण्याला महत्त्व आले. शास्त्रीय साधनांची वाढ झाली. खगोलशास्त्र, वैद्यकशास्त्र, शरीरशास्त्र याबरोबरच साहित्य, शिल्प, कला, संगीत यांच्या विकासाला बहर आला. फ्रेंच राज्यक्रांतीने नव्या दृष्टीचा माणूस सर्व युरोपभर निर्माण झाला — जुन्या रूढी, कल्पना, संस्था, बंधने इ.च्या विरोधात उभे राहिलेले ते " माणसाचे बंड " होते. मुक्ततेमुळे व्यक्ती, साधने, कल्पना व मते यांना जी गतिशीलता आली ती औद्योगिक व व्यावसायिक क्षेत्राच्या प्रसाराला फार उपयुक्त ठरली. एल.सी.ए. नोलस् यांच्या मते " ' स्वातंत्र्य, समता, बंधुत्व ' याचा आर्थिक क्षेत्रातील अर्थ एका व्यक्तीची दुसऱ्या व्यक्तीवरील अधिकारवर्चस्वाची समाप्ती, कर-आकारणीमध्ये समानता व न्याय, अनिर्बंध प्रवास व वस्तू-वाहतुकीचे स्वातंत्र्य, धंदा निवडीचे स्वातंत्र्य व कायद्यासमोर समानता असा होता..... फ्रेंच फौजा ज्या ज्या ठिकाणी गेल्या त्या त्या ठिकाणी त्यांनी व्यक्तीच्या स्वातंत्र्याची, विशेषाधिकार व बंधने यांच्या समाप्तीची घोषणा घुमविली, परिणाम असा झाला की मध्य व पूर्व युरोपीय देशांनी आपल्या गुलामांना मुक्त केले, शेतीची व्यवस्था, कायद्याची पद्धती, व

शासनव्यवस्था यांची पुनर्रचना घडवून आणली... अशा या मुक्त मानवाच्या हाती (औद्योगिक क्रान्तीच्या रूपाने) लवकरच उत्पादनाची नवीन साधने, नवीन पद्धती आल्या व त्यामुळे नव नवीन व्यवसायांची चौफेर वाढ दिसून आली. या सर्वांचा एकत्रीत परिणाम : नवे लोक, नवे वर्ग, नवी धोरणे,नवीन प्रश्न,नवीन साम्राज्ये. " व्यक्तीस्वातंत्र्याची फ्रान्समधील कल्पना व उत्पादनाचे इंग्रजी तंत्र यांच्या मिलाफातून नवीन जग निर्माण झाले असा नोलस् यांचा निष्कर्ष आहे.

नवीन उत्पादनतंत्राच्या मुळाशी चौकसबुद्धी व ज्ञानार्जनाची हौस असते. औद्योगिक क्रान्ती झाली म्हणजे उत्पादनाचे तंत्र बदलले, उत्पादनाला शास्त्राची जोड मिळून उत्पादनाचा वेग वाढला. इंग्लंड व पुढे इतर युरोपीय देशांचा चेहरामोहरा बदलून टाकणारी औद्योगिक क्रान्ती म्हणजे चौकसबुद्धी व ज्ञानार्जन वृत्ती यांतून वाढीस लागलेल्या शास्त्राने परंपरागत उत्पादनव्यवहारामध्ये घडवून आणलेल्या परिवर्तनांची एक मालिकाच होती.

युरोपातील आधुनिक जीवन, तेथील भौतिक संपन्नता यामागे नवी दृष्टी, शास्त्रीय पद्धती आहे. निसर्ग व मानवी जीवनाविषयीचे कुतुहल, चौकसबुद्धी, निरिक्षण व शास्त्रीयचिकित्सा आहे. युरोपमधील माणसाची नवी जीवनदृष्टी,बॅर्ट्रन्ड रसेल आपल्या ' विझडम ऑफ् द वेस्ट ' या ग्रंथराजाचा शेवट ज्या पुढील वाक्याने करतात, त्यातून फार समर्थपणे स्पष्ट होते : 'For man, the unexamined life is, not worth living.

हिन्दुस्थानातील त्या काळातील राज्यकर्त्यांच्या व बुद्धीवंतांच्या लक्षात हे वेगळेपण कां आले नाही ? इंग्रज व इतर युरोपीय लोकांशी संबंध येऊनही त्या नवीन जीवनाविषयीची नोंद इकडे कां आढळत नाही ? शिवाजीमहाराजांचा एक अपवाद वगळता हिन्दुस्थानात सर्वदूर युरोपीय जीवनातील घडामोडींविषयी चौकशी, कुतुहल आढळत नाही. परंतु शिवाजी राजा रयतेचा राजा होता. रयतेचे प्रेम व निष्ठा या बळावरच स्वराज्याची उभारणी झाली होती. परिणामतः एतद्देशियांचे राज्य, वतनदारी पद्धती बंद करणे, सर्वधर्मसमभाव, राज्यव्यवहार कोश, रयतेला त्रास न देण्याबद्दल सैन्याला सक्त ताकीद, स्वराज्यरक्षणासाठी आरमाराची उभारणी इ. त्या काळातील इतर राजसत्तांच्या तुलनेत नावीन्यपूर्ण अशी स्वराज्याची उभारणी जनहितदक्षतेतून झाली. परंतु इतरत्र व शिवाजीमहाराजांनंतर असे काहीच का आढळत नाही ? गोविन्द तळवलकर यांनी या प्रश्नाच्या उत्तराचे शब्दांकन फारच चांगले केले आहे. ते असे : ' ब्रिटिश येथे आले आणि त्यांनी एकदम, एकाएकी राज्य ताब्यात घेतले असे झाले नाही. दोन-अडिचशे वर्षे ते येत होते व हळूहळू पाय पसरत होते. परंतु हे लोक कोण ? ते आले कोठून ? त्यांच्या चालीरीती काय ? त्यांचा देश कसा आहे ? याची आपल्याकडे कोणी फारशी फिकीर केली नाही. ब्रिटिशांनी येथील राज्यकर्त्यांची व समाजाची भरपूर माहिती जमा केली होती तर आमच्या लोकांना त्यांची काहीही माहिती नव्हती ... आपल्या समाजातील ज्ञानार्जनाची हौस व चौकसबुद्धी लोपली होती. आपल्याकडे समाजाचा व्यवहार चालू होता, अर्थव्यवहार होत होता व राजसत्ताही राबविल्या जात होत्या, तरीही या सर्व व्यवहारांमागे काही सिद्धान्त असतात, शास्त्र असते, याची जाणीव लोपून कित्येक शतके लोटली होती. ' (नवरोजी ते नेहरू)

[ २ ]

आपल्याकडे हे केव्हा कळले ? कसे ? इंग्रजी शिक्षणामुळेच हे पश्चिमेचे वेगळे जीवन आपल्याला कळू शकले. १८०१ मध्ये फोर्ट विलीयम कॉलेज बंगालमध्ये स्थापन झाल्याचा उल्लेख आहे. हिन्दुस्थानातील हे पहिले कॉलेज. बंगालमधील श्रीरामपूर येथील कॅरे वगैरे मिशनऱ्यांनी पश्चिमेचे विचार हिन्दुस्थानात आणण्यात फार मेहनत केली. हिन्दुस्थानातील पहिला छापखाना व टाईप फौन्ड्री ही श्रीरामपूरचीच. बंगाली व इंग्रजी भाषेतील वर्तमानपत्रे व पुस्तके यांची छपाई व प्रकाशन ह्यास प्रारंभ झाला. परंतु इंग्रजी शिक्षणाच्या प्रसाराचा मार्ग १८३५ मध्येच खुला झाला.अलेक्झांडर डफ व मेकॉले यांच्या शिष्टाईचा यात मोठा वाटा होता. परिणामतः मद्रास, मुंबई, नागपूर येथे मिशन्सतर्फे साहित्य व पाश्चात्त्य शास्त्रे शिकविण्याच्या उद्देशाने कॉलेजांची स्थापना झाली. हिन्दुस्थानात पाश्चात्त्य ज्ञानाचा प्रसार करणे व आधुनिक विचारांचा एक वर्ग येथे निर्माण करण्यासाठी १८३५ मध्ये बेंटींगने सरकारी पैशाचा विनियोग करण्यास मान्यता दिली. आणि बंगाल, मुंबई व मद्रास इलाख्यांतून मध्यमवर्गामध्ये इंग्रजी शिक्षणाचा वेग फार मोठ्या प्रमाणावर वाढला.

या शैक्षणिक प्रसाराचा लोकही निष्ठापूर्वक उपयोग करून घेत होते. ज्ञानग्रहण व देशबांधवांचे प्रबोधन यांचे एक नवीनच पर्व या काळात देशात सुरू झाले. इंग्रजी भाषा म्हणजे ' वाघिणीचे दूध ' इंग्रजी विद्या म्हणजे ' वज्र ' अशी भावना त्या काळात व्यक्त होऊ लागली. परंतु " हिन्दी लोकांना वरिष्ठ नोकऱ्यात प्रवेश नव्हता म्हणून लोक कायद्याचा व वाङ्मयाचा अभ्यास करून वकील व प्राध्यापकाचा पेशा करू लागले ... हा वर्गच पुढे समाजाचे पुढारीपण करू लागला. .. तथापि इंग्रजी वाङ्मय, कायदा इ. चा अभ्यास करणारा हा सुशिक्षितांचा वर्ग सरकारी नोकऱ्या व राजकीय हक्क इ. बाबत डावलला जात होता आणि यातूनच राजकीय जागृतीची लाट ठिकठिकाणी, विशेषतः मुंबई, कलकत्ता, मद्रास अशा मोठ्या शहरांत निर्माण झाली. दळणवळणाची साधने, वृत्तपत्रांद्वारे होणारे मतप्रदर्शन आणि इंग्रजीच्या रूपाने उपलब्ध झालेली समान भाषा हे सर्वच वातावरण राजकीय जागृतीला पोषक होते. शासनाच्या सुकरतेसाठी आगगाडी, रस्ते, तारायंत्रे इ. दळणवळणाची साधने निर्माण करण्यात आली असली तरीही शासनात वाटा मागण्याची भावना जागृत करण्यास व तिला जाहीर, संघटीत वाचा फोडण्यासही या साधनांचा उपयोग झाला. " दादाभाई नवरोजी (१८२५-१९१७), महादेव गोविन्द रानडे (१८४२-१९०१), फेरोजशाह मेहता (१८४५-१९१५), रमेशचंद्र दत्त (१८४८-१९०१) व सुरेन्द्रनाथ बॅनर्जी (१८४८ - १९२५) ह्यांची देशाचे सामाजिक व वैचारिक नेतृत्व करणारी पहिली पिढी इंग्रजी शिक्षण व पाश्चात्त्य ज्ञान यातूनच पुढे आली. या काळात ऐहिक जीवनाचे तत्त्वज्ञान व सामाजिक प्रश्नांच्या शास्त्रीय विश्लेषणाची पद्धती आत्मसात झाली. निबंधलेखन, चर्चा व भाषणे यांतून वैचारिक संस्था-जीवन देशात वाढू लागले. स्थानिक व प्रान्तिक पातळ्यांवर अशा संस्थांचा उदय होऊ लागला. १८५१ मध्ये ब्रिटीश इंडिया असोसिएशन कलकत्ता, १८५२ मध्ये मुंबईत बॉम्बे असोसिएशन व याच सुमारास मद्रास व पुणे येथे स्थापन झालेल्या सार्वजनिक सभा ही संस्था-जीवनाची ह्या काळातील काही ठळक

उदाहरणे.सार्वजनिक जीवन वाढीस लावण्यात वृत्तपत्रसृष्टीचाही फार मोठा वाटा होता. या काळात देशात ४७५ वृत्तपत्रे असल्याचा उल्लेख आढळतो. काही काळ एकेका प्रान्तापुरतेच मर्यादित असलेले सार्वजनिक जीवन प्रान्तांच्या सीमा ओलांडून पुढे राष्ट्रीय स्वरूपाचे होत गेले. रेल्वे, तारायंत्रे, वृत्तपत्रे व नागरीजीवनाबाबत निर्माण झालेली सुरक्षितता आणि संभाषणाचे, वैचारिक आदान-प्रदानाचे माध्यम म्हणून इंग्रजी भाषा यांचा देशात हे नवीन सार्वजनिक जीवन वाढीस लावण्यात फार मोठा वाटा होता. परिणामतः हिन्दी नेत्यांचे प्रान्तोप्रान्ती दौरे सुरू झाले. जनतेचे प्रश्न व सरकारची धोरणे यासंबंधीचे असमाधान अशा दौऱ्यांमधून व्यक्त होऊ लागले. १८८३ मध्ये कलकत्ता येथे एक राजकीय परिषद झाली व परिषदेत राष्ट्रीय प्रश्नांचा उहापोह होऊन ते मार्गी लावण्याच्या हेतूने एक देशव्यापी राजकीय संस्था स्थापन करण्याची आवश्यकता व्यक्त करण्यात आली. पुढे १८८५ मध्ये भारतीय राष्ट्रसभा स्थापन झाली.

इंग्रजी शिक्षण व पाश्चात्त्य शास्त्रे यांच्या अभ्यासामुळे काही काळ भारून गेलेले हिन्दी नेते व विचारवंत येथील शेती, व्यापार-व्यवसाय, बेकारी व दुष्काळ या प्रश्नांची आणि एकूणच डबघाईला आलेल्या आर्थिक जीवनाचे विश्लेषण करू लागली. १८५८ ते १९०५ या काळात ९० टक्क्यांपेक्षा जास्त लोक खेड्यांत राहत होते, व उद्योग-व्यापाराची पुरेशी वाढ नसल्याने सर्व भार शेतीवरच पडत होता. अर्थतज्ज्ञ व्हेरा ॲन्स्टे म्हणतात : “ दर चौ. मैलामागे जास्तीत जास्त २५० माणसांचा भार वाहणे शेती व्यवसायास शक्य असते असे पश्चिमेकडे मानले जाते, परंतु हिन्दुस्थानात लोकसंख्येच्या घनतेचे प्रमाण दर चौ. मैलाला ६०० पेक्षाही जास्त आढळते. ” भांडवल गुंतवणुकीच्या अभावी शेतीची उत्पादकता वाढत नव्हती. शेतसाऱ्याचे प्रमाण इतके जास्त होते की शेतीसुधारणा करण्यासाठी पुरेसे भांडवलच निर्माण होऊ शकत नव्हते. इंग्रज सरकारच्या धोरणामुळे परंपरागत हिन्दी उद्योग नष्ट होत होते व दुसरीकडे वारसाहक्काच्या कायद्यांमुळे शेतीची तुकडेवारी सुरू होती. परिणामतः शेतीवर कर्जाचे प्रमाण वाढत होते. शेतीसुधारणेसाठी, उत्पादक कामासाठी कर्ज हा प्रकारच नव्हता; उपभोगासाठी, शेतसारा भरण्यासाठी, शेती न पिकल्यामुळे कसेबसे दिवस काढण्यासाठी हिन्दी शेतकरी कर्ज काढीत होता. त्याचा जन्म कर्जातच होत होता, तो कर्जातच जगत होता, मृत्यू कर्जातच द मुलाबाळांच्या डोक्यावर कर्जाचा भार सोडूनच तो ऐहिक जीवन सोडत होता. दुष्काळांनी तर थैमान घातले होते. १८६० ते १९०८ या ४९ वर्षांपैकी २० वर्षे दुष्काळी होती. लाखो माणसे दुष्काळात दगावली. १८७७ ते १९०० या काळातील दुष्काळात सुमारे दीड कोटी लोक मृत्युमुखी पडले. १८५८ मध्ये कंपनीचे सरकार जाऊन ब्रिटीश शासन आले. “ १८५८ ते १९०५ या ब्रिटीश शासनाच्या पहिल्या ५० वर्षांत रेल्वे व दळणवळणच्या सोयी, विदेशी व्यापार व हिन्दी अर्थव्यवस्थेचे आधुनिकीकरण यामध्ये प्रगती सुरू झाली. ताग व कापड उद्योगाची वाढ झाली. टाटांच्या लोखंड-पोलाद कारखान्याची मुहूर्तमेढ झाली होती.व्यापारी, जमिनदार व सावकार यांची या आर्थिक बदलांमुळे स्थिती सुधारली, किंमती व नफे वाढत होते व परिणामतः हिन्दी भांडवलशाही युरोपीय धर्तीच्या व्यवसाय-संस्थांचा विकास करीत होती. जॉ. स्टॉ. कंपन्या व

त्यांचे भांडवल यातही वाढ झाली होती. " परंतु हा नवीन अर्थव्यवहार फार अपुरा होता व त्याची सामाजिक किंमत फार मोठी होती. उदा. १८८१ ते १९११ या कालखंडात कारखानदारी, खाणी, व्यापार व बांधकाम या क्षेत्रातील रोजगाराचे प्रमाण १८ टक्क्यांवरून १५ टक्क्यांपर्यंत खाली आल्याचे डॅनियल थॉर्नर दाखवून देतात. या नवीन औद्योगिक प्रगतीत कारखान्यात काम करणाऱ्या मजुरांचे प्रमाण एकूण लोकसंख्येच्या एक टक्क्यापेक्षाही कमी होते. ब्रिटीश शासनापूर्वी लोखंडाचे कारखाने, निळीची शेते, कागद निर्मिती व रेशीम निर्मिती इ. व्यवसायांकडे उद्योजकांचे चांगले लक्ष होते, वाढ होत होती. परंतु १८५८ नंतर शासन व विदेशी भांडवल यांनी कारखानदारीकडे दुर्लक्षच केले. जुने उद्योग बसले, नवीन आवश्यक त्याप्रमाणात वाढत नव्हते. याचा एकत्रित परिणाम म्हणजे डॅनियल थॉर्नर यांच्या शब्दांत १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात हिन्दुस्थानचे ' उद्योगिकरण ' होण्याच्या ऐवजी " निरोद्योगिकरण " होत होते.

इंग्रजी राजवट येण्यापूर्वीही हिन्दुस्थानात दुष्काळ पडले परंतु त्या काळात एकूण समाजच दुबळा झाला होता, आर्थिक व राजकीय दृष्टी नव्हती. इंग्रजी शिक्षण व पाश्चात्त्य शास्त्राच्या अभ्यासातून ती दृष्टी आल्यावर येथील आर्थिक स्थिती व दारिद्र्य यांची चिकित्सा सुरू झाली. पुढे आर्थिक व राजकीय मागण्यांचे पर्व सुरू झाले. परकीय सत्तेच्या विरोधातून राष्ट्रवादी प्रवृत्तींची स्वाभाविकपणे वाढ होत असतेच. परंतु इंग्रजी शिक्षणामुळे येथील राष्ट्रवादाला संस्थात्मक स्वरूप मिळाले. एवढेच नव्हे तर देशातील दैन्य, दारिद्र्य व एकूण आर्थिक क्षेत्रातील अवनती यांच्या अर्थशास्त्रीय चिकित्सेमुळे राष्ट्रवादाचे स्वरूप केवळ भावनिक न राहता त्यामागे बौद्धिक बळ उभे करता आले.

[ ३ ]

इ.स. १६०० मध्ये ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना झाली. १६२३ मध्ये इंग्रजांना ईस्ट इंडिजमध्ये अपयश आल्यापासून त्यांचे लक्ष व्यापाराच्या दृष्टीने मुख्यत्वे हिन्दुस्थानकडे लागले होते. १६३९ मध्ये कंपनीने मद्रासमध्ये फोर्ट सेन्ट जॉर्ज बांधल्याचा उल्लेख आहे. १६८७ मध्ये कंपनीने मुंबई बेट खरेदी करून त्यांच्या वखारी तेथे हलविल्या.१७०० मध्ये बंगाल विभागाचे मुख्य कार्यालय कलकत्त्याला निश्चित केले. १७५७ मध्ये क्लाईव्हच्या नेतृत्वाखाली प्लासीची लढाई इंग्रजांनी जिंकून ईस्ट इंडिया कंपनी ही व्यापारी संस्था हिन्दुस्थानातील एक महत्त्वाची प्रादेशिक सत्ता म्हणून पुढे आणली. ब्रिटीश पार्लमेंटने १७७३ मध्ये ईस्ट इंडिया कंपनीच्या हिन्दुस्थानातील प्रशासनाला मान्यता देऊन कंपनीच्या येथील सर्व प्रदेशांसाठी गव्हर्नर जनरल हे पद निर्माण केले. तिकडे इंग्लंडमध्ये ह्या वेळी (१७५७ - १७६१) राजसत्तेचे नेतृत्व विलीयम पीटकडे होते. १७६० मध्ये फ्रेंचांकडून कॅनडा जिंकून, १७५७ मध्ये प्लासीची लढाई व १७६१ मध्ये हिन्दुस्थानातील फ्रेंच सत्ता संपवून, आणि युरोप, अमेरिका व आशियातील फ्रेंच सत्तेला नामोहरम करून विलीयम पीटच्या नेतृत्वाखाली इंग्लंड हे जागतिक राजसत्ता म्हणून पुढे आले.

अर्थशास्त्रीय विचारांच्या इतिहासाप्रमाणे हा इंग्लंड व सर्व युरोपमध्ये व्यापारवादी आर्थिक तत्त्वज्ञानाचा कालखंड (१५०१ ते १७७५) होता. देशाची संपत्ती

वाढविण्याचा एकच एक उपलब्ध मार्ग म्हणजे परदेशी व्यापार " या आर्थिक तत्त्वज्ञानाचा हा कालखंड. पैसा व मौल्यवान धातू म्हणजे राष्ट्रीय संपत्ती, परराष्ट्रीय व्यापार वाढवून अशी राष्ट्रीय संपत्ती वाढविणे, नियंत्रणे व निर्बंध लादून उत्पादनवाढ व निर्यातवाढ घडवून आणणे, राष्ट्रीय आर्थिक एकता निर्माण करणे, परदेशातील बाजारपेठांवर एकाधिकार स्थापन करणे व यासाठी लष्करी सामर्थ्यांचा वापर करून वसाहती व साम्राज्ये वाढविणे अशा आर्थिक विचारांचा पुरस्कार करणाऱ्या व्यापारवाद्यांचा हा कालखंड. थॉमसमन् (१५७१ - १६४१) व विलीयम पेट्टी (१६२३ - १६८७) हे व्यापारवादाचे दोन प्रमुख प्रवर्तक. ईस्ट इंडिया कंपनीच्यामागे हे व्यापारवादी आर्थिक तत्त्वज्ञान होते. आणि थॉमसमन हा प्रमुख व्यापारवादी ईस्ट इंडिया कंपनीच्या संचालकमंडळावर होता.

इंग्लंडमधील औद्योगिक क्रान्तीला वेग प्राप्त करून देण्याचे तसेच ब्रिटीश साम्राज्याची शक्ती वाढविण्याचे ऐतिहासिक कार्य व्यापारवादाच्या आत्यंतिक व अमानूष विचारसरणीलाच आहे. १७५७ ते १८५८ हा कंपनीचा भारतातील महत्त्वाचा कालखंड. व्यापारवादी विचारातील आत्यंतिकता ह्या काळात हिन्दुस्थानात अनुभवास आली. ईस्ट इंडिया कंपनीने हिन्दुसथानची लूट चालविली. ॲडमस्मिथ या कंपनीच्या कोर्ट ऑफ प्रोप्रायटर्सचा निर्देश " हिन्दुस्थानला लुटणाऱ्यांची नेमणूक करणारे कोर्ट " असाच करतो. आर्थिक इतिहासकार रोमेश दत्त १९०२ मध्ये असेच लिहितात, की ब्रिटीश शासनाच्या काळात भारताच्या राष्ट्रीय संपत्तीचे झरे आटले. रोमेश दत्त म्हणतात " ईस्ट इंडिया कंपनी व ब्रिटीश पार्लमेंट यांनी गेल्या शंभर वर्षांत इंग्लंडच्या कारखानदारीला प्रोत्साहन देण्यासाठी भारतीय उद्योगधंद्याना निष्प्रभ करण्याचे स्वार्थी व्यापारी धोरण अंमलात आणले. इंग्लंडच्या कारखान्यांना कच्चा माल पुरविण्यासाठी हिन्दी लोकांना फक्त कच्चा माल निर्माण करण्यास भाग पाडण्याचेच त्यांचे निश्चित धोरण होते. हे धोरण पूर्ण निर्धाराने व यशस्वीपणे अंमलात आणण्यात आले; यासाठी हिन्दी कारागिरांनी फक्त कंपनीच्या फॅक्टऱ्यांमध्ये काम करावे अशी सक्ती करण्यासंबंधी आदेश देण्यात आले. कंपनीच्या कमर्शियल रेसिडन्टस्ना हिन्दी विणकर वर्ग व खेडी यांच्या नियंत्रणासाठी कायदेशीर अधिकार देण्यात आले. ... इंग्रजी मालाची आयात करांपासून मुक्तता करण्यात आली किंवा आयात कर फारच अल्प करण्यात आले. .. पुढे १८३३ मध्ये कंपनीचा व्यापार समाप्त करण्यात आला, १८५८ मध्ये कंपनीची सत्ताच संपविण्यात आली, परंतु (व्यापारी) धोरण तेच चालू आहे ... साम्राज्य कंपनीकडून राजाकडे हस्तांतरीत करण्यात आले, परंतु ह्या हस्तांतरणाची किंमत (कंपनीच्या संपत्तीची खरेदी किंमत) हिन्दी जनतेने दिली. " भारताचा आर्थिक इतिहास १८५७ ते १९५६ या व्ही.बी.सिंध संपादित ग्रंथात ' विदेशी भांडवल ' ह्या आपल्या शोधनिबंधात अरुण बोस म्हणतात, " १७५७ पासून पुढील शंभर वर्षे म्हणजे हिन्दी साधनसंपत्तीच्या बहिर्गमनाचे, विशेषतः इंग्लंडकडे, शतक होते. दरवर्षी किती संपत्ती इंग्लंडात जात होती किंवा या संपत्तीच्या निस्सारणाचे अथवा भारताच्या लुटीचे अंदाज कधीच व्यवस्थितपणे करता आले नाहीत. ... ईस्ट इंडिया कंपनीने या

वार्षिक खंडणीच्या भारतातून इंग्लंडकडे वाहनाची जी व्यवस्था केली होती ती ब्रिटीश सरकारने १८३०-४० मध्ये अधिक गुंतागुंतीची केली ... थोडक्यात एका मर्यादित कालखंडात मुक्त आर्थिक व्यवहारात उघडउघड हस्तक्षेप करून शोषणाच्या क्रियेने आपण ज्याला आज " अर्धविकसित अर्थव्यवस्था " म्हणतो तशी स्थिती या देशाची करून टाकली. "

१८ व्या शतकाच्या उत्तरार्धात व्यापारवादी तत्त्वप्रणाली मागे पडू लागली. ॲडम स्मिथचा अर्थशास्त्रावरील ग्रंथ १७७६ मध्ये प्रकाशित झाला व ' मुक्त व्यापाराचे ' नवे युग सुरू झाले. फ्रेंच राज्य क्रान्ती औद्योगिक क्रान्ती यांचा हा कालखंड. उदारमतवाद व नवनिर्मितीचा हा कालखंड. आधुनिक उत्पादन, संपन्न नागरीजीवन, आचार-विचारांचे स्वातंत्र्य, काव्य, शास्त्र, कला इ.चा जोमदार विकास व प्रसार होण्याचा हा इंग्लंडमधील कालखंड होता. ॲडम स्मिथने राष्ट्रांच्या संपत्तीचे स्वरूप व वाढीची कारणे उघड केली. केवळ मौल्यवान वस्तू व विदेशी व्यापार यामुळे राष्ट्राची संपत्ती वाढत नसते, तर उद्योग, शेती, व्यापार या सर्वांचीच राष्ट्रीय संपत्ती व जनतेचे स्वास्थ्य यांच्या वाढीसाठी आवश्यकता असते असे ॲडम स्मिथने प्रतिपादीत केले. मानवाला आवश्यक असणाऱ्या व सुख देणाऱ्या सर्व वस्तूंचा त्याने संपत्तीत समावेश केला. प्रत्येक देशाच्या व एकूण जगाच्या भल्यासाठी खुल्या आंतरराष्ट्रीय व्यापाराची व सामाजिक भल्यासाठी व्यक्तीस्वातंत्र्याची आवश्यकता स्पष्ट केली.

व्यापारवादी तत्त्वज्ञानाची वैचारिक पकड ढिली झाली;मुक्त व्यापार,निर्हस्तक्षेपनीतीचा विजय झाला.ॲडमस्मिथचे तत्त्वज्ञान निश्चितच साम्राज्यवाद विरोधी होते.शांततेचा, जागतिक सहकार्य,मानवतावाद व नैतिक मूल्यांचा पुरस्कार त्यात होता.परंतु संपत्तीच्या नवीन अर्थाप्रमाणे आधुनिक औद्योगिकरणाला बहर आल्यावरही साम्राज्यवाद गेला नाही. मानवतावादी तत्त्वज्ञान असूनही प्रत्यक्षात ते, विशेषतः इंग्लंडच्या बाबतीत, अपेक्षा केल्याप्रमाणे साम्राज्यवादविरोधी सिद्ध झाले नाही. उलट साम्राज्यवादाची शोषणशक्ती व क्रौर्य सारखे वाढतच होते. भारताचा या काळातील इतिहास याला साक्षी आहे.

वस्तू निर्मितीमध्ये संपत्ती आहे व श्रमविभागणीशिवाय संपत्ती निर्मितीचा वेग वाढू शकत नाही ही ॲडम स्मिथची अर्थतत्त्वे इंग्लंडमधील नवीन कारखानदारीशी, यंत्रे व शास्त्रीय शोधांवर आधारित उत्पादनव्यवस्थेशी सुसंगत अशीच होती. बी.एन. गांगुली म्हणतात, " ' राष्ट्रांची संपत्ती ' हा ॲडम स्मिथ यांचा ग्रंथ, त्यात उच्च नैतिक मूल्यांना दिलेले स्थान, व न्याय, मानवता व बुद्धीप्रामाण्य या तत्त्वांचा त्यातून झालेला पुरस्कार, यापेक्षाही त्यातील सिद्धान्त व धोरणविषयक सूचना ब्रिटनमधील नवीन विकसित होत असलेल्या आर्थिक जीवनाच्या गरजांशी सुसंगत होत्या म्हणूनच युगनिर्माता ठरला... जुन्या प्राथमिक स्वरूपाच्या व्यापारवादी वसाहतवादाची गरज इंग्लंडमधील औद्योगिक विकासाने कमी केली. " साम्राज्यवाद संपुष्टात आला नाही, तर साम्राज्यशाहीने नवीन स्वरूप धारण केले.

इंग्लंडच्या अर्थव्यवस्थेच्या गरजा बदलल्या म्हणून साम्राज्यवादाचे स्वरूप बदलले.इंग्लीश कारखानदारीला आता कच्च्या मालाची व पक्क्या मालासाठी स्पर्धाहीन बाजारपेठांची गरज

होती. १७७६ मध्येच अमेरिका इंग्रजी सत्तेपासून मुक्त झाल्यापासून इतर वसाहतीबाबत ' उदारसाम्राज्यवादाची ' आवश्यकता प्रतिपादन करण्यात आली. इंग्रजी सत्तेचा ' सिव्हीलाय झिंग रोल ' व ' स्वयं प्रशासनासाठी वसाहतींना तयार करण्याची ' भाषा आली. ईस्ट इंडिया कंपनीच्या कारभाराची टीका व सुधारित नियमावलीची गरज स्पष्ट करण्यात आली. मुख्य म्हणजे १९ व्या शतकाच्या मध्यापर्यंत इंग्लंडचे औद्योगिक सामर्थ्य तसेच सामुद्रिक वाहतूकव्यवस्था, इ. आर्थिक बाबतीत व युद्ध शक्ती, विशेषतः नावीक बळ, याबाबतीत जगाच्या तुलनेत इतके प्रचंड होते, की जुन्या ' व्यापारवादी ' साम्राज्य विस्ताराची गरज नव्हती. परंतु या उदार साम्राज्यवादाच्या काळात ' गोऱ्यांच्या वसाहती ' व ' काळ्यांच्या वसाहती यांत फरक होताच. राजा राममोहन रॉय, आ. सी. दत्त, दादाभाई नवरोजी इ. हिन्दी नेतृत्वाची पहिली पिढी इंग्रजी राज्यसत्तेच्या संदर्भात प्रथम आली ती याच उदार साम्राज्यवादाच्या काळात सरकारी नोकऱ्या, प्रशासकीय परीक्षा, सरकारी नोकऱ्यांमध्ये हिन्दी जनतेला वाढता वाटा, प्रतिनिधीक संस्थांमध्ये प्रतिनिधीत्व ब्रिटोश भांडवलाची गुंतवणुक, शेतसारा व इतर राजकीय व आर्थिक स्वरूपाच्या मागण्या राष्ट्रसभेच्या व्यासपीठावरून किंवा अन्य मार्गाने करताना हा उदारमतवाद गृहीत धरला जात होता. ब्रिटीश राज्यसत्ता व हिन्दुस्थानातील इंग्रजी सरकार असा भेद करून, उदारमतवादी ब्रिटीश सत्तेला आवाहन करण्याचाच सूर होता. भारतीय राष्ट्रसभा व प्रामुख्याने दादाभाई नवरोजी यांचे हिन्दी राजकीय व आर्थिक प्रश्नांचे, विशेषतः हिन्दुस्थानच्या दारिद्र्याचे, विश्लेषण जहाल स्वरूपाचेच होते; परंतु इंग्लंडमधील उदारमतवाद, तेथील सभ्य, सुसंस्कृत राजकीय व सामाजिक नेतृत्व आणि एकूण युरोपीय विचारांचे वैभव यामुळे राष्ट्रसभेच्या पहिल्या पर्वातील (१८८५ ते १९०७) नेत्यांची भाषा, व मागण्या मांडण्याच्या पद्धतीमध्ये जहालपणा नव्हता. मुख्यत्वे ॲडम स्मिथच्या अभिजात अर्थशास्त्रीय सिद्धांतांच्या अभ्यासामुळे हिन्दुस्थानातील आर्थिक प्रश्नांची शास्त्रीय चिकित्सा येथे याच काळात सुरू झाली. प्रान्तीय व देशपातळीवर संस्थांच्या व्यासपीठांवरून ही आर्थिक प्रश्नांची चिकित्सा मांडण्याची पद्धती देशात प्रथमच सुरू झाली. हिन्दी अर्थशास्त्राच्या निर्मितीची पूर्वचिन्हे स्पष्ट दिसायला लागली.

परंतु इंग्रजी राज्यसत्तेचा हा उदारमतवादी तोंडवळा फार दिवस टिकला नाही. १९ व्या शतकाच्या शेवटी इंग्लंडच्या औद्योगिक उत्पादनातील घोडदौडीला अमेरिका, जर्मनी, फ्रान्स व बेल्जीयम यांनी लगाम घातला. या शतकाच्या शेवटच्या दशकात तर पोलाद उत्पादनामध्ये जर्मनी व अमेरिकेने इंग्लंडला मागे टाकले. इंग्लंडमध्ये राजकीय व आर्थिक तणाव निर्माण झाले. ब्रिटीश कामगार वर्गाला संरक्षण देण्याच्या नावाखाली पुन्हा जुने साम्राज्यवादी धोरण स्वीकारून इंग्लंडमधील कारखानदारीला कच्च्या मालाचा पुरवठा करण्यासाठी व पक्क्या मालाच्या विक्रीसाठी बाजारपेठा मिळविण्याकरिता आशिया व आफ्रिका खंडात ' प्रदेश बळकावणे, ' वसाहतीं मिळविणे, १९ व्या शतकाच्या शेवटी पुन्हा सुरू झाले.

इंग्लंडची " उदारमतवादी साम्राज्यशाही " ही केवळ इतर युरोपीय देशांच्या साम्राज्यांची स्पर्धाशक्ती कमी असेपर्यंतच टिकली. त्यानंतर मात्र वसाहतींचे शोषण व प्रशासनातील क्रौर्य

पुन्हा सुरू झाले. बदललेल्या परिस्थितीत तसे करणे ही इंग्लंडच्या साम्राज्यवादी अर्थव्यवस्थेची गरजच होती. उदारमतवादी ब्रिटीश अर्थशास्त्रज्ञ हॉबसन स्पष्टच म्हणतो की, " औद्योगिक, राजकीय व नैतिक प्रगतीसाठी मदत करून आपण हिन्दुस्थानची सुधारणा करीत आहो हा पुर्णतः भ्रम आहे. " लेनिननेही १९१६ मध्ये साम्राज्यशाहीचे आर्थिक विश्लेषण करून साम्राज्यशाही म्हणजे औद्योगिक भांडवलशाहीची परमोच्च अवस्था असते असा सिद्धान्त मांडला. " भांडवलशाहीच्या ज्या अवस्थेत मक्तेदारांचे व वित्तभांडवलाचे प्रभुत्व प्रस्थापित झालेले असते, भांडवलाच्या निर्यातीला विशेष महत्त्व प्राप्त झालेले असते आणि जगाची वाटणी प्रमुख भांडवली सत्तांत पूर्ण झालेली असते ती भांडवलशाहीची अवस्था म्हणजे साम्राज्यशाही होय. " साम्राज्य विस्तार ही इंग्लंडच्या प्रगत औद्योगिक भांडवलशाहीची गरज होती व आर्थिक शोषण हाच मुख्य हेतू होता हे स्पष्ट होते. या काळात उदारमतवाद व साम्राज्यवाद या दोन विचारांमध्ये इंग्लंडमध्ये संघर्ष निर्माण झाला. जॉन स्टुअर्ट मिलचा विरोध बाजूला सारून हिन्दुस्थानच्या प्रशासनाचे अधिकार ईस्ट इंडिया कंपनीकडून १८५८ मध्ये काढून घेऊन ब्रिटीश सम्राटांकडे सोपविण्यात आले — कंपनी सरकारची. येथील सुमारे शंभर वर्षांची कारकीर्द संपली. या संघर्षाचा परिणाम म्हणून ' गोऱ्यांच्या वसाहती ' व ' काळ्यांच्या वसाहती ' असा फरक करून काळ्यांच्या वसाहतींना ' शोषणाच्या वसाहती ' ठरवून इंग्लंडमधील वैचारिक संघर्षाची धार कमी करण्यात आली. ब्रिटीश भांडवलाच्यामागे ब्रिटीश साम्राज्याचे लष्करी सामर्थ्यच या १८५८ च्या नवीन सत्तांतरामुळे उभे करण्यात आले. ' शोषणाच्या वसाहती ' मध्ये जो असंतोष व जहाल राजकारण या नवीन धोरणामुळे निर्माण झाले ते दाबून टाकण्यासाठी लष्करी सामर्थ्याबरोबरच ' फोडा व झोडा ' नीति, संस्थानिकांशी संगनमत, इ. तंत्रांचा अवलंब करणे सुरू झाले. स्वदेशी, बहिष्कार व स्वावलंबन (खादी व ग्रामोद्योग) हे इंग्रजी साम्राज्याच्या भांडवली शोषणांच्या विरोधात भारतीय आर्थिक राष्ट्रवादाने उभारलेल्या व्यूहरचनेचे महत्त्वाचे भाग होते.

[ ४ ]

राष्ट्रवादाच्या आधुनिक संकल्पनेत " राष्ट्र " याचा अर्थ देशातील लोक असा आहे. त्यामुळे राजनिष्ठेची मध्ययुगीन कल्पना लयाला जाऊन, निष्ठेचा संबंध देशवासीयांशी जोडला गेला आहे. हा बदल एकदम झाला नसून गेल्या तीनशे वर्षांत टप्प्याटप्प्याने घडून आला हे प्रा. इ.आर. कार यांनी आपल्या राष्ट्रवादावरील पुस्तकात दाखवून दिले आहे. सतराव्या व अठराव्या शतकात राष्ट्र ही संकल्पना राज्यकर्त्यांशी निगडित होती; एकोणिसाव्या शतकात ती सिद्धान्तरूपाने लोकांशी जोडली गेली, पण प्रत्यक्षात राजसत्ता मध्यमवर्गाकडेच राहिली, आणि पुढे लोक म्हणजे राष्ट्रहित असे समिकरण दृढ झाले. इंग्रजी शिक्षणातून पुढे आलेल्या हिन्दी नेतृत्वावर युरोपात प्रवर्तित झालेल्या याच आधुनिक राष्ट्रवादाचा ठसा होता. परंतु युरोपप्रमाणे भारतीय राष्ट्रवादाचे मूळ राष्ट्र-राज्य स्थापनेच्या महत्त्वाकांक्षेत नसून परकीय सत्तेकडून होणाऱ्या आर्थिक शोषणातून लोकांना मुक्त करण्याच्या जनहितवादी भावनेत असल्याचे आढळते. कोण्या एका धार्मिक समुदायाचे नव्हे, तर सर्व एतद्देशियांचे राष्ट्र अशीच प्रमुख

विचारधारा येथे आढळून येते.

परकीय सत्तेचा विरोध हे आशिया-आफ्रिका खंडातील देशांच्या राष्ट्रवादाचे सर्वसामान्य लक्षणच आहे. भारतातही निरनिराळ्या भागात व काळांत क्रान्तिकारक राष्ट्रवादी उठाव परकीय सत्तेच्या विरोधात झाल्याची इतिहासात नोंद आहे. शौर्य, धैर्य, चारित्र्य इ. दृष्टीने असे प्रयत्न देशप्रेमाचा उच्चकोटीचा अविष्कारही असतात. परंतु आधुनिक भारतीय राष्ट्रवादाच्या उदयामध्ये परकीय सत्तेचा विरोध ही मुख्य प्रेरणा म्हणून आढळत नाही. हिन्दी नेत्यांनी, विशेषतः भारतीय राष्ट्रसभेने,अशा क्रान्तिकारक राष्ट्रवादी उठावांना प्रोत्साहन दिले नाही. ८ ऑगस्ट १९४२ चा ' छोडो भारत 'चा राष्ट्रसभेचा ठराव अपवाद म्हणून दाखविणे योग्य नाही कारण सरकार एकदम हिंस्त्र स्वरूप धारण करून चळवळ कठोरपणे दडपून टाकील अशी त्या वेळी अटकळ नव्हती. त्यामुळे वरिष्ठ नेत्यांच्या अभावी आंदोलन उग्र झाले.

हिन्दी राष्ट्रवादाचे स्वरूप मूलतः लोकशाही व उदारमतवादी असेच राहिले. कारण राज्यसत्तेचे मूळ लोकशक्तीमध्ये असल्याने राजकीय स्वातंत्र्य मिळविल्यावर लोकसत्ताक राज्य निर्माण करणे अशीच हिन्दी राष्ट्रवाद्यांची भूमिका होती.हिन्दी नेतृत्व फ्रेंच राज्यक्रान्ती, युरोपीय उदारमतवाद व व्यक्तीस्वातंत्र्य,व इंग्लंडमधील लोकसत्ताक राजकीय पद्धती यांनी प्रभावीत झालेले असे ज्ञाननिष्ठ व त्यागी नेतृत्व होते.दादाभाईवर तर ॲडम स्मिथ उदारमत-वादी अर्थविचारांचा फार प्रभाव होता.ते स्वतःला " मुक्त व्यापारवादी "च ("I am a freetrader" — १९०६ चे अध्यक्षीय भाषण) म्हणायचे. परंतु ॲडम स्मिथच्या विचारांप्रमाणे हिन्दी राष्ट्राची संपत्ती वाढविण्यासाठी, म्हणजेच वस्तुनिर्मितीकरिता कारखानदारी सुरू करण्यासाठी, औद्योगिक गुंतवणुकीसाठी जी भांडवल संचयाची आवश्यकता आहे त्या भांडवल प्रवाहाचे तोंड त्यांना इंग्लंडच्या दिशेकडे असलेले आढळले. या आर्थिक दोहनाला त्यांनी " रक्तस्राव "च म्हटले आहे. हा प्रवाह बंद होण्यासाठी, रक्तशोषण थांबविण्यासाठी त्या उदारमतवादी नेत्याने घटनात्मक पद्धतीने राजकीय जागृति निर्माण केली. दादाभाईंना भारतीय आर्थिक राष्ट्रवादाचे जनक मानले जाते.

" राष्ट्रभक्तीला येणारे आर्थिक फळ " असेही आर्थिक राष्ट्रवादाचे वर्णन करण्यात येते. इंग्रजी शिक्षण व अर्थशास्त्रीय दृष्टी यामुळे, ब्रिटीश येथे आल्याने काही आधुनिक सोयी होऊनही, हिन्दुस्थानचे आर्थिक रक्तशोषणामुळे दारिद्र्य वाढते आहे, इंग्रजी प्रशासनाचा येथील खर्च या देशाला न पेलण्याइतपत प्रचंड आहे, एकतृतियांशपेक्षा जास्त येथील कर उत्पन्न बदल्यात काही न मिळता बाहेर जाते, इ. प्रकारच्या राष्ट्राच्या आर्थिक शोषणाच्या जाणिवेतून आर्थिक राष्ट्रवाद वाढीस लागला. राष्ट्रीय चळवळीला आर्थिक राष्ट्रवादाचे अधिष्ठान प्राप्त झाले. हिन्दी राष्ट्रीय आंदोलनाबरोबरच आर्थिक राष्ट्रवादाची जडण-घडण होत होती.

आर्थिक राष्ट्रवाद म्हणजे केवळ अर्थवाद किंवा आत्यंतिक व्यापारवाद नव्हे. देशातील सामाजिक व सांस्कृतिक जीवन संपन्न करण्यासाठी अर्थनिर्मितीसंबंधी लोकांमध्ये राष्ट्रीय जाणीव व जबाबदारीची वृत्ती वाढीस लावणे ही आर्थिक राष्ट्रवादाची मुख्य विचारधारा आहे.

ॲडम स्मिथचे राष्ट्रीय संपत्तीच्या निर्मितीसंबंधीचे विचार व फ्रेडरिक लिस्टचे अशा संपत्ती निर्मितीसाठी ' राष्ट्रीय व्यवस्था ' बांधण्याचे विचार ह्या दोहोंचा भारतीय आर्थिक राष्ट्रवादावर परिणाम झाला. " लिस्टच्या मते राष्ट्रे इतिहासाने निर्माण केलेले केवळ नैतिक व राजकीय संघ नव्हेत, तर राष्ट्रे आर्थिक संघही असतात. ज्याप्रमाणे नागरिकांमधील नैतिक मिलाफामुळे राष्ट्र राजकीयदृष्ट्या सबळ होते, त्याचप्रमाणे राष्ट्रातील आर्थिक मिलाफामुळे देशातील नागरिकांची उत्पादनशक्ती वाढते व संपूर्ण राष्ट्राची भरभराट होते. " या आर्थिक मिलाफामुळे देशात जे उद्योगधंदे वाढीस लागतात त्यांना लिस्ट सामाजिक शक्तीस्त्रोत म्हणतो. ह्या सामाजिक शक्तीस्त्रोतांमुळे राष्ट्रातील सामाजिक, सांस्कृतिक जीवन संपन्न होत असते. हा आर्थिक मिलाफच आर्थिक राष्ट्रवादाचा गाभा होय. आर्थिक राष्ट्रवादाची कल्पना लिस्ट पुढाल शब्दात अधिक स्पष्ट करतो : " संस्कृति, कौशल्य व प्रचंड उतपादनाच्या शक्ती हव्या असतील, तर राष्ट्राने (लोकांनी) काही त्याग केला पाहिजे व काही मालमत्ता सोडून दिली पाहिजे. दुसऱ्या शब्दात, भविष्यातील सुख व संपन्नतेसाठी आजचे काही सुख व फायदे यांचा त्याग केला पाहिजे. " ॲडम स्मिथच्या विचारांमध्ये वैश्विक हिताचा मूळ धागा असला तरी आर्थिकदृष्ट्या विषम व वेगवेगळ्या आर्थिक अवस्थांमध्ये असलेल्या राष्ट्रांना ॲडम स्मिथचे " मुक्त व्यापाराचे " तत्त्वज्ञान न्याय देऊ शकत नाही असे लिस्टने दाखवून दिले. भारतीय आर्थिक राष्ट्रवादावर व हिन्दी नेत्यांवर लिस्टच्या विचारांचा असा प्रभाव पडला.

राजा राममोहन राय यांची ॲडम स्मिथ संबंधीची प्रतिक्रिया आर्थिक राष्ट्रवादी दृष्टी प्रक्षेपित करते : " ॲडम स्मिथचा सिद्धान्त सांगतो की आर्थिक विकास भांडवल संचयावर अवलंबून असतो. परंतु हिन्दुस्थानातील सध्याच्या कृषि-अर्थ संबंधांच्या रचनेत येथील शेतकऱ्यांना भांडवलसंचय करण्यासाठी किती वाव आहे ? काहीच नाही, हेच या प्रश्नाचे उत्तर आहे. कृषि-अर्थसंबंधांची पुनर्रचना केल्याशिवाय (विलीयम बेन्टींग यांनी ठरविलेले) हिन्दुस्थानचे ' आर्थिक आधुनिकीकरण ' होऊ शकणार नाही. पहिली आवश्यक गोष्ट म्हणजे शेतकऱ्याचे त्याच्या जमिनीमध्ये आत्महितैष (स्टेक) निर्माण केले पाहिजे. असे झाल्यास भांडवलसंचयाची काही शक्यता आहे. " पुढे न्या. रानडे यांनी भारतीय आर्थिक राष्ट्रवादाची अधिक स्पष्ट मांडणी केली. हिन्दी राष्ट्रीय अर्थशास्त्राची न्या. रानडे यांनी १८९२ मध्ये स्वतंत्र मांडणी केली, " आर्थिक राष्ट्रवादाच्या व्यूहरचनेचा प्रथम विचार न करता राजकीय मार्गाचा शोध घेणे रानड्यांना मान्य नव्हते.स्वातंत्र्याच्या मागणीचा आधार तयार करण्यासाठी औद्योगिक विकासाला पोषक असे जनमत प्रथम निर्माण केले पाहिजे.राष्ट्रीय स्वातंत्र्याची भावना फुलविण्याबरोबरच,मजबूत व स्वतंत्र राष्ट्र म्हणजे काय हे लोकांना समजले पाहिजे. रानड्यांच्या मते (अ) औद्योगिकीकरण हे आर्थिक राष्ट्रवादाचे सार होते, (ब) हिन्दुस्थानातील दारिद्र्य दूर करण्याचा औद्योगिकीकरण हा मार्ग आहे आणि (क) सरकारी साहाय्य व संरक्षणाशिवाय औद्योगिकरणाला आवश्यक तसा वेग येणार नाही. " याशिवाय आर्थिक-राष्ट्रबांधणीसाठी आधुनिक जीवनमूल्ये अंगिकारण्याची आवश्यकता स्पष्ट केली. चांगले ऐहिक जीवन जगणे, भांडवल संचय करणे, निर्वेध सामाजिक व आर्थिक चलनवलनाच्या

मार्गात येणाऱ्या जुन्या समजुती व मूल्ये दूर करण्यासाठी रानड्यांनी आर्थिक राष्ट्रवादाच्या विकासाला पोषक असा कार्यक्रमच दिला. "प्रारब्धाची कल्पना एखाद्या रोग फैलावणाऱ्या जंतूसारखी असून ती आपली साहसशक्ती व निर्माणक्षमता नष्ट करीत आहे." असे रानड्यांचे विश्लेषण असून ते या संबंधात असे आवाहन करतात की धर्माचे व सामाजिक संबंधांचे नियमन तत्त्व बुद्धीप्रामाण्य असले पाहिजे.

हिन्दी दारिद्र्याचा प्रश्न साम्राज्यातील शोषणव्यवस्थेशी जोडलेला असून हिन्दुस्थान व इंग्लंड ह्या दोहोंच्या हितासाठी शोषणव्यवस्था नष्ट होणे आवश्यक आहे असे इंग्रजी सत्तेला पटवून देण्याचा दादाभाईंनी दीर्घकाल प्रयत्न केला. परंतु त्यांच्या पदरी निराशाच आली. ते उदारमतवादी अर्थशास्त्राचे पुरस्कर्ते होते, पण त्यांनाही आर्थिक राष्ट्रवादी भूमिका घ्यावी लागली. १९०६ मधील त्यांच्या शेवटच्या अध्यक्षीय भाषणात ते म्हणतात, "मी मुक्त व्यापारवादीच आहे, तरीही मी म्हणतो की 'स्वदेशी' सध्याच्या अस्वाभाविक गोंधळामुळे (इंग्रजी व्यापार धोरणामुळे) आमच्यासाठी अत्यावश्यक झाली आहे. जोपर्यंत भारतमातेच्या मुलांच्या तोंडातून घास काढून सुमारे २० कोटी रुपये दरवर्षी परदेशस्थांचे पगार, पेन्शन इ. च्या रूपाने बाहेर पाठवून हिन्दुस्थानचे दारिद्र्य वाढविले जाते, तोपर्यंत 'स्वदेशी' ही आमची गरजच आहे."

महात्मा गांधी हे या आर्थिक राष्ट्रवादी विचारांचे "वारसदार" ठरले. १९ व्या शतकातील हिन्दी नेतृत्वासंबंधी गांधी म्हणत "ते झाले नसते, तर आम्हीही झालो नसतो." साम्राज्यशाही सत्तेकडून होणाऱ्या शोषणाची त्यांना पूर्ण जाणीव होती. १९२५ मध्ये गांधी म्हणतात : इंग्लंड हे इतर देशाच्या आर्थिक शोषणावर जगते. हे आर्थिक शोषण दादाभाईंनी दाखवून दिलेल्या होमचार्जेस व इतर खंडणीपेक्षाही जास्त घातक आहे. मी त्यांचा शिष्य असल्याने व त्यांच्या मार्गावरच चालत असल्याने मी त्यातील बारकावा शोधला व त्याला मी आर्थिक दोहन म्हणतो आमचा कामधंदाच बुडवून टाकणारे व आम्हाला नष्ट करणारे असे हे दोहन आहे. पण गांधी अंतर्गत निस्सारणावर जास्त भर देऊन भारतीय आर्थिक राष्ट्रवादाला वास्तवतेचे अधिष्ठान पुरवितात. हिन्दुस्थान खेड्यांतून राहतो व शहरे खेड्यांच्या शोषणावर जगतात अशी स्पष्ट मांडणी गांधी करतात. 'स्वदेशी' म्हणजे केवळ देशी उद्योगांचा विकास अशी गांधीची भूमिका नव्हती. जनतेचे ताबडतोबीचे प्रश्न अन्नवस्त्राचे आहेत. खेडी उद्ध्वस्त झाली आहेत. खेड्यांची अर्थव्यवस्था सुधारण्यास मदत करणारी अशी गांधींची 'स्वदेशी'ची संकल्पना होती. रानड्यांप्रमाणेच गांधीजी राजकीय स्वातंत्र्याची वाट पाहत बसण्यापेक्षा आपणच आर्थिक दृष्टीने स्वतंत्र होण्याचा देशाला मंत्र देतात. हिन्दुस्थानच्या राजकीय पराभवाचे मूळ आर्थिक अवनतीमध्ये आहे, हा देश खेड्यांचा देश आहे तेव्हा प्रत्येक खेड्याने स्वावलंबी व्हावे अशी भूमिका घेऊन 'आर्थिक राष्ट्रीयत्व' निर्मितीचा व्यापक कार्यक्रमच गांधीजी देशापुढे ठेवतात. प्रत्येक व्यक्तीची आर्थिक राष्ट्रवादातील जबाबदारी गांधी निश्चित, कार्यक्रमबद्ध करून देऊन राष्ट्रीय चळवळीला जनसागराचे स्वरूप प्राप्त करून देतात.

म. गांधी व पं. नेहरू यांच्या आर्थिक विचारात प्रचंड अंतर असूनही राजकीय जागृतीसाठी नेहरूंना गांधींचा आर्थिक कार्यक्रम व्यवहारी वाटत होता. नेहरूंवर रशियन क्रान्ती, मार्क्सवाद, उदारमतवाद, विज्ञान व वसाहतवादातील साम्राज्यवादी शोषणाचे अर्थशास्त्र यांचा निश्चित प्रभाव होता. त्यामुळे भारताच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी त्यांनी राष्ट्रीय आर्थिक नियोजनाचे तंत्र विकसित करण्यावर विशेष भर दिला. १९२९-३० मध्येच त्यांनी या कामासाठी आर्थिक विकासाचे विविध पैलू व प्रश्न स्पष्ट होण्यासाठी २३ उपसमित्या निर्माण करून अभ्यास अहवाल तयार करून घेतले. तसेच औद्योगिक साम्राज्यशाहीच्या शोषणाविरुद्ध आशिया व आफ्रिकेतील स्वातंत्र्येच्छू लहानलहान देशांची एक आंतरराष्ट्रीय फळी उभारण्यासाठी बरेच श्रम घेतले. १९३५ मध्ये राष्ट्रसभेच्या फैजपूर अधिवेशनातील अध्यक्षीय भाषणातून त्यांची आर्थिक राष्ट्रवादासंबंधीची भूमिका वरीच स्पष्ट होते : ‘राष्ट्रसभेची भूमिका आज पूर्ण लोकशाहीची असून लोकशाही राज्य स्थापनेसाठी ती संघर्ष करीत आहे. राष्ट्रसभा साम्राज्यविरोधी असून आपल्या राजकीय व आर्थिक रचनेत मोठे बदल घडवून आणण्यासाठी संघर्ष करीत आहे. .. घटनांचा क्रम आपल्याला समाजवादाकडे नेईल अशी मला आशा आहे कारण भारताच्या आर्थिक दुखण्यावर समाजवाद हाच एक उपाय आहे असे माझे मत आहे.’ आर्थिक नियोजनाचा विचार प्रथम न्या. रानड्यांनी मांडला. नेहरूंनी नियोजनाचे तंत्र विकसित केले. देशबांधणीसाठी आवश्यक इकॉनॉमिक इंजिनिअरींग वाढविले.

लिस्टच्या आर्थिक राष्ट्रवादातून पुढे आर्थिक साम्राज्यवाद निर्माण झाल्याने गेली काही दशके आर्थिक राष्ट्रवांद दुर्लक्षित झाल्यासारखा वाटतो. परंतु भारतीय आर्थिक राष्ट्रवादाची जडणघडण याबाबत स्वच्छ व स्पष्ट आहे. ज्या राष्ट्रीय चळवळीतून आर्थिक राष्ट्रवाद येथे आकारास आला ती चळवळ पूर्णतः सेक्युलर व मानवतावादी होती. युरोपप्रमाणे राष्ट्रराज्य स्थापण्याची भूमिकाच नव्हती. येथील दारिद्र्य, दैन्य व दुष्काळाच्या मुळाशी संपत्तीची लूट व खंडणी आहे या साक्षात्कारातून आर्थिक राष्ट्रवादाचे येथे बिजारोपण झाले. पुढे औद्योगिक साम्राज्याच्या आर्थिक मिमांसेतून वसाहतीच्या आर्थिक दोहनाची क्रिया स्पष्ट झाल्यावर या साम्राज्यवादी आर्थिक दोहनाच्या विरोधात राष्ट्रीय चळवळीची येथे जी वाटचाल झाली त्यातून आर्थिक राष्ट्रवादाची वाढ होत गेली. विशेष म्हणजे हिन्दी नेत्यांनी आशिया व आफ्रिका खंडातील अशा राष्ट्रीय चळवळींबरोबर भ्रातृभावाचे संबंधही बांधले. अलिप्त राष्ट्रांच्या चळवळीची निर्मिती व विकासामध्ये भारताचे कार्य महत्त्वाचे आहे. स्वातंत्र्योत्तर भारताचे इतर मागास देशांना तांत्रिक व आर्थिक सहकार्य करण्याचे, साम्राज्यवाद विरोधी लढ्यांना मदत करण्याचे धोरण व एकूणच जागतिक शांततेसंबंधीची निश्चित भूमिका भारतीय आर्थिक राष्ट्रवादाचे मानवतावादी स्वरूप स्पष्ट करण्यास पुरेशी आहे.

संदर्भ सूची :

१ व २. दादाभाई नवरोजी : अध्यक्षीय भाषण - १८८६ (राष्ट्रसभा) ए. एम.शैदी (संपा.) - स्पीचेस ॲन्ड रायटिंग्ज ऑफ दादाभाई नवरोजी, भाग-१, अनुक्रमे पान १६ व १८

३. ताराचंद : हिस्ट्री ऑफ फ्रिडम मूव्हमेन्ट इन इंडिया, भाग २, पान ३४८

४. दादाभाई नवरोजी : व्ही. डी. महाजन - लीडर्स ऑफ नॅशनल मूव्हमेन्ट व ए.एम. शैदी संपादीत ' स्पीचेस ॲन्ड रायटींग्ज़ ऑफ दादाभाई नवरोजी, भाग - १, पान २३६

५. वासुदेवशास्त्री खरे : गोविन्द तळवलकर - ' नवरोजी ते नेहरू ' मधून

६. ताराचंद : हिस्ट्री ऑफ फ्रिडम मूव्हमेन्ट इन इंडिया, भाग - २, पाने १०६-७

७. कार्ल मार्क्स : ऑन कलोनियालिझम, पान ३-४, —बी. एन.गांगुली यांच्या ' इंडियन इकॉनॉमिक थॉट ' मधून, पान १३६

८. ए. सी. नोलस् : इंडस्ट्रियल ॲन्ड कमर्शियल रिव्होल्यूशन्स, पाने ६ - ७.

९. बर्ट्रन्ड रसेल : विझडम ऑफ द वेस्ट, पान ३१३.

१०. गोविन्द तळवलकर : नवरोजी ते नेहरू, पान २८

११. ताराचंद : हिस्ट्री ऑफ फ्रिडम मूव्हमेन्ट इन इंडिया, भाग - २, पान ३४७

१२. डॅनियल थॉर्नर : डी-इंडस्ट्रियलायझेशन ऑफ इंडिया १८८१-१९३१, ताराचंद यांच्या हिस्ट्री ऑफ फ्रिडम मूव्हमेन्ट मधून

१२ अ. जिड ॲन्ड रिस्ट : हिस्ट्री ऑफ इकॉनॉमिक डॉक्ट्रीन्स पान ४६

१२ ब. ॲडम स्मिथ : द वेल्थ ऑफ नेशन्स, पुस्तक V, प्रकरण १,

: भाग III. पान २४३ - व्ही. बी. सिंग (संपा.) इकॉनॉमिक हिस्ट्री ऑफ इंडिया, पान ४८७

१२ क. रोमेश दत्त : इकॉनॉमिक हिस्ट्री ऑफ ब्रिटिश इंडिया (१९०२ आवृत्ति), प्रस्तावना

१२ ड. अरुण बोस : व्ही. बी. सिंग संपादित ' इकॉनॉमिक हिस्ट्री ऑफ इंडिया ' मधील निबंध ' फॉरेन कॅपिटल ',पाने ४८७, ४८८ व ४९१.

१३. बी. एन. गांगुली : इंडियन इकॉनॉमिक थॉट, पान ६

१४. जे. ए. हॉबसन : 'इम्पिरिॲलीझम' पान ९ (आर.एस.चव्हाण यांच्या 'नॅशनॅलिझम इन एशिया' मधून)

१५. लेनिन : निवडक लेख, भाग ३, पाने १०५-६

१६. इ. एच. कार : नॅशनॅलिझम ॲन्ड आफ्टर, पाने १-२ (आर.एस. चव्हाण यांच्या 'नॅशनॅलिझम इन एशिया' मधून)

१६ अ. एफ. एल. शूमन : इन्टरनॅशनल पॉलिटिक्स, पान ३२६ (आर.एस. चव्हाण यांच्या 'नॅशनॅलिझम इन एशिया' मधून)

१७. जिड ॲन्ड रिस्ट : हिस्ट्री ऑफ इकॉनॉमिक डॉक्ट्रीन्स, पान २९७

१८. फ्रेडरिक लिस्ट : नॅशनल सिस्टीम, पान ११७ जिड ॲन्ड रिस्ट यांच्या 'हिस्ट्री ऑफ इकॉनॉमिक ड्रॉक्ट्रीन्स' मधून)

१९. बी. एन. गांगुली : इंडियन इकॉनॉमिक थॉट, पाने ४७-४८

२०. बी. एन. गांगुली : इंडियन इकॉनॉमिक थॉट, पान १७१

२१. एम. जी: रानडे : बी. एन. गांगुली यांच्या 'इंडियन इकॉनॉमिक थॉट' मधून - पान १६७

२१ अ. दादाभाई नवरोजी : १९०६ चे राष्ट्रसभेतील अध्यक्षीय भाषण (ए.एम.झैदी संपादीत स्पीचेस ॲन्ड रायटिंग्ज़ ऑफ दादाभाई नवरोजी, भाग - १, पान ९५

# राष्ट्रसभेचे राजकारण आणि राजवाडे

डॉ. प्र.न. देशपांडे

इतिहासाचार्य राजवाडे यांनी इतिहाससंशोधन क्षेत्रात केलेली कामगिरी अलौकीक स्वरूपाची आहे यात शंका नाही. तथापि इतिहासक्षेत्राप्रमाणेच भाषा, व्याकरण, वाङ्मय, समाजशास्त्र, मानववंशशास्त्र इत्यादी क्षेत्रातही त्यांनी मौलिक कामगिरी केलेली आढळून येते. इतिहासाचार्य राजवाड्यांच्या अफाट संशोधनकार्याची साक्षेपी चिकित्सा अद्यापपावेतो कोणी केलेली नाही ' समग्र राजवाडे वाङ्मय ' प्रकाशित करण्याचा प्रकल्पही अजून सिद्ध झालेला नाही. राजवाडे यांचे विविध क्षेत्रातील कार्य एवढे मोलाचे असूनही अभ्यासकांनी ' संदर्भ साहित्य ' एवढ्या एकाच मापाने राजवाड्यांच्या साहित्याचे महत्त्व मोजलेले आढळते. डॉ. प्र. न.जोशी यांनी ' राजवाडे विचारदर्शन ' हा ग्रंथ १९६५ मध्ये लिहिला. राजवाड्यांच्या असामान्य कामगिरीची ओळख अभ्यासू व सामान्य वाचकांना पटावी, या हेतूनेच डॉ. जोशींनी या ग्रंथाचा प्रपंच केला. स्वतः जोशी लिहितात, ' इतिहास,इतिहाससशोधन, इतिहासमीमांसा, सामाजिक विचार, वाङ्मयसंशोधन, साहित्यचिकित्सा, भाषा व व्याकरण, लिपी व शिलालेख इत्यादी विविध क्षेत्रांत राजवाडे यांनी जे अतिप्रगल्भ विचार प्रगट करून ग्रंथनिर्मिती केली, स्फुट लेखन केले, त्यांचा सर्वांगीण परामर्श घ्यावयाचा म्हणजे प्रत्येक विषयावर एक एक स्वतंत्र ग्रंथ लिहावा एवढी प्रत्येकाची योग्यता आहे. ' अभ्यासकांनी विविध विषयांच्या, विशेषतः इतिहास संशोधनाच्या संदर्भात राजवाड्यांच्या विचारांची स्थलपरत्वे आणि आपल्या संशोधन विषयांच्या मर्यादेत चर्चा आणि चिकित्सा करण्याचे प्रयत्न आतापावेतो केलेले आहेत. विशेष म्हणजे अशा फुटकळ स्वरूपाच्या चिकित्सेतून राजवाड्यांनी मांडलेले राजकारणाविषयीचे विचार तर पूर्णतः निसटलेले आहेत.

एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस ' अखिल भारतीय राष्ट्रसभा ' (स्थापना इ.स. १८८५) स्थापन झाली. १८८५ ते १९०५ या कालखंडात राष्ट्रसभेच्या नेत्यांनी इंग्रजांच्या न्यायबुद्धीवर (!) विश्वास ठेवून अर्जविनंत्याद्वारे काही किरकोळ राजकीय हक्क पदरात पाडून घेण्यासाठी निष्फळ प्रयत्न केले. लॉर्ड कर्झनने १९०५ मध्ये बंगालची फाळणी केल्यानंतर व शिक्षण, स्थानिक संस्था यासारख्या क्षेत्रात सरकारी वर्चस्व वाढवल्यामुळे राष्ट्रसभेच्या बहुसंख्य नेत्यांचा

भ्रमनिरास झाला. तरुण रक्ताच्या नेत्यांचा तर इंग्रजी सत्तेवरील विश्वास उडाला. ‘ स्वराज्य, राष्ट्रीय शिक्षण, स्वदेशी व बहिष्कार ’ या त्रिसूत्रीचा पुरस्कार करून राष्ट्रसभेतील बहुसंख्य तरुण नेत्यांनी जहाल मार्गाची वाटचाल सुरू केली. त्यातून सुरतेच्या अधिवेशनात (१९०७) राष्ट्रसभा दुभंगली. आधुनिक भारताच्या इतिहासात या अभूतपूर्व घटना घडत असताना राजवाड्यांसारखे चिंतनशील विचारवंत कधी स्फुट लेखातून, तर कधी सहकाऱ्यांबरोबर झालेल्या चर्चेतून राष्ट्रसभेच्या कार्याविषयी परखड मते मांडत होते. लोकमान्य टिळकांच्या निधनानंतर (१९२०) म. गांधींच्या नेतृत्वाखाली राष्ट्रसभेने असहकाराचां लढा ब्रिटीश सत्तेविरुद्ध पुकारला. या लढ्याचे एक साक्षीदार राजवाडे होतेच. राष्ट्रसभेच्या परिवर्तनशील लढ्याचे निरिक्षण करून राजवाड्यांनी स्फुट लेखातून वेळोवेळी मते मांडली, एवढेच नव्हे तर राष्ट्रीय कार्याला मार्गदर्शक ठरतील अशा सूचनाही त्यांनी केल्या. परंतु राजवाडे स्वतः राष्ट्रसभेच्या राजकारणापासून अलिप्त होते. तसेच राष्ट्रीय चळवळीला उत्तेजन देणारे वा मार्गदर्शन करणारे हे पत्रकारही नव्हते. त्यामुळे त्यांनी मांडलेल्या राजकारणविषयक विचारांकडे अर्वाचीन अभ्यासकांचे पूर्णतः दुर्लक्ष झालेले दिसून येते. वास्तविक पाहता, तटस्थ दृष्टिकोणातून राजवाड्यांनी राष्ट्रसभेच्या राजकारणाची केलेली मिमांसा निश्चितच उद्बोधक आहे. शं. ना. जोशी यांनी म्हटल्याप्रमाणे, ‘ राजवाडे ह्यांचा चालू राजकारणाशी किंवा समाजकारणाशी संबंध केवळ आचारापुरता म्हणजे त्रयस्थ या नात्यानेच होता. तेव्हा अशा त्रयस्थांचे म्हणणे कित्येकवेळा अवश्य विचारात घेण्याजोगे असते. ... राजवाडे यांचे स्वदेशी, राष्ट्रीय सभा, स्वराज्य ह्यासंबंधीचे लेख ह्याच दृष्टीने म्हणजे कोणताही पक्षस्थपणा नसताना लिहिलेले असल्यामुळे विचारणीय वाटणे साहजिक आहे. ’ राजवाड्यांनी ज्याप्रमाणे स्फुट लेखातून आपली राजकारणाविषयी मते व्यक्त केली आहेत, त्याचप्रमाणे स्नेह्यांबरोबर वारंवार होणाऱ्या चर्चेतूनही आपली स्वतंत्र मते मांडलेली आढळतात. स्वराज्यप्राप्तीसाठी राजवाड्यांना कोणत्या प्रकारचे राजकारण अभिप्रेत होते ते खाजगी बैठकीतील चर्चेत त्यांनी स्पष्ट केलेले दिसून येते. सशस्त्र क्रांतीचे दिवास्वप्न ते पाहात होते. परंतु वास्तवाचे त्यांना भान असल्यामुळे, सशस्त्र क्रांतीची शक्यता त्यांनी त्याज्य ठरविली. लोकमान्यांच्या जहाल राजकारणामुळे ते प्रभावित झाले. तथापि या जहाल राजकारणातील कच्चेपणा त्यांना जाणवला होता. म. गांधीजींच्या असहकाराच्या लढ्याकडे एक ‘ उत्तम पर्याय ’ म्हणून त्यांनी पाहिले. परंतु त्याचबरोबर या लढ्याच्या परिणामांची मर्यादाही त्यांनी ओळखली. थोडक्यात, राष्ट्रसभेच्या राजकारणाकडे केवळ त्रयसथपणेच नव्हे, तर डोळसपणे लक्ष देऊन राजवाड्यांनी आपली मते जबाबदारीनं मांडली असे दिसून येते.

## सशस्त्र क्रांतीचे दिवास्वप्न

इतिहासाचार्य राजवाडे यांचे देशप्रेम अतिशय जाज्ज्वल्य होते.मराठ्यांच्या इतिहासाची साधने गोळा करून त्यांचे विश्लेषण करीत असताना राजवाड्यांना मराठ्यांच्या गुणांचे व

दोषांचे बारकाइने अवलोकन करता आले. संशोधनाची साधने गोळा करण्यासाठी राजवाडे थेट बंगालपर्यंत भ्रमंती करून आले. नेमक्या त्याच सुमारास बंगालमध्ये राष्ट्रीय चळवळीचे वारे वाहू लागले होते. तेथे चाललेल्या गुप्त चळवळीविषयी राजवाड्यांना मोठी आस्था वाटत होती. इटालियन प्रदेशात कार्बोनरीसारख्या जशा गुप्त संघटना स्थापन झाल्या होत्या, तशा प्रकारच्या संघटना भारतामध्ये, विशेषतः बंगालमध्ये स्थापन होऊन राष्ट्रीय चळवळ गतिमान होऊ शकेल,असा त्यांचा होरा होता.' प्रतोद ' मासिकाचे संपादक आणि राष्ट्रीय चळवळीचे कार्यकर्ते वा. दा. मुंडले हे राजवाड्यांचे स्नेही होते. त्यांनी राजवाड्याबरोबर राष्ट्रीय चळवळीविषयी वारंवार चर्चा केली व त्यांची मते अजमावून घेण्याचा सातत्याने प्रयत्न केला.

कॉंग्रेसच्या स्थापनेनंतर १९०५ पर्यंत म्हणजे बंगालची फाळणी होईपर्यंत - कॉंग्रेसच्या नेमस्त वृत्तीच्या नेत्यांनी मर्यादित राजकीय हक्कांच्या प्राप्तीसाठी सनदशीर मार्गाचाच प्रामुख्याने अवलंब केला. राजवाड्यांना त्यातून काही निष्पन्न होईल असे वाटत नव्हते. १८७० पूर्वी जर्मनी व इटली प्रदेशात तेथील लोकांनी ज्या राष्ट्रवादी चळवळी केल्या, त्याचा प्रभाव भारतातील राष्ट्रप्रेमी, सुजाण नागरिकांवर त्या काळात निश्चितच पडलेला होता. जोसेफ मॅझिनी, गॅरिबाल्डी, काव्हूर, प्रिन्स बिस्मार्क इत्यादी राष्ट्रवादी चळवळींच्या नेत्यांची चरित्रे भारतीय भाषांतून विसाव्यां शतकाच्या पूर्वार्धात अनेक लेखकांनी लिहिली. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात भारतीय वाङ्मयातून राष्ट्रवादी विचारांचे प्रभावी प्रगटीकरण आढळून येते. कॉंग्रेसच्या जहाल लढ्याचा मार्ग १९०७ मध्ये जरी उदयास आलेला असला तरी त्याचे खरे विकसित परिणामकारक स्वरूप १९२० नंतर पहावयास मिळते. त्यामुळे विसाव्या शतकाच्या पहिल्या २।३ दशकात तरी इटली, जर्मनी आणि जपान या राष्ट्रांच्या इतिहासाचा आदर्श भारतीय राष्ट्रवादी चळवळींना प्रेरक ठरेल असे अनेक विचारवंतांना वाटत होते.

एका चर्चेमध्ये राजवाड्यांनी मुंडले यांना सांगितले होते की, ' राज्यक्रान्ती हे केवळ भावना व उच्छृंखल उत्साह यांचे काम नसून तेथे खोल विचार, अखंड चालना, सावधानता, कारस्थानपटुत्व, समयज्ञता, आणि मग अचाट साहस आणि धैर्य इतक्या गुणसमुच्चयाची त्यास आवश्यकता असते --- दैवगती व मानवी प्रयत्न यांचा एकत्र संयोग झाल्याची उदाहरणे म्हणून बिस्मार्क व जर्मन बादशहा विल्यम, काव्हूर व पिंडमॉंटचा राजा व्हिक्टर इमॅन्युअल, तसेच शिवाजी व रामदास यांची उदाहरणे लक्षात घेण्यासारखी आहेत ' राजवाड्यांनी मांडलेले विचार अधिक स्पष्ट करताना मुंडले लिहितात, ' हिन्दुस्थानातील क्रान्ती येथील एखाद्या बड्या संस्थानिकास हाताशी धरून एखाद्या ब्राह्मण मुत्सद्याने - उदा. गोखल्यांसारख्या नेमस्त वृत्तींच्या पण त्यांच्याहून अधिक बुद्धिमान व धीट माणसाने घडवून आणण्याचा प्रयत्न करावा व तसे होणेही शक्य आहे असे राजवाड्यांना सुरत कॉंग्रेसचा बखेडा होण्यापूर्वी लॉर्ड कर्झन आणि किचनेर यांचा अंमल जारी होण्यापूर्वी वाटत होते ; पण कर्झनची राजकीय दक्षता की जीमुळे देशी संस्थानिकांची सत्ता संपुष्टात येऊन ते केवळ साम्राज्याची कळसूत्री बाहुली बनले व किचनेरने हिंदी सैन्याची केलेली पुनर्घटना पाहिल्यावर त्यांची त्याबाबतीत निराशा झाली व मग त्यांची दृष्टी राष्ट्रीय सभेची चळवळ वा गुप्त मंडळ्यांची हालचाल याकडे वळली. '

राजवाडे म्हणतात त्याप्रमाणे एखाद्या मुत्सद्याने एखाद्या बड्या हिंदी संस्थानिकास हाताशी धरून राज्यक्रान्ती करण्यासारखी परिस्थिती भारतात नव्हती. १८१५ मध्ये व्हिएन्ना काँग्रेसने इटली व जर्मनी प्रदेशांची चिरफाड करून वेगवेगळ्या तुकड्यावर वेगवेगळ्या युरोपीय राष्ट्रांची सत्ता प्रस्थापित जरी केलेली होती तरी प्रशिया हे जर्मन राज्य आणि सार्डिनिया पिडमाँट हे इटालियन राज्य पूर्णता सार्वभौम ठेवण्यात आलेले होते. त्यामुळेच बिस्मार्कला व काव्हूरला अनुक्रमे प्रशिया व पिडमाँट येथील राज्यकर्त्यांच्या उत्तेजनामुळे लष्करीदृष्ट्या समर्थ करणे शक्यप्राय झाले. उलट भारतामध्ये १८५७ च्या उठावानंतर भारतीय संस्थानिकांना इंग्रजांनी आपल्या वज्रमुठीत पक्के बंदिस्त करून ठेवले होते.साम्राज्यवादी लॉर्ड कर्झनने ही पोलादी पकड अधिक घट्ट केली एवढेच.

## काँग्रेसचा सनदशीर मार्ग

१८८५ ते १९०५ या कालखंडात काँग्रेसने म्हणजे राष्ट्रसभेने सनदशीर मार्गाचा अवलंब करून मर्यादित राजकीय हक्क पदरात पाडून घेण्याचा प्रयत्न केला. राजवाडे यांचा या मार्गावर अजिबात विश्वास नव्हता. राष्ट्रसभेची स्थापना करण्यात ए.ओ.ह्यूम, वेडरबर्न, हेन्री कॉटन इत्यादी इंग्रज अधिकाऱ्यांनी भाग घेतला हीच गोष्ट मुळी राजवाड्यांना संशयास्पद वाटत होती. ' गोखल्यांची इंग्लंडांतील कामगिरी ' या लेखात राजवाड्यांनी आपला संशय स्पष्ट केलेला आहे.

' राज्य आपले, इंग्रज व आपण एक आहो, असे गोखल्यांचे म्हणणे. आता प्रतिवाद्याच्या तर्फेचे म्हणणे काय आहे ते पाहू. प्रतिवाद्याच्या गोटांतील ह्यूम, कॉटन, वेडरबर्न, डिम्बी वगैरे मंडळी वेड घेऊन पेडगावला जाणारी आहेत. कृती परजनांसारखी व उक्ती मात्र स्वजनांच्यासारखी, असा मानभावी प्रकार या मंडळींचा आहे. तेव्हा यांची जबानी विश्वासार्ह मानता येणार नाही. ' असे विचार मांडून राजवाड्यांनी इंग्रज लोक भारताकडे कोणत्या दृष्टीने पाहतात हे स्पष्ट करण्यासाठी मेरेडिथ हौनसेंड नावाच्या इंग्रजाने लिहिलेल्या 'Asia in Europe' या ग्रंथातील उतारे उद्‌धृत केले आहेत. त्यातील एक उतारा पुढे देत आहे.

'The (English) race will never make terms, never merge in the (Indian) population (as the Moslems did), never be anything but rullers. (Englishman) never willingly accepts any position but one, that of unquestioned rulers. The European (English) cannot merge himself in the Asiatic (Indian) without a sense of degradation .

याच लेखात राजवाड्यांनी संशोधनासाठी अंगिकारलेल्या आपल्या भ्रमंतीतील एक मजेदार किस्सा सांगितलेला आहे. कुलकत्याला राजवाडे गेले असताना त्यांना एक बोटीचा कप्तान भेटला. कप्तानाबरोबर बोट पाहण्यासाठी राजवाडे गेले असताना दोघांमध्ये अनेक विषयांची चर्चा झाली. त्या चर्चेत राष्ट्रसभेचा विषयही निघाला. त्यावर त्या दोघांचा संवाद झाला तो पुढीलप्रमाणे,

" तो म्हणाला, ' तुमची ही राष्ट्रसभा मूळ काढिली कोणी ? ' मी उत्तर केले, ' डफरिन व ह्यूम वगैरे इंग्रजांनी ' यावर तो म्हणाला, ' मग तुम्ही हिला राष्ट्रसभा कशी म्हणता ? अमेरिकेत किंवा इतर कोणत्याही स्वतंत्र देशात जिथं परका माणूस आहे व जी विशेषतः परक्या माणसांच्या प्रोत्साहनाने निघाली आहे तिला कोणी राष्ट्रसभा म्हणणार नाही. डफरिन, ह्यूम, कॉटन, वेडरबर्न वगैरे मंडळी पंधराशे राज्यकर्त्यांपैकी आहेत; आणि त्यांचे ज्या सभेत अंग आहे, नव्हे वर्चस्व आहे, ती हिंदी लोकांची राष्ट्रसभा कशी होईल ? नंतर किंचित हसून तो म्हणाला, तुम्ही लोक अद्यापि राजकीयदृष्ट्या बाल्यदशेत आहा, स्वपरभेद अद्याप तुमच्या लक्षातच आला नाही. संशय हा पदार्थ अद्याप तुम्हाला शिवला नाही. लहान पोरे कान उपटला म्हणजे रागावतात आणि लागलीच पाठीवरून हात फिरविला म्हणजे हसतात, तशातला तुमचा बालस्वभाव आहे. लांडगे कोकराचे स्नेही होणे ह्या हिन्दुस्थानातच शक्य असल्यास न कळे. एवढे बोलून, तो काही वेळ निमूट बसला आणि एकदम काही नवे आठवल्यासारखे करून व माझा हात दाबून म्हणाला, 'भल्या माणसा, ऐक, तुला एक कानगोष्ट सांगतो. जाणता व कर्ता कोणताही युरोपियन माणूस स्वहित व स्वराष्ट्रहित सोडून कोणतेही काम कधीच करीत नसतो. ' ह्या गृहस्थाचे राष्ट्र अमेरिकेतील युनायटेड स्टेटस् होते आणि ह्याचे आईबाप जर्मन होते. "

वरील किस्सा उद्धृत केल्यानंतर राजवाडे यांनी स्पष्ट केले आहे की, ' ज्या दहावीस मागण्या राष्ट्रसभेने राज्यकर्त्यापाशी केल्या, त्यापैकी गेल्या वीस वर्षांत एकही फलद्रुप झाली नाही; इतकेच नव्हे, तर केलेल्या मागण्यांचा उलट प्रकार झालेला आहे. ' राष्ट्रसभेच्या नेत्यांच्या संदर्भात राजवाडे लिहितात, ' पन्नास वर्षे मागण्या करकरून दादाभाई तरण्याचे म्हातारे झाले, आणि वीस वर्षे मागण्या करून तिशीच्या आतील उमेदवार पन्नाशीच्या घरात गेले,तरी, अजून हे मागण्यांचे खूळ चालावेच ना ? शास्त्र आणि अनुभव फुकटावारीच जावा ?

राजवाड्यांच्या विवेचनावरून एक गोष्ट स्पष्ट होते. ती म्हणजे नेमस्तांचा सनदशीर मार्ग कुचकामी ठरला किंवा ठरत आहे असे त्यांचे स्पष्ट मत १९०५ नंतर बनले होते. केवळ भाषणबाजीने अन् इंग्रजांच्या अनुनयाने कोणतीही मागणी भारतीयांच्या पदरात पडणार नाही व त्यासाठी राष्ट्रसभेने आपला कार्यक्रम बदलला पाहिजे अशी अपेक्षा राजवाड्यांनी ' स्वराज्य ' व ' स्वदेशी ' या दोन लेखातून व्यक्त केलेली आढळते.

## 'स्वराज्य' आणि 'स्वदेशी'

'विश्ववृत्त' मासिकाच्या जुलै १९०६ च्या अंकात राजवाड्यांचा 'स्वराज्य' हा लेख प्रसिद्ध झाला. या लेखाच्या प्रारंभीच राजवाड्यांनी इंग्रजांचा कावेबाजपणा वेशीवर टांगला. '.. उदार मोर्ले, दीडशे इंग्रजांची इंडियन पार्लमेंटरी कमेटी, थार्बर्न, रे वगैरे गोडबोले हिन्दुस्थानला स्वराज्य देतील अशी थोर उत्कंठा वाटत होती ती पार जिरून गेली. गेला बाजार, कर्झनने केलेल्या जखमांना हे लोक निदान मलमपट्टी तरी लावतील, अशी जी आशां वाटत होती तीदेखील फलद्रूप झाली नाही; आणि पुढे होईल असा फिकटही रंग दिसत नाही.'

राजवाड्यांना इंग्रजांच्या राजसत्तेचे बीज नोकरशाही आहे असे वाटत होते. ऐतिहासिक पुराव्यांच्या आधारे राजवाड्यांनी याबाबत केलेली छाननी, अतिशय मननीय आहे. 'सनदी नोकऱ्यात' हिंदी लोकांना प्रवेश मिळावा म्हणून कंठशोष करणारे अनेक नेते एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस व विसाव्या शतकाच्या प्रारंभी उदयास आले होते. त्यांनी राजवाड्यांनी केलेली चिकित्सा लक्षात घेतली असती तर इंग्रजांच्या नोकरशाहीचा नरदुर्ग किती बळकट आहे हे समजले असते. राजवाडे म्हणतात त्याप्रमाणे, ईस्ट इंडिया कंपनीने भारतात वखारी उघडल्यापासून म्हणजे इ.स. १६०० पासून १८५७ पर्यंत म्हणजे २५७ वर्षांत इंग्रजांनी एकही हिंदी अधिकारी आपल्या नोकरांसमवेत घेतला नाही. एवढेच नव्हे तर, १८५८ मध्ये भारतावर इंग्रज राज्यकर्त्यांची, पर्यायाने पार्लमेंटची सत्ता स्थापन झाल्यानंतर १९०६ पर्यंत म्हणजे सुमारे पन्नास वर्षे इंग्रजांनी कर्त्या अधिकाऱ्यांत एकही हिन्दी घेतला नाही.' इतिहासाचा दाखला देऊन राजवाड्यांनी निष्कर्ष काढला की, 'सर्वतोप्रकारे बेमालूम अशा गुप्त गुप्तमंडळींप्रमाणे हे राज्ययंत्र चालले आहे.'

राजवाड्यांनी इंग्रजांच्या राजसत्तेचे मर्म नेमके ओळखले होते. भारतावर मध्ययुगात तुर्कांची व मुघलांची सत्ताही प्रदीर्घ अस्तित्वात होती. तुर्क सत्तेतही राज्ययंत्रणेमध्ये हिन्दी अधिकाऱ्यांचा समावेश होता. मुघलांच्या काळात तर हिन्दी लोकांना अत्यंत महत्त्वाची अधिकारपदे मिळाली. मराठी राज्यकर्त्यांनीही आपल्या यंत्रणेत परकीय अधिकारी घेतले. महादजी शिंदेने डी बॉयनेसारखा फ्रेंच अधिकारी लष्करात घेतला. निजामानेही फ्रेंच अधिकारी घेतले. परंतु इंग्रजांनी मात्र आपल्या यंत्रणेत हिन्दी लोकांना घेण्याचे कटाक्षाने टाळले. वास्तविक पाहता १८५८ मध्ये इंग्लंडच्या व्हिक्टोरिया राणीने आपल्या 'उदारमतवादी' जाहिरनाम्यामध्ये राज्यकारभारात भारतीयांना प्रवेश देण्याचे मान्य केले होते.परंतु इंग्रजांनी राणीचा जाहिरनामा हा केवळ भारतीयांच्या तोंडाला पाने पुसण्यासाठीच होता हे अल्पावधीत सिद्ध केले. मेरिडिथ टाऊनशेंड याचा 'एशिया इन युरोप' हा निबंधसंग्रह इंग्रजी सत्तेचा पोल उघड करणारा आहे असे राजवाडे वारंवार सांगत असत.या ग्रंथात टाऊनशेंडने आपल्या देशबांधवांना (म्हणजे इंग्रजांना) उपदेश केला आहे.तो असा, 'हिन्दुस्थानातील तीन हजार गोरे सनदी नोकर व त्यांच्या पाठीशी असलेले दोन लक्ष गोरे सैन्य हाच आपल्या राज्याचा खरा आधार आहे असे सांगून तो जोंपर्यंत अभंग राहील तोपर्यंत आपल्या (इंग्रजांच्या)राज्यासंबंधी भीती

बाळगण्याचे कारण नाही.' सनदी नोकऱ्यातील प्रवेशासाठी भारतीय सुशिक्षितांना इंग्रजांनी हेतूपुरस्सर अडचणी का निर्माण केल्या याचे उत्तर वरील उपदेशात आढळते.राजवाडे स्वतः इतिहासाचे सखोल अध्यापक होते. त्यामुळे राष्ट्रसभेच्या सनदी नोकऱ्यांच्या मागण्या त्यांना हास्यास्पद वाटत होत्या.कर्झननंतर व्हॉईसरॉय म्हणून आलेल्या लॉर्ड मिंटोने व भारतमंत्री लॉर्ड मोर्लेने भारतीयांना काही आमिषे दाखविली.तेव्हा ते आपल्याला गाजर दाखवत आहेत असेच राजवाड्यांचे मत बनले. त्यांच्याच शब्दात सांगायचे म्हणजे, 'ह्या ठिगळे लावण्याच्या संकल्पाने नग्न हिन्दुस्थानचे अंग झाकले जाण्याची शक्यता नाही. हे काम साधण्यास, सबंध नवे वस्त्रच हवे आहे.'

'स्वराज्य' या ध्येयाच्या पूर्ततेसाठी राष्ट्रसभेने लोकजागृती करण्याचे कार्य हाती घेतले पाहिजे असे मत राजवाड्यांनी व्यक्त केले. 'आता, एकच मार्ग राहिला. लोकमताच्या व लोककृतीच्या जोराने व राष्ट्रसभेच्या पुढारपणाखाली लोकांना स्वराज्य करण्यास शिकविले पाहिजे .. हे काम व्हावयाला, राष्ट्रसभेने नुसते वक्तृत्व करण्याचे सोडून कर्तृत्व करावयास सिद्ध झाले पाहिजे.'

ऑक्टोबर १९०६ च्या 'विश्ववृत्त' मासिकात राजवाड्यांचा 'स्वदेशी' नावाचा निबंध प्रसिद्ध झाला आहे. बंगालच्या फाळणीनंतर भारतात स्वदेशीच्या चळवळीला प्रारंभ झाला. या चळवळीचे मूलगामी व मार्मिक विश्लेषण राजवाड्यांनी केले आहे.

'आपला न्याय आपला आपण करून घेणे, हे स्वदेशीचे बीज आहे.

व्यापाराच्या उन्नत्यर्थ देशातील सर्व धर्मांच्या, भाषांच्या, वंशांच्या व पेशांच्या कायमच्या रहिवाश्यांनी एकजुटीने झटले पाहिजे, हे ह्या मंत्राचे कीलक आहे. सुयंत्र सॅधीकरण ह्या मंत्राची शक्ती होय. जुलूम परिहारार्थ, स्वदेश ह्या त्र्यक्षरी मंत्राचा सततोच्चार करणे हा जप समजला आहे.

ह्या मंत्राचा व्यापारस्वातंत्र्य हा छंद होय. देशभक्ती ही मंत्रदेवता समजतात. आणि शिवाजी हा ह्या मंत्राचा ऋषि कल्पतात.

ह्या मंत्रात प्रतिनिधीसत्ताक सुंदर राज्यपद्धतीचे ध्यान करावयाचे असते.

आणि बहिष्कारयोगाने समाधि लावावयाची असते.'

स्वदेशी मंत्राचे काव्यरुप विश्लेषण करून राजवाडे थांबले नाहीत. ही चळवळ यशस्वी होण्यासाठी राष्ट्रसभेने कोणती काळजी घेतली पाहिजे याचे विवेचनही त्यांनी केले आहे. विशेषतः इंग्रजांची पावले ओळखून राष्ट्रसभेने तशाच प्रकारची पावले टाकली पाहिजेत असा इशारा राजवाड्यांनी दिला.'

' स्वदेशीचा परिणाम काय होतो, हे अजमावण्याकरित्ता, सरकारने नुकतीच एक व्यापारी कमेटी नेमली आहे. तशी राष्ट्रसभेची एक अर्थशास्त्र्यांची कमेटी पाहिजे. म्हणजे सरकारी कमेटीच्या रिपोर्टाशी किंवा कामाशी राष्ट्रीय कमेटीच्या रिपोर्टाचा व कामाचा पडताळा घालता येईल, व सरकारी कमेटी काय योजना करते हे वेळीच समजेल.'

नेमस्तांच्या मार्गावर राजवाड्यांच्या कधीच विश्वास नव्हता. राष्ट्रसभेच्या जहाल नेत्यांनी 'स्वदेशी व बहिष्कार' चळवळ सुरू केली. तिच्याबद्दल मात्र राजवाड्यांना ममत्व वाटत होते. लोकजागृती जेवढी प्रखर होईल, त्याप्रमाणात चळवळ यशस्वी होईल असा त्यांना विश्वास वाटत होता. हिन्दुस्थानात सशस्त्र क्रान्तीची शक्यता आता कायमची दुरावली आहे हे लक्षात घेऊन राजवाडे १९०६ मध्ये स्वदेशी बहिष्कार चळवळीकडे मोठ्या आशेने पाहू लागले होते.

## सुरतेची दुफळी

१९०७ मध्ये सुरतेला झालेल्या राष्ट्रसभेच्या अधिवेशनात जहाल व मवाळ यांच्यामध्ये तीव्र मतभेद होऊन राष्ट्रसभा दुभंगली. राष्ट्रसभा दुभंगली याचे दुःख राजवाड्यांना झाले. आपल्या स्नेह्यांबरोबर झालेल्या चर्चेतून त्यांनी आपली खंत प्रगट केली. मुंडलेनी राजवाड्यांची आठवण सांगताना लिहिलें आहे की, 'सुरतेस राष्ट्रीय सभा दुभंगून नेमस्तांनी सवतासुभा निर्माण करून कन्व्हेन्शन भरविले असल्याची सविस्तर हकीकत आली. ती वाचून टिळकांनी दाखविलेल्या धैर्याबद्दल मला अतिशय आनंद झाला व तो मी शब्दांनी व्यक्तही केला. त्यावर राजवाडे गंभीरपणे म्हणाले, 'झाली ही गोष्ट देशाच्या हिताच्या दृष्टीने वाईट झाली. राजकारणात जहाल व नेमस्त असे दोन पक्ष नेहमी असतातच, परंतु परतंत्र देशात हे पक्ष एकमेकास पूरक म्हणजे सिद्धसाधक वृत्तीचे असणे जरूर असते. ह्या दोघांतील भांडण विकोपास जाऊन ते परस्परांविषयी द्वेषभाव बाळगून वागू लागले तर प्रस्थापित अशी परकीय राजसत्ता एकास हाताशी धरून दुसऱ्याचा पाडाव करणे व त्याचा पाडाव झाल्यावर हाताशी धरलेल्या पक्षासही लाथ मारण्यास तयार होते.'

राजवाड्यांच्या वरील उद्‌गारावरून त्यांचे निरिक्षण किती अचूक होते याचा प्रत्यय येतो.

लोकमान्य टिळक आणि नामदार गोखले या दोन्ही नेत्यांविषयी राजवाड्यांना आदर होता. तथापि स्वीकारलेल्या मार्गाविषयी ते साशंक होते. जहाल नेत्यांच्या चळवळीचे जरी राजवाड्यांना आकर्षण वाटत होते, तरी ही चळवळ उथळ स्वरूपाची आहे असे त्यांचे मत बनले होते.

'टिळकपक्षीय जहालांचा जमाव म्हणजे एक बाजारबुणग्यांचे प्रदर्शन आहे ... मवाळ पक्षातले लोक अधिक सरस आहेत व गोखल्यांनी त्यांची संघटनाही चांगली चालविली आहे.. टिळक स्वतः अष्टपैलू, बुद्धिवान, राजकारणपटू, अभ्यासी, धीट, निर्भय व कर्तबगार आहेत, पण ते चतुर संघटक नसून केवळ चळवळ्ये (agitator) आहेत. त्यांची चळवळ करण्याची तऱ्हा आयरिश पद्धतीची म्हणजे स्वतःचे बलाबलाचा फारसा खोल विचार न करता दमबाजी व दडपादडपी ऊर्फ ब्लफिंग व साहस यांच्या जोरावर प्रसंग निभावून नेण्याचा प्रयत्न करावयाचा अशी आहे.'

लोकमान्य टिळकांविषयी व त्यांच्या जहाल मार्गाविषयी राजवाड्यांना खूप आदर होता. तथापि संघटना अधिक मजबूत व कार्यक्षम न करता चळवळ व्यापक करणे योग्य नव्हे असे त्यांना वाटत होते. त्यामुळे महात्मा गांधींनी १९२० मध्ये असहकाराचा लढा सुरू करेपर्यंत राजवाड्यांना जहाल चळवळीतून काही निष्पन्न होईल याची खात्री वाटत नव्हती.

## महात्मा गांधींचा असहकार लढा

१ ऑगस्ट १९२० रोजी लोकमान्य टिळकांचे देहावसान झाले. राष्ट्रसभेने म. गांधींच्या नेतृत्वाखाली इंग्रजांशी असहकार लढ्याचे पर्व सुरू केले. 'स्वदेशी व बहिष्कार' चळवळीचे राजवाड्यांना आकर्षण वाटत होते, तथापि या चळवळीचा कच्चेपणा ते ओळखून होते. गांधीजींच्या नेतृत्वाखाली राष्ट्रसभेने पुकारलेल्या असहकार लढ्याचेही राजवाड्यांना आकर्षण वाटले. पण त्याचबरोबर, गांधीजींनी स्वीकारलेला मार्ग अचूक व बिनतोड आहे हे त्यांनी जाणले होते. ऑगस्ट १९२२ च्या 'चित्रमयजगत्' या मासिकात राजवाड्यांचा 'सध्याचे भारतीय राजकारण' नावाचा लेख प्रसिद्ध झाला. या लेखात राजवाड्यांनी आपली भूमिका सविस्तर विशद केलेली आढळते. इंग्रजी नोकरशाहीविरुद्ध महात्मा गांधीनी पुकारलेल्या असहकार लढ्याचे राजवाड्यांनी निःसंदिग्ध मनाने स्वागत केले. नोकरशाहीतील सुप्त माणुसकी जागृत करण्यासाठी तीन मार्ग राजवाडे सांगतात.

१. छंदानुवर्तन, २. लढाई, ३. असहकार. पहिली पद्धती मवाळ, प्रागतिक, उदार नेत्यांनी स्वीकारली. ती पूर्णपणे अयशस्वी ठरली असे राजवाड्यांनी स्पष्ट केले आहे.दुसरी पद्धती पेशवाईच्या अखेरीस मराठा मंडळाने स्वीकारली. त्यात मराठा मंडळ केवळ पराभूतच नव्हे, तर भुईसपाट झाले. १८५७ च्या उठावाच्या वेळी काही भारतीय संस्थानिकांनी या दुसऱ्या पद्धतीचा अवलंब केला. पण त्यांना पूर्ण अपयश आले. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस वासुदेव बळवंत, हरि रामोशी इत्यादी क्रान्तीकारकांनी दुसऱ्या पद्धतीचा पुनः अवलंब करण्याचा विफल प्रयत्न केला. राजवाडे या संदर्भात लिहितात, 'प्रतिपक्षी शास्त्राने, विद्येने, शस्त्राने, गतीने व सामर्थ्याने अतीच अती श्रेष्ठ होता. असे असून निरूपाय म्हणून खाद्यांना खादकांविरुद्ध आपली ओबडधोबड शस्त्रे उपसावी लागली ही बाब चिंत्य व विचारणीय आहे. प्रतिपक्षी बलिष्ट आहे हे त्या त्या काळचे लोक जाणत असावे असे म्हणण्यास आधार आहे'

गांधीजींनी ही दुसरी पद्धती का स्वीकारली नाही याचे मार्मिक विवेचनही राजवाड्यांनी केलेले आहे. तिसरी पद्धती म्हणजे असहकाराची पद्धती परिणामदृष्ट्या सर्वश्रेष्ठ होय असे राजवाड्यांनी स्पष्ट केले. लोकमान्य टिळक हयात असते तर तेही गांधीजींच्या असहकार लढ्यात सहभागी झाले असते अशी ग्वाही राजवाडे आपल्या लेखाच्या अखेरीस देतात.

'गांधींनी कॉंग्रेसचे बहुमत काबीज केल्यास, आपल्या अनुयायांसह गांधींना एकनिष्ठ साहाय्य करण्याचे टिळकांनी वचन दिले होते. वचनाला टिळक किती जपत वा जागत त्याचा प्रत्यय जगाला आहेच.'

राष्ट्रसभेच्या राजकारणाविषयी राजवाड्यांचा विचाराचा प्रवास हा असा आहे. गांधीजींच्या मार्गाविषयी साशंक असणाऱ्या अभ्यासकांनाही राजवाड्यांनी केलेली मीमांसा चिंतनीय वाटण्यास हरकत नसावी.

संदर्भ सूची


१. राजवाडे विचारदर्शन, पृ. ५
२. राजवाडे लेख-संग्रह, भाग २, निवेदन पृ. २
३. राजवाडे चरित्र — भा. वा. भट, पृ. ४४२,
४. तत्रैव, पृ. ४४२ - ४३.
५. राजवाडे लेखसंग्रह, भाग २, पृ. १५९
६. तत्रैव, पृ. १५९
७. तत्रैव, पृ. १६१-६२
(पंधराशे राज्यकर्ते म्हणजे पंधराशे ब्रिटिश सनदी अधिकारी)
८. तत्रैव पृ. १६२
९. तत्रैव पृ. १५८
१०. राजवाडे लेख संग्रह, भाग २, पृ. ९७
११. तत्रैव पृ. ९८
१२. राजवाडे चरित्र, पृ. ४४४.
१३. राजवाडे लेख संग्रह, भाग २, पृ. १०२
१४. तत्रैव पृ. १०५
१५. तत्रैव, पृ. १०९
१६. तत्रैव, पृ. १११
१७. राजवाडे चरित्र, पृ. ४३८
१८. तत्रैव पृ. ४३९
१९. राजवाडे लेख संग्रह, भाग २, पृ. २७५
२०. तत्रैव, पृ. २८१


डॉ. प्र. न. देशपांडे,
मुख्य चिटणीस,
इ.वि.का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे.

# खाजगी पत्रांमधून पडलेले स्वराज्य चळवळीचे प्रतिबिंब

## ( अप्रकाशित साधने )

-डॉ. मु. ब. शहा

धुळ्याचे कै. रामेश्वरशेटजींनी जेवढा पत्रव्यवहार या देशातल्या वेगवेगळ्या नेत्यांशी केला, तेवढा क्वचितच कुणी केला असेल. गांधी, विनोबाजी, सानेगुरुजी, काकासाहेब कालेलकर, बाळकोबा, जमनालाल बजाज, महादेवभाई देसाई, प्रभावतीजी, इत्यादींशी त्यांचा अत्यंत घनिष्ट स्नेह होता. अक्षरशः शेकडो पत्रे त्यांनी या सर्वांना लिहिली व सर्वांकडून त्यांना वेळोवेळी लहान मोठी उत्तरेही सतत येत गेली. जवळपास १२ मोठ्या फाईलींमध्ये ही सर्व पत्रे मा. श्री. शिवाजीराव भावे यांनी व्यवस्थित लावून ठेवलेली आढळली. सन १९२७ पासून सन १९४७-४८ पर्यंतच्या फाईलीतली काही महत्त्वाची पत्रे या ठिकाणी प्रथमतः प्रसिद्ध होत आहेत. या पत्रांमध्ये तत्कालीन राजकीय व सामाजिक परिस्थितीचे स्पष्ट प्रतिबिंब तर दिसतेच पण ही नेते मंडळी किती दूरगामी विचार करणारी व साहसी होती याचेही दिग्दर्शन होते. अनेक पत्रांमध्ये त्या काळात चाललेल्या चळवळींची माहिती आहे. काही सांकेतिक उल्लेख आहेत. कै.रामैश्वरजींच्या पत्नी गंगूताईंनी मोठ्या साक्षेपाने हे धन आजपर्यंत जपून ठेवले. कै. रामेश्वरजींनी लिहिलेल्या डायऱ्याही संख्येने पुष्कळ आहेत. नंदुरबार येथे झालेल्या गांधीजींच्या पहिल्या सभेचा वृत्तांत एका डायरीतून घेतलाय.

पत्रांमधले वैयक्तिक व घरगुती संदर्भ श्री. गंगूताईंच्या सूचनेवरून काढून टाकण्यात आले असले तरी मूळ कथनाला त्यामुळे कसलाही धक्का पोहचत नाही.

सर्व क्षेत्रात अंत्यजांना समान वागणूक दिली जाणे आवश्यक आहे'असे स्पष्ट व निक्षून सांगत विनोबाजींनी १९२८ साली जे लिहिले होते ते पुढच्या पत्रात आहे.

बापूंचे प्रथम दर्शन १९२९ चे सुमारास. ते उन्हाळ्याचेच दिवस होतें. खानदेशात प्रथम नंदुरबार येथे त्यांचे आगमन झाले. असहकारितेचा तो काळ. जिकडे तिकडे प्रचंड सभा होत असत. आणि ब्रिटिशांबाबत वाटेल ते बकत. त्या वेळी धुळ्यात ' ओक ' भाऊ नावाचे सद्गृहस्थ व रूप नारायण पंडित यांनी व्याख्यानाची झोड धुळ्यात उडविली होती. पाचपाच हज़ार श्रोते जमत असत. त्या काळी लाऊडस्पीकर वगैरेचे नावनिशाण नव्हते. सबब व्याख्यात्याने जोरजोराने ओरडावे. जो जोराने ओरडेल तो मोठा वक्ता. व्याख्यानात तत्त्वज्ञान असो की नसो.

ब्रिटिशांना शिव्या देणे आणि आपली फुशारकी मिळवणे. हा सर्वांचा धंदा. ओक महाशय व्याख्यानाला सुरुवात ' ब्रिटिशांचा जावई ' या शब्दाने करीत. लोक टाळ्या पिटून हौसेने ऐकत. या गोडीने आम्ही भारलेलो. धुळ्याचे लोक त्यातले ५/२५/५० निदान ५० मंडळी तरी नंदुरबारला महात्माजींच्या दर्शनार्थ व्याख्यान श्रवण करायला गेली होती. त्या वेळी नंदुरबारला धुळ्याचे मोठे गृहस्थ ' मूलचंद किसनदास शेट ' यांचे दुकान अडतीचे थाटलेले होते. त्यांच्याकडे मी मित्रासह उतरलो. आमच्या जेवणखाणाची व्यवस्था इतकी उत्तम ठेवली की त्यांची सदैव आठवण राहील. स्वस्ताईतला तो महान पर्वच आजच्या मानाने. आंब्याचा रस, पुरी, वगैरेंची मेजवानीच आम्हाला दिली होती. प्रभातकाळी महात्माजींचे व्याख्यान,एका जीनप्रेसमध्ये ठेवलेले होते. नंदुरबारच्या मानाने अलोट गर्दी जमली होती. भव्य उंच आसनावर, व्यासपीठावर महात्माजी विराजमान झाले होते. त्या वेळी अंगात सदरा, गळ्याजवळचे बटण उघडे आणि धोतर, शिरावर पागोटे किंवा टोपी काहीच नव्हते असे अस्पष्ट आठवते. नंदुरबारच्या पुढाऱ्यांनी व्याख्यानाला सुरुवात करावी म्हणून आम्ही विनंती केली. ते खुर्चीवर बसून बोलत होते. आम्ही धुळ्यातून स्पेशल मोटारीतून गेलेली मंडळी, प्रतिष्ठित म्हणून त्यांच्या जवळपास बसलो होतो. सबब महात्माजी एकेक शब्द तोलून मापून प्रेमाचे उच्चारीत होते. हातांचे हावभाव वगैरे आवेश कुठेच दिसत नव्हते. शांत गंगेच्या प्रवाहाप्रमाणे त्यांचे भाषण झाले. नंतर सभा संपली व धुळ्याची पुष्कळशी मंडळी एकमेकांशी बोलत होती. " उगीच इतक्या लांबून आलो बुवा. मोटारीचा खर्च केला. या गांधीमहात्म्यापेक्षा तो ओक महाराज चांगले व्याख्यान देतो वगैरे वगैरे. मूलचंदजी शेटजीकडे येऊन व मेजवानीचे जेवण होऊन आम्ही धुळ्याला परतलो. असे महात्माजींचे दर्शन आम्हाला घडले. आणि माझ्या हृदयात त्यांचा कायमचा वास झाला हे नंदुरबारचे उपकार होते.

सत्याग्रहाश्रम वर्धा
७-८-१९२८

श्री. रामेश्वरजी,

आखाड्यात अंत्यजासाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात काहीच मुद्दा नाही. सर्वांनी एकत्र व भेद न राखता शिक्षण घेतले पाहिजे. शाळातून वगैरे अंत्यजांची मुले घ्यावीत हा नियम बहुदा सर्वत्र झालेलाच आहे. व्यायामशाळेत तो तसाच हवा. अलग व्यवस्था नको. समारंभासाठी माझी आवश्यकता नाही. मला त्यातून जितके बचावता येईल तितके बचावणे जरूर आहे.

विनोबाचे प्रणाम

१९२० मध्ये कलकत्यात झालेल्या अधिवेशनात असहकाराचा लढा तीव्र करण्याविषयीचा

कार्यक्रम ठरला होता, परदेशी मालावर बहिष्कार, स्वदेशीचा वापर, खादीचा प्रचार, अस्पृश्योद्धार, काँग्रेसची सभासद संख्या वाढविणे, ग्रामसमित्यांची स्थापना इत्यादी कार्यक्रम नंतर क्रमाने काँग्रेसने स्वीकारले. १९२९ च्या लाहोर काँग्रेसमध्ये संपूर्ण स्वराज्याची घोषणा झाली. त्याचे पडसाद ठिकठिकाणी उमटत होते.

पुण्याच्या स्वराज्यकचेरीतून श्री हरि गणेश फाटक यांनी रामेश्वरजींना लिहिले –

स्वराज्य कचेरी, पुणे
४ - १ - १९२९

सा.न.वि.वि.

ह्या पत्रासोबत सह्यांचा कागद पाठवीत आहे. गेल्या महिन्यात महाराष्ट्र खादी संघाचे वृत्त आपल्याकडून कळले नाही. म्हणून काळजी वाटते. उदईक दोन्ही पक्षांच्या पुढाऱ्यांची संयुक्त सभा श्री. हरिभाऊ तुळपुळे यांच्या घरी भरून काँग्रेसच्या विधायक कार्यक्रमाचा विचार पुणेकर मंडळी करणार आहेत. अर्थात ब्रिटीश मालाच्या बहिष्काराचा प्रश्न यशस्वी कसा करावा याविषयी सहानुभूतिपूर्वक चर्चा होईल. अशा वेळेस आपल्या महाराष्ट्रखादी संघाने जोर करून या बहिष्काराच्या वातावरणात खादीच्या प्रश्नास चांगली चालना दिली पाहिजे. उद्याच्या सभेचा रागरंग मी आपणास कळवीन. कदाचित महाराष्ट्रातील पुढारी एकत्र जमून या एकच प्रश्नावर हुल्लड उडवून देण्याचा विचार करतील. अशीही चिन्हे आहेत. असो. फक्त पाच महिनेच उरले आहेत व सद्या तर निदान दोन ते तीन हजार झाल्या पाहिजेत. म्हणून आस्थेने सर्व मंडळींनी कामाला लागले पाहिजे. पुढील पाच महिने आपण स्वतः हात धुऊन या प्रश्नाच्या पाठीमागे लागल्याशिवाय कार्य सिद्धीस जाण्यास अडचण पडेल अशी भीती वाटते. म्हणून मुद्दाम आग्रहपूर्वक आपणास लिहित आहे. दुसरे, महात्माजींची आत्मकथा छापून झाली. देणेकऱ्यांचा तगादा आहे. तरी याबाबतचे पैसे पाठवून दिल्यास पुष्कळ हलके होईल.

आपला,
हरि गणेश फाटक

सत्याग्रहाश्रम, वर्धा
९ - ११ - ३०

श्री रामेश्वरजी,

पत्रे मिळाली. इकडे काम बरे चालले आहे. तुम्ही पाठविलेली मुले चांद्याकडे रवाना झाली आहेत. तकलीच्या गतीची तेथे चांगली प्रगती झाली आहे. अर्ध्या तासाला १५० तारांपर्यंत मजल गेली

आहे.मध्यप्रांतातील चार जिल्ह्यांमधून सुमारे १३०० कैदेत गेली आहेत.वर्ध्याला पिकेटिंगमध्ये नुकतीच माणसे पकडली गेली. गंगूताई व शांताबाई पिकेटिंगमध्ये असतात. पुष्कळ व्यापाऱ्यांनी गट्ठे बांधले आहेत.

विनोबाचे प्रणाम.

आंतरजातीय विवाहाची कल्पना त्या वेळी समाजात रुजलेली नव्हती. जे अगदी तुरळक होते त्यांनाही खूप विरोध होत असे. मुंबईत झालेल्या अशा एका वैश्य ब्राह्मण विवाहाविषयी श्री रामेश्वरजींनी नापसंती व्यक्त केली होती. श्री आबासाहेब वर्वे यांनी ही हकीगत काका कालेलकरांना कळवली. काकांनी रामेश्वरजींना लिहिले —

जेचर क्युअर होम
६, ताडीवाला रोड
पुणे.
२१ - ६ - ३३

प्रिय रामेश्वरजी,

धुळ्याच्या श्री वर्वे यांच्या पत्रावरून समजते की वैश्य ब्राह्मण विवाह तुम्हाला आवडला नाही. पूर्वसंस्कार जबरदस्त असतात हे खरे. पण तुमची बापूजींवर अनन्य श्रद्धा आहे ना? तार्किक ज्ञानापेक्षा श्रद्धेला तुम्ही अधिक मानता ना? मग हा चित्तविक्षेप का? पू. बापूजी, राजाजी दोघेही धर्मज्ञ पुरुष आहेत. पौरोहित्य करणारे लक्ष्मणशास्त्री विनोबांचे विद्यार्थी आहेत. मीही लग्नाला पूर्वीच आपली मान्यता दिली आहे. सर्वच धर्मभ्रष्ट काय म्हणून होतील? तुम्ही विचार करा व बापूजी हिंदुधर्माच्या शुद्ध पायावर नवीन मार्ग कसा दाखवितात ते समजून घ्या.

काकाचा सप्रेम वंदेमातरम्

खेड्यात जाऊन राहण्याचा व समाजसेवा करण्याचा आदेश बापूजींनी त्या वेळी अनेकांना दिला होता. सानेगुरुजींच्या मनातही कायमचे एखाद्या खेड्यात जाऊन राहावे असे होते. विनोबाजींनी गुरुजींना लिहिलेले हे पत्र म्हणजे खरोखर ' ग्रामसेवेचा ताम्रपट ' आहे. अगदी थोड्या शब्दात पण अचूकपणे ग्रामसेवेमागची तात्त्विक भूमिका विनोबांनी या पत्रात स्पष्ट केलीय.

वर्धा
१० - ९ - १९३५

श्री साने गुरुजी,

तुमचे धुळ्याहून लिहिलेले सुंदर पत्र मिळाले. रामेश्वरजींशी आणि शंकरभाऊंशी तुम्ही तुमच्या अडचणी मांडल्या त्यांची मला यथावत कल्पना होतीच. आणि त्यासाठी उपाययोजना मी केली असतीच. पण तुम्ही थोडे टेकण्याची मी वाट पहात होतो. नावरीस गेल्यावर एका महिन्याने तुम्ही मला पत्र लिहिणार होतात. ते वचन तिथेच राहिले, तुम्ही मालेगावला जाऊन एरंडोलला येणार म्हणून शंकरभाऊशी कबूल केले त्यांना तुमच्यापासून तीनतीनदा वचन घ्यावे लागले.तुमच्या सहज लक्षात येईल की ह्या सगळ्याचा अर्थ असा आहे की न कळत सत्याला धक्का लागत आहे.त्याला तुमचा इलाज नव्हता असे मी म्हणेन. पण असे तुम्ही म्हणू नये. सत्य दूषित होईल असे जर आपल्याकडून कोणी करवीत असेल तर तो करणारा ईश्वर तर नाहीच. परंतु काही झाले तरी तुमची वासना सव्दासना आहे हे मी निःशंक मानतो आणि ह्याच विश्वासावर माझ्या आशेची वेल मी पोसून राहिलो आहे.

तुम्हाला कोणी बाह्य व्यवस्था पाहणारा मदतनीस हवा होता म्हणजे ती एक तुमची गरज होती तर मला त्यांची कल्पना असो वा नसो पण, तुम्ही ती मला का कळविली नाही ? तसे लिहिण्यात तुमची एक उणीव दिसते. असे भय असेल तर ते बरोबर नाही. उणीव दिसण्यात दोष नाही. असण्यात दोष आहे.

मला तोंड कसे दाखवू म्हणता आणि पुन्हा मी तुमच्याजवळच आहे म्हणता. म्हणजे तोंड दाखविलेच आहे. ते कसे टळते ? आता लग्न लागलेच आहे तर संकोच करून कसे चालेल ? तुमचा आदर मी समजू शकतो. परंतु आदर शब्दावरूनच ' डर ' शब्द बनला आहे. असे व्युत्पत्तिशास्त्र सांगते. तरी अशा आदराचा तुम्हाला, मला अथवा कार्याला काहीच उपयोग नाही.

तुमच्याजवळ पंढरी अथवा सीतारामभाई राहिले तर मला त्यात हरकत घेण्यासारखे काही नाही. आणि कसे करावयाचे आहे इत्यादी सर्व बाबतींचा एकत्र बसून विचार केलाच पाहिजे. आणि मग हरिनामपूर्वक तसे करावयाचेच उरते.

विचारांचा काही मी घोटाळा पाहात आहे. जप तप मला समजत नाही. मी आपला तुझ्यापायी लोळण घालीन ' इत्यादी अलंकारिक वाक्यांचा विवेकानेच उपयोग केला पाहिजे. पायी लोळण घालणे जपतपापेक्षा शतपट कठिण आहे. मला त्रैराशिक येत नाही. मी आपला इंग्रजी शब्द (त्रिकोणमीति) करीन. अशासारखे ते वाक्य होते. प्रेमाच्या उत्कर्षात जपतप सर्व आपोआप येऊन जाते,सहज होते, सोपे वाटते, एवढाच त्याचा अर्थ आहे. खेडेगावात जाऊन मी त्या गावाला सुधारणार असा माझा बाणा नाही.आणि तुमचाही असण्याचे कारण नाही. हा अगदी

शुद्ध, सात्त्विक,सरळ,सोज्वळ, सहज प्राप्त, नम्र भक्तिमार्ग आहे.शहरातले काम हा ज्ञानमार्ग आहे. या घमेंडीत आतापर्यंतचे दिवस गेले. खेड्यांची सेवा भक्तिमार्ग आहे. तुलसीदासजी म्हणतात, “ देवा, तुझ्या वैकुंठनगरीत बसण्याची इच्छा होते, पण त्या इच्छेला कामक्रोधादि गुणांनी कुंठित केले आहे.आणि मोक्षधाम तर दाट जंगलात आहे.तेथे तर माझा प्रवेशच नाही. स्वर्ग म्हणजे डोंगरावरचा बालेकिल्ला, सुकृताची चढण चढल्याशिवाय तिथे गत नाही. मी सुकृत कुठून आणू ? उरली नरकाची खाई. पण माझ्यापाशी नामाचा जोर असल्यामुळे मी त्या खाईत तरी कोठून पडणार ? मग देवा कोठे ठेवशील ? गज, गीध, व्याध इत्यादी तुझे जडभक्त ज्या खेड्यात राहतात, त्या खेड्यात वसती दे.

दास तुलसिदि बास देहू, अब करि कृपा ।
बसत गज-गीथ-व्याधादि जेवि खेरे ॥

ग्रामसेवा कार्याचा हा ताम्रपट मी तुम्हाला देत आहे.

विनोबाचे प्रणाम

स्वदेशी वस्तू वापरण्यावर त्या वेळी सर्वांचा कटाक्ष होता. तरी अधूनमधून विदेशी वस्तू वापरण्याचा मोह अनेकांना होई. कधी कधी अशी वस्तू घेणे व भेट म्हणून देणे यात कृतज्ञता किंवा भक्तिभाव अधिक असे. श्री रामेश्वरजींनी असेच एक भारी किंमतीचे फाऊंटनपेन काकासाहेब कालेलकरांकरिता घेतले.

प्रत्युत्तरात काकांनी दिलेले उत्तर थोडे तिखट असले तरी त्या उत्तरामागची भूमिका समजून घेण्यासारखी आहे.

वर्धा
काका कालेलकर
२३ - ३ - ३६

प्रिय रामेश्वरजी,

तुम्ही माझेसाठी एक सुंदर फाऊंटनपेन पाठविले आहेत. तुम्हाला जी काळी पेनं पूर्वी दिली होती तिचे पैसे मुंबईच्या पुरुषोत्तमभाईंनी तुमचेकडून वसूल करण्याचा बेत केला होता असे मला स्मरण आहे. पुढे काय झाले ते मला ठाऊक नाही. ही पेन विकत घेण्यापूर्वी मला जर कळवले असते तर मी तुम्हाला विकत घेवू नका असेच कळविले असते. परदेशी वस्तू आपण काय म्हणून विकत घ्याव्यात ? मजजवळ असल्या वस्तू असलेल्या मी वापरतो पण नसल्यास विकत घेत नाही.

तुमचा असा विचार तर नाही की स्वतः परदेशी वस्तू विकत घेण्यापेक्षा काकासाठी घ्याव्यात

आणि मग त्यांचा प्रसाद म्हणून आपण वापरल्या तर परदेशी वस्तू घेण्याचे पाप किंवा ठपका आपलेवर येणार नाही.

जर हे पेन परत देणे शक्य असेल तर तसे कळवा म्हणजे पाठवून देतो. एवढेच २५ रु. जर मला ' हरिजन कार्यासाठी द्याल ' तर त्याचा चांगला उपयोग मला करता येईल. आपण दिलेली वस्तू काकांनी परत केली याचे वाईट वाटून घेणार नाही या विश्वासानेच मी ही सूचना केली आहे.

काकाचा सप्रेम वंदे मातरम्

काँग्रेसचे नियमित वर्गणीदार असावेत की नसावेत याविषयी विनोबांचे पुढील पत्रातील चिंतन आजही मार्गदर्शक ठरावे. विशेषतः काँग्रेसची शताब्दी चाललेली असताना नेमक्या ५० वर्षांपूर्वी काँग्रेसला जीव की प्राण मानणारे नेते तिच्या भावी स्वरूपाविषयी किती जागरुकपणे विचार करीत होते याचा प्रत्यय त्यांच्या या पत्रावरून यावा.

वर्धा

१२ - ५ - ३६

श्री रामेश्वरजी,

नुकतेच तुम्हाला लिहिले आहे. त्यानंतर काँग्रेसबाबत नियमित वर्गणीदारांचे पत्रक मिळाले म्हणून पुन्हा लिहीत आहे.

काँग्रेस ही संस्था स्वराज्य स्थापायला म्हणजे चालू सरकार नाहीसे करायला बसली आहे. तिचे मासिक किंवा वार्षिक वर्गणीदार करण्याची कल्पनाच मला ग्रहण होत नाही. अशी संस्था निश्चिंतपणानेच मरायची. सचिंतपणानेच जिवंत राहायची. काँग्रेसला वेळोवेळी स्वतंत्रपणे कार्यक्रम बदलता आले पाहिजेत. वर्गणीदारांनी ती बांधली गेल्यास तिला असे स्वातंत्र्य राहणार नाही. किंवा वर्गणीदारही जे वचन देतील ते खोटे पडतील. आज दिसते तसे काँग्रेसचे नेहमीच सौम्य स्वरूप राहील अशी माझी अपेक्षा नाही. मग हे वर्गणीदार टिकतील का ? आपला सर्व व्यवहार सत्यावर उभा आहे. म्हणून वेळोवेळी जरुरीप्रमाणे फंड उभा करणे हीच क्रांती करू इच्छिणारी राजकीय संस्था चालविण्याची रीत आहे. आज ज्याने दिले तो वाटल्यास उद्या देणार नाही. आज जो देणार नाही तो वाटल्यास उद्या देईल. अशी सर्व स्वतंत्रता असेल तरच सत्य टिकेल, काँग्रेस टिकेल.

व्यापारशास्त्र, गोरक्षण किंवा एखादी शिक्षण संस्था चालविण्याची पद्धत वेगळी पडते आणि

राजकीय चळवळ - पूर्ण स्वराज्याची राजकीय चळवळ करणारी संस्था चालविण्याची तऱ्हा वेगळी आहे. इतक्या सर्व मंडळीहून वेगळे मत देणे साहसाचे वाटते. पण माझे जे नम्र पण निश्चित मत आहे ते तुम्ही प्रश्न विचारला असता सांगणे भाग आहे.

मला असे वाटते की ह्या वर्षाचे शे-सव्वाशे रुपये काय तुम्हाला द्यायचे असतील ते तुम्ही देऊ शकता. इतरही असेच करू शकतात. पुढच्या वर्षाचे पुढे पाहता येईल. दोन्ही पक्षी मोकळे. असे असणे योग्य आहे.

विनोबाचे प्रणाम.

४२ च्या वादळी दिवसांमध्ये ठिकठिकाणांहून सेवाग्रामला सतत पत्रं येत. आंदोलनाची दिशा काय असावी येथपासून तर बापूजींची प्रकृति कशी आहे इथपर्यंत चिंता-चर्चा करणाऱ्या पत्रांचा पाऊस पडत असे. अशाच एका पत्राला श्री महादेवभाई देसाई यांनी पाठवलेले हे सूचक उत्तर.

सेवाग्राम
२३ - ७ - ४२

प्रिय रामेश्वरभाई,

पू. विनोबाने जो भेजा था वह तो दो फुलस्केपमे आ जाता था। ग्रंथकी बात कहाँ ? बापू के यशकी राह देखे। उससे हम सब पावन हो, और उसकी चिनगारी हमारे हृदयमेभी ज्योत जगावे तो बडी बात होगी।

आपका
महादेवभाई

# थोर क्रांतिकारक डॉ. पां. स. खानखोजे

प्रा. डॉ. भा. रा. अंधारे

१८ जानेवारी १९६७ रोजी नागपूर येथे कृषितज्ज्ञ आणि महान क्रांतिकारक डॉ.पां.स.खानखोजे यांचे निधन विधी महाविद्यालयाच्या कौलारू लाल बंगल्यात झाले. डॉ. ए. यु. देशपांडे यांनी त्यांच्या मृत्यूची खात्री केल्यानंतरच प्रमाणपत्र लिहिले. ही दुःखद वार्ता सर्वत्र वाऱ्यासारखी पसरली. डॉक्टर साहेबांजवळ त्या वेळी कोणीच नव्हते. पत्नी जानकी आणि दोन्ही कन्या थोरली सावित्री आणि धाकटी माया तेथे नव्हत्याच. श्रीमती खानखोजे दिल्लीला होत्या. त्यांना आणि इतरांना श्री. मनोहर केळकर वकिलांनी ट्रंक लावून विमलताई चोरघडे यांच्यामार्फत डॉक्टरसाहेबांच्या मृत्यूची दुःखद वार्ता कळविली.

खानखोजे यांचा पार्थिव देह बर्फाच्या लादीवर ठेवण्यात आला. नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू प्रख्यात संशोधक व साहित्यकार डॉ. भाऊसाहेब कोलते यांच्या अध्यक्षतेखाली दुखवट्याची सभा झाली. डॉ. साहेबांचे अंतिम दर्शन घेण्याची धावपळ सुरू झाली. श्री. आर. के. पाटील (जुन्या मध्यप्रदेशाचे शेतकी मंत्री आणि प्रसिद्ध सर्वोदय पुढारी) ले. कर्नल श्री. के. टी. मंगळमूर्ती (माजी कुलगुरू इ.स. १९५६ ते १९५९, आणि माजी न्यायाधीश उच्च न्यायालय नागपूर) श्री. वसंतराव साठे (उर्जा मंत्री भारत शासन), बॅरिस्टर शेषरावजी वानखेडे (माजी मंत्री सभापती महाराष्ट्र शासन), श्री. तिडके (माजी मंत्री), श्री देव (माजी न्यायाधीश, कोषाध्यक्ष, कुलगुरू नागपूर विद्यापीठ), श्री. रानडे, वार्डन नागपूर विद्यापीठ वसतीगृह, आणि अनेक मान्यवर व्यक्ती डॉक्टर साहेबांच्या बंगल्यावर आल्या व सर्वांनी अंत्यदर्शन घेतले. विशेषकरून लोकनायक बापूजी अणे स्वतः दर्शनाकरिता आले. आणि त्यांनी श्रद्धांजली अर्पण केली. दुपारी ४ च्या सुमारास श्रीमती खानखोजे सावित्रीसह विमानाने नागपूरला पोहचल्या. श्रीमती खानखोजे यांचे दुःख पाहवेना. सौ. क्लारा अंधारे (प्रख्यात गायक वसंतराव अंधारे यांची पत्नी माहेरचे आडनाव माजगावकर. नुकत्याच नागपूर आकाशवाणीच्या सेवेतून निवृत्त झाल्या) यांनी त्यांचे सांत्वन केले. सर्वत्र दुःखाची छाया पसरलेली होती. स्मशानशांतता व हळहळ, एका थोर देशभक्त, क्रांतिकारक आणि महान कृषितज्ज्ञाच्या शेवटच्या प्रवासाच्या तयारीला सर्वजण लागले.

दुसऱ्या दिवशी १९ जानेवारी रोजी डॉ. साहेबांचे शव ट्रकवर ठेवण्यात आले. पुष्पहारांनी आणि राष्ट्रीय तिरंगा झेड्यानी त्यांच्या शवावर आच्छादन करण्यात आले. डॉक्टरसाहेबांचा शेवटचा प्रवास सुरू झाला. जनसमुदाय अफाट होता. आपल्या लाडक्या थोर देशभक्ताचे शेवटचे दर्शन घेण्याकरिता सर्वजण आले होते. अंबाझरी स्मशानात त्यांचा दाहसंस्कार करण्यात आला.

**पूर्वेतिहास :** डॉकटरसाहेबांचे वय मृत्यूच्या वेळी ८३ वर्षाचे होते. त्यांचे नाव आजच्या तरुण पिढीला अजिबात माहीत नाही. डॉक्टरसाहेबांच्या पूर्वजांनी नागपूरकर भोसल्यांच्या कारकीर्दीत गोंडवनाच्या परिसरात माजलेल्या आणि उपद्रवी पुंडगुंड नावाच्या खानाचा शोध (खोज) लावल्यामुळे त्यांचे आडनाव खानखोजे पडले (माझ्या पत्नीच्या आईच्या माहेरचे आडनाव फत्तेखानी आहे. डॉ. साहेबांच्या मामेबहीण). डॉ. साहेबांचा जन्म ७ नोव्हेंबर रोजी वर्धा येथे (पालकवाडी गावी) झाला. महाराष्ट्रात आजोबाचे नाव नातवाला देण्याची जुनी परंपरा असल्यामुळे त्यांचे नाव पांडुरंग ठेवण्यात आले. खानखोजे यांच्या रक्तातच देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्याची तळमळ होती. पांडुरंगाच्या वडिलांनी १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धात भाग घेतला होता. डॉक्टरसाहेबांची आई बळवंतराव फत्तेखानीची बहीण. (बळवंतराव माझ्या पत्नीचे आजोबा : गणोबाच्या वाडीत राहात) पांडुरंगाची आई ' माई ' या नावाने ओळखली जाई. माई दिसण्यात सुंदर गोऱ्यापान होत्या. वडील सदाशिवराव एकाएकी वार्धेला वारले. आणि डॉक्टरसाहेबांवरील वडिलांचे छत्र गेले. तरी ते डगमगले नाहीत. त्यांना एकच ध्यास लागला होता भारताला इंग्रजांच्या गुलामगिरीतून सोडविणे. बाल पांडुरंगाचे प्राथमिक शिक्षण वर्ध्याला झाले. एके दिवशी इतिहासाचे पुस्तक वर्गात वाचीत असताना शिवाजीमहाराजांना लुटारू म्हटल्यामुळे त्यांनी पुस्तक भरवर्गात फाडले. तेव्हा वैद्य शिक्षकांनी पांडुरंगाला वर्गाबाहेर काढले. या इवल्या उदाहरणावरून त्यांच्या ठिकाणी असलेली प्रखर देशभक्ती आणि इंग्रजी राजवटीबद्दलचा तिरस्कार बालपणापासूनच होता हे स्पष्ट होते. त्यांच्यावर काही दिवस शाळाबंदी घालण्यात आली. ही घटना म्हणजे पुढील क्रांतिकारक घटनांची व त्यांच्या जाज्वल्य देशभक्तीची आणि तळमळीची नांदीच ठरली.

**बालपण :** डॉक्टरसाहेबांवर लोकमान्य टिळकांच्या देशभक्तीचा अमिट प्रभाव बालपणीच पडला. आपल्या देशाला स्वतंत्र करावयाचे ही प्रतिज्ञा त्यांनी लहानपणीच केली. १८९७ मध्ये पुणे येथे चाफेकरांना फाशी देण्यात आले. त्याच वेळी गुप्तसंघटनेचा एक प्रचारक वर्ध्याला आला होता. याच वेळी लोकमान्यांना कारावासही झाला. या सर्व घटनेचा परिणाम १२ वर्षांच्या पांडुरंगाच्या मनावर झाला. तेव्हा वडील सदाशिवरावांनी पांडुरंगाला लग्नाच्या बेडीत अडकविण्याचा प्रयत्न केला. पण पांडुरंगाला देशाच्या पारतंत्र्याची श्रृंखला तोडावयाची होती आणि त्यांनी लग्न न करण्याचा निर्धार केला. आपले सर्व आयुष्य देशाला स्वतंत्र करण्यासाठी अर्पण करावयाचे असा दृढ संकल्प पांडुरंगाने केला. पांडुरंग वर्धा सोडून एकाएकी निघून गेले. लग्नाची सक्ती करण्यात येणार नाही असे वडिलांचे आश्वासन मिळाल्यानंतरच पांडुरंग घरी परतला. क्रांतिकारक संघटनेशी पांडुरंगाने संधान बांधले. महाराष्ट्र केसरी लोकमान्य व

पंजाबकेसरी लाला लजपतराय यांच्याशी संबंध प्रस्थापित केले. सैनिकी शिक्षण घेऊन सैन्य निर्माण करून देशाला इंग्रजांच्या मगरमिठीतून सोडविणे हे ध्येय पांडुरंगाचे होते. पांडुरंग बालपणापासूनच हिंदुत्वनिष्ठ. हिंदुधर्मावर जाहीर भाषण केल्यामुळे इंग्रजांनी त्यांना अटक केली. परंतु खानखोजे या मुसलमानी आडनावाचा त्यांना लाभ मिळाला आणि त्यांची त्वरित सुटका करण्यात आली. त्यांनी लहानपणीच बांधव समाज ही संस्था (अभिनव भारतासारखी) काढली. नागपूरचे ज्येष्ठ बयोवृद्ध पुढारी मुख्य न्यायाधीश भवानीशंकर नियोगी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्थापक डॉ. हेडगेवार दत्तोपंत परांजपे, जमनालाल बजाज यांच्यासारखे लोक या संस्थेचे सभासद झाले होते. परंतु भारतात राहून देशाला स्वतंत्र करणे शक्य नाही याची जाणीव पांडुरंगाला झाली. भारताबाहेर जाऊन इंग्रजांच्या शत्रुराष्ट्राची मदत घेऊन भारताला स्वतंत्र करावयाचा असा निर्धार पांडुरंगानी केला. १९०५ मध्ये खानखोजे पुण्याला आले. आणि वासुकाका जोशींकडे उतरले. खानखोजे यांनी लोकमान्यांची भेट घेतली त्यांच्याजवळ सैनिकी शिक्षण घेऊन भारताला स्वतंत्र करावयाचे असा मनोदय प्रकट केला. लोकमान्यांचा आशीर्वाद पांडुरंगाला मिळाला. परदेशात जपान किंवा अमेरिकेत जाऊन सैनिकी शिक्षण व युद्धातील डावपेचांचे ज्ञान मिळविण्याच्या पांडुरंगाच्या विचाराला लोकमान्यांकडून प्रेरणा मिळाली. सांकेतिक पत्रव्यवहार करण्याकरिता चित्रशाळा केंद्र ठरले. १९०५ मध्येच त्यांनी पंजाबात जाऊन गाझीपूर येथे स्वामी रामतीर्थ यांची भेट घेऊन आपला मनोदय त्यांच्याजवळ प्रकट केला. खानखोजे यांची उंची पाच फूट दीड इंच, किरकोळ शरीरयष्टी पाहून पांडुरंग सैनिकी शिक्षण कसे घेणार यावर स्वामींचा विश्वास बसेना आणि त्यांनी पांडुरंगाला प्रशंसापत्र देण्याचे नाकारले. पांडुरंग क्रोधीत होऊन त्वेषाने म्हणाले " मी देशासाठी प्राण देण्यास तयार असताना तुम्ही प्रशंसापत्र देत नाही. तुम्ही देशभक्त नाही. तुमच्या सारख्या साधूंनी भारताला दुबळे केले. " हे उद्‌गार ऐकून व खानखोजे यांची उत्कट देशभक्ती ओळखून स्वामींनी पांडुरंगाला प्रशंसापत्र दिले आणि म्हणाले " खानखोजे यांची भलावणी करणे म्हणजे प्रत्यक्ष रामाचीच भलावणी करणे होय. To Recommend Khankhoje is to Recommend Ram.

**परदेशात गमन :** खानखोजे वर्ध्याला परतले. त्यांच्याजवळ द्रव्य नव्हते. भारतातून परदेशात मजूर नेण्याचे काम चालू होते वर्ध्याला त्याकरिता एक एजंट आला होता. त्याने खानखोजे यास परदेशात जाण्यासाठी मुंबई येथे येण्यास सांगितले. तेव्हा खानखोजे मुंबई येथे गेले. परंतु पावसाळ्यामुळे मजूर परदेशात पाठविण्याच्या बोटी बंद झाल्या. मुंबई येथे टाईम किपर, कारकुनी, मजुरी वगैरे कामे करण्याची तयारी त्यांनी दर्शविली. अमेरिकेत शिक्षणासाठी जाण्याकरिता अमेरिकन राजदूतालाही ते भेटले. आणि त्यांनी शिफारसपत्र दिले. परंतु अमेरिकन बोटीचा कॅप्टन इंग्रज होता. त्याने खानखोजे यांचा अमेरिकेत जाण्याचा उद्देश अचूक ओळखला आणि त्यांना लाथा मारून हाकलून लावले. इतकेच नव्हे तर त्यांनी गुप्त पोलीस खात्यात संशयित माणूस म्हणून त्याचे नाव नोंदविले.

पण पुढे सायगावला जाणाऱ्या फ्रेंच जहाजावर खानखोजे यांनी प्रवेश मिळविला व बोटीवर डेक धुण्याचेही काम केले. बरोबर हणमंत नायडू होते. इंग्रज अधिकाऱ्यांचा ससेमिरा बोटीवर होताच. सायगाव येथे आल्यानंतरच ब्रिटीश पोलिसांचा त्रास संपला तेथून फ्रेंच बोटीने ते जपान येथे गेले. खानखोजे यांना चिनी क्रांतिवाद्यांची फार मदत झाली. १९०६ मध्ये खानखोजे याकोहामाला आले आणि लाओस येथे चिनी क्रांतिकारक डॉ. सन यात सेन यांची भेट घेतली. नंतर इंडिया हाऊसचा पत्ता मिळविला. याकोहामाहून आगगाडीने खानखोजे टोकियो येथे गेले. तेथे बंगाली क्रांतिकारक अधरचंद्र यांची त्यांनी भेट घेतली. जपानमध्ये ते जपानी भाषा शिकले. जपानात १९०६ ते १९०८ पर्यंत त्यांचे वास्तव्य होते. जपानमध्ये लोकांना इंग्रजी भाषा शिकविण्याचे काम त्यांनी सुरू केले आणि शाळा काढली. सैनिकी शिक्षण घेण्यासाठी चिनी व जपानी लोकांना अमेरिकेत पाठविण्याची योजना होती. परंतु याच वेळी इंग्लंड आणि जपानमध्ये मैत्रीचे संबंध प्रस्थापित झाल्यामुळे हे कार्य संभवनीय नव्हते.

खानखोजे यांनी वासोदा विद्यापीठात उच्च शिक्षणासाठी प्रवेश मिळविला. याच ठिकाणी नायडू रसायनशास्त्र शिकत होते. दोघांनी सैनिकी शिक्षणासाठी अमेरिकेत जाण्याचा निर्धार केला. १९०८ मध्ये सॅनफ्रॅन्सिस्कोला जाण्याची सुवर्णसंधी खानखोजे यांना मिळाली.

**सैनिकी शिक्षण :** भूकंपामुळे सॅनफ्रॅन्सिस्को उद्ध्वस्त झाले होते त्या नगरीची पुनः स्थापना करण्यासाठी कोहमाहून बोटीनी मजूर पाठविण्याचा क्रम चालू होता. तेव्हा खानखोजे मजुरात मिसळून बोटीने सॅनफ्रॅन्सिस्को येथे उतरले. तेथे सुरेंद्रमोहन बोस या क्रांतिकारकाची त्यांनी भेट घेतली. उदरनिर्वाहाकरिता उपहारगृहात कपबशा भांडी धुण्याचे कामही पत्करले व द्रव्यसंचय केला. त्यानंतर खानखोजे हे कॅलिफोर्नियाच्या प्रदेशात असलेल्या मौंटटमाल पेस या ठिकाणी गेले. द्रव्य अधिक नसल्यामुळे तेथे सैनिकी डिप्लोमा प्राप्त केला. अमेरिकेत गेलेल्या भारतीय क्रांतिकारकांनी स्थापन केलेल्या स्वातंत्र्यसंघाचे कार्य त्यांनी केले. पोर्टलंड येथे शीख, पंजाबी लोकसंख्या असल्यामुळे खानखोजे प्रचाराकरिता तेथे गेले. भारत स्वातंत्र्यसंघाची पोर्टलंड येथे शाखा स्थापन केली. क्रांतीचे घोषणापत्र गुप्तपणे भारतात पाठविण्यास सुरुवात झाली. परंतु १९०९ मध्ये एशियाटिक एमिग्रेशन ॲक्ट अमेरिकेने पास केल्यामुळे भारतीय क्रांतिकारकांना त्रास झाला. भारतीयांना अमेरिकेत येण्यावर निर्बंध घालण्यात आला. खानखोजे यांनी 'पीरखान' हे नाव धारण करून रणशास्त्राच्या ग्रंथाचा सखोल अभ्यास केला.

**कृषी क्षेत्रात संशोधन, अध्ययन आणि अध्यापन :** इ.स. १९११ मध्ये कॅलिफोर्निया येथील ऑरेगन महाविद्यालयात कृषिशास्त्रात स्नातक पदवी मिळविली. १९१३ मध्ये वाशिंग्टन येथे एम्. एस.सी. ही पदवी कृषी क्षेत्रात प्राप्त केली. कृषी क्षेत्रात ही पदवी मिळविण्याचे एकमेव कारण म्हणजे भारत शेतकी प्रधान देश आहे. भारताचा संपूर्ण आर्थिक ढाचा शेतीवर अवलंबून आहे. धान्याचे जास्तीत जास्त उत्पादन भारतात झाले तरच भारत समृद्ध होईल ही गोष्ट खानखोजे यांनी अचूक ओळखली होती. आपल्या कृषिज्ञानाचा लाभ स्वतंत्र भारताला पुढे मिळावा हा उदात्त हेतू होता. खानखोजे मेक्सिको येथे गेले आणि मेक्सिको सरकारने कृषी

संशोधक म्हणून त्यांची नेमणूक केली. मेक्सिको नगरातील नॅ. ॲ. कॉलेजमध्ये ते जमिनी व पिके हे विषय शिकवीत. ते अत्यंत निपुण आणि विद्यार्थिप्रिय प्राध्यापक होते. मेक्सिको विद्यापीठात त्यांनी कृषिक्षेत्रात संशोधन करून डॉक्टरेटची पदवी मिळविली. कृषीवर त्यांनी १९२०-१९४० च्या दरम्यान अंदाजे ३५ ग्रंथ लिहिले. मक्यावर हायब्रीडचे संशोधन करून विद्याशाखेतील उच्चतम आचार्याची पदवी प्राप्त केली. तरोट्याच्या झाडाच्या शेंगातील बिया भाजून जीवनसत्वयुक्त कॉफी तयार करण्याचे संशोधन त्यांनी केले. विद्यार्थ्यांना ते नेहमीच निसर्गाच्या झाडांच्या सानिध्यात राहण्याचा व त्याचे सूक्ष्म अवलोकन करण्याचा सल्ला देत असत. जेनेटिक्सवर त्यांचे संशोधन मौलिक स्वरूपाचे होते. डॉक्टरेट मिळविणाऱ्या पहिल्या पाच विद्वानांत डॉ. खानखोजे यांची गणना झाली. हे भारतासारख्या कृषिप्रधान देशाचे महाभाग्य होय. संकरित धान्याचे ते प्रणेते होते. मेक्सिको सरकारने कृषी संशोधन संचालक म्हणून त्यांची नियुक्ती केली होती. १९४६ साली खानखोजे तेथून निवृत्त झाले. कृषीमधील त्यांचे मौलिक संशोधन स्वतंत्र भारतातील मध्यप्रांत, वऱ्हाडचे शेतीमंत्री श्री. आर. के. पाटील यांना समजले. श्री. आर. के. पाटील यांनी डॉक्टरसाहेबांना कृषी धोरण समितीचे अध्यक्षपद स्वीकारण्यासाठी भारतात (नागपुरात) बोलावले. आपल्या कृषिज्ञानाचा लाभ मातृभूमिला मिळावा या हेतूने त्यांनी भारतात येण्याचा निर्धार केला.

Agriculture Inquiry Committee चे अध्यक्ष म्हणून इ.स. १९४७ मध्ये डॉ. खानखोजे यांची नेमणूक झाली. भारतात त्यांचे आगमन ऑक्टोबर १९४९ मध्ये झाले. त्यांनी १९५२ मध्ये मध्यप्रदेश सरकारला कृषिविकासाची दिशा दाखविणारा अहवाल सादर केला. डॉ. के.जी. जोशी (डॉ. कमलाताई जोशी धन्वंतरी यांचे यजमान) हे खानखोजे यांचे साहाय्यक होते. त्यात शेती करण्याच्या अनेक योजनांचा आराखडा व कार्यक्रम सुचविला होता. शेतीचे उत्पादन वाढून ग्राम स्वावलंबी व समृद्ध होईल ही त्यांची उत्कट इच्छा होती.

१९५२ मध्ये डॉक्टरसाहेब मेक्सिकोत गेले. तेथेही शेतीवर संशोधन चालूच ठेवले. त्यांच्या रबर लागवडीतील सूचनांचा दोस्त राष्ट्रांना महायुद्धात फार उपयोग झाला होता. त्यांच्या मार्गदर्शनामुळे दक्षिण अमेरिकेत रबराच्या लागवडी करून रबराचे उत्पादन वाढले. गवतापासून सकस अन्न तयार करण्याचे अनेक शोध त्यांनी लावले, अमेरिकेच्या संशोधक शास्त्रज्ञांच्या यादीत डॉ. खानखोजे यांचे नाव अजरामर आहे. मेक्सिकोच्या कृषिमंत्रालयात त्यांचा अर्धपुतळा आणि गौरवपूर्ण उल्लेख करणारी ब्रांझपट्टी आजही अस्तित्वात आहे. परंतु भारत स्वतंत्र करण्याकरिता सशस्त्र क्रांतिकारकांत ज्यांचे अग्रगण्य स्थान आहे, कृषिक्षेत्रात ज्याने मौलिक संशोधन केले आहे आणि आपल्या आयुष्याची १८-२० वर्षे नागपुरात घालविल्यानंतर आयुष्याची इतिश्री याच नागपूर नगरीत झाली अशा थोर देशभक्त आणि श्रेष्ठ कृषिपंडिताचे योग्य स्मारक नागपुरात नसावे याची खंत वाटते.

डॉ. साहेबांची पत्नी मेक्सिकोत होती. डॉ. साहेब मेक्सिकोत सोन्याच्या खाणीत हिस्सेदार होते. एका अमेरिकन भांडवलदाराने २ लाखाचे भांडवल या खाणीत गुंतविले होते. डॉ.

साहेबांना मिळणाऱ्या नफ्यातून त्यांनी एक घर व थोडी जमीन मेक्सिकोत घेतली. भारतात ते एकटेच आले. त्या दरम्यान अमेरिकन भांडवलदाराचा मृत्यू झाला. त्यामुळे मजुरांनी यंत्रसामग्री विकून टाकली. त्यामुळे खाणीवरील त्यांची मालकी गेली. दुसऱ्यांदा ते भारतात आले. प्रथम ते डॉ. रामदास परांजपे यांना भेटून नंतर मामा श्री. बळवंतराव फत्तेखानीकडे गणोबाच्या वाडीत भेटीस गेले. त्यांचा मुक्काम शहरातील ज्येष्ठ ॲडव्होकेट श्री. बी. आर. मंडलेकर याजकडे होता. मेक्सिकोतील २ हजार डॉलरचे आणि पत्नीला मिळणारे एक हजार डॉलरची मासिक मिळकत सोडून मातृभूमीच्या प्रेमापोटी ते भारतात आले. श्रीमती जानकी यांनी आपले मेक्सिकोतील घर व जमीन विकून त्याही भारतात आल्या. पत्नी जानकीला फ्रेंच, स्पॅनिश या भाषा अवगत असल्यामुळे फ्रेंच वकिलातीत त्यांना नोकरी मिळाली. श्रीमती जानकी दिल्लीला गेल्या.

**कौटुंबिक जीवन व नागपूर वास्तव्य :** डॉ. खानखोजे यांची स्वतंत्र भारतातही अवहेलना झाली, असे म्हणावे लागेल. त्यांचे कृत्रिम दात खाली फरशीवर पडल्यामुळे फुटले तेव्हा दुसरे दात बसविण्यास पैसे नव्हते. द्रव्याकरिता त्यांनी स्वतंत्र भारतात हात पसरला नाही. त्यांची पत्नी जेनी सिडिक. डॉक्टरसाहेब १९३६ मध्ये स्पेनमध्ये माद्रिद येथे आले आणि एका घरी राहण्यास जागा मिळाली. त्या घरमालकाची पत्नी बेल्जियम होती. तिची धाकटी बहीण जेनी डॉक्टर खानखोजे यांच्या साहसी कृत्यावर भाळली आणि त्याची परिणती डॉ. साहेब आणि जेनीच्या विवाहात (१९३६) झाली. त्या वेळी डॉ. साहेबांचे वय ५२ वर्षांचे आणि जेनीचे वय ३५ होते. जेनीचे नाव जानकी ठेवण्यात आले. डॉक्टर हिंदुत्वनिष्ठ होते. जानकी गळ्यात मंगळसूत्र घाली. त्या अतिशय देखण्या, वेष मात्र युरोपियन पद्धतीचा करीत. त्यांना दोन मुली (१) सावित्री व (२) माया, डॉक्टरसाहेबांनी दोघींवर भारतीय वेषभूषा घालण्याचा निर्बंध घातला. नागपुरात पत्नी आणि मुलीला आणण्याचा उद्देश त्यांच्यावर हिंदुधर्माचे संस्कार व्हावे हा होता. मोठी मुलगी नागपूरला डॉक्टर झाली. डॉक्टरसाहेबांची इच्छा दोन्ही मुलींचा स्वीकार महाराष्ट्रीयांनी करावा अशी होती. परंतु ते शक्य झाले नाही. सावित्रीचा विवाह सैन्यात इंजिनियरिंगच्या मोठ्या हुद्यावर असणाऱ्या विजय सावने या पंजाबी गृहस्थाशी झाला. माया अमेरिकन गृहस्थाशी लग्न लावून तेथेच स्थायिक झाली.

डॉ. खानखोजे नागपुरात आल्यानंतर त्यांची कृषि महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून नेमणूक करण्यात यावी अशी शिफारस ले.कर्नल मंगळमूर्ती कुलगुरू यांनी तत्कालीन मध्यप्रदेश सरकार रविशंकर शुक्ल, मुख्यमंत्री आणि मंत्रिमंडळाला केली. परंतु मध्यप्रदेश सरकारने दाद दिली नाही. तेव्हा कुलगुरूंनी १०-१०-१९५६ रोजी नागपूर विद्यापीठात प्रस्ताव करून डॉक्टरसाहेबांची नेमणूक विद्यापीठ वसतिगृहाचे अधीक्षक म्हणून केली. मानधन ७५ रु. देण्यात येईल असे ठरले. सुदैवाने श्री. पी. सी.सेठी अधीक्षक यांनी या वेळी राजीनामा दिला होता. त्यांच्या जागी डॉ. साहेबांची नेमणूक झाली. २०-१०-१९५६ रोजी विधी महाविद्यालयातल्या मागच्या लाल बंगल्यात डॉक्टर खानखोजे अधीक्षक म्हणून राहावयास आले. परंतु वसतीगृहाचे सर्व कामकाज पाहण्याचे पूर्ण स्वातंत्र्य वार्डन प्रा. रघुनाथराव रानडे यांना दिले

होते. डॉक्टरसाहेबांनी कधीच वार्डनच्या कार्यात ढवळाढवळ केली नाही. डॉ. साहेबांची नेमणूक पार्टटाईम जर्मन भाषेचे अधिव्याख्याता म्हणूनही झाली. त्यांना आर्थिक मदत व्हावी हाच उद्देश नागपूर विद्यापीठाचा होता. जर्मन भाषेचे वर्ग डॉक्टरसाहेब L.I.T. भवनात घेत असत. त्यांचे वास्तव्य लाल बंगल्यात १८ जानेवारी १९६७ पर्यंत (मृत्युपर्यंत) होते.

**डॅक्टरसाहेबांचे स्वातंत्र्य आंदोलनातील योगदान :** लाला हरदयाल आणि भाई परमानंद यांनी गदर पार्टी स्थापन करण्यापूर्वी डॉ.खानखोजे, पं. काशीराम यांनी १९०८-१९०९ मध्ये India Independence League ची स्थापना केली. या लीगने म्हणजे डॉक्टरसाहेबांनी अमेरिका, कॅनडा येथे भारत स्वतंत्र करण्याचा आणि क्रांतीचा प्रचार केला. १९११ मध्ये विष्णु गणेश पिंगळे इंजिनियरिंगच्या शिक्षणाकरिता अमेरिकेत आले. तेथे त्यांची डॉ. खानखोजांशी भेट झाली. १३-३-१९१३ ला अस्टोरिया (ऑरगॉन) येथे हिंदुस्थानी असोसिएशन ऑफ पॅसिफिक कोस्ट स्थापन झाले. ता. २-६-१९१३ ला India Independence League आणि Hindustani Association of Pacific Cost या दोन पक्षांचे रूपांतर रीतसर गदर पार्टीत झाले. गदर पार्टीचे कार्यालय जुगांतर आश्रमात होते. गदर पार्टीचे प्रमुख लाला हरदयाळ होते. त्यांनी प्राध्यापकाचा राजीनामा देऊन नेतृत्वाची जबाबदारी स्वीकारली. डॉ. खानखोजे यांचे जीवन १९१३ ते १९२० पर्यंत गदर पार्टीशी निगडीत होते. डॉक्टरसाहेब बर्कले या ठिकाणी गेले. याच ठिकाणी खगेनदास व अधरचंद्र लष्कर, सुरेंद्रमोहन या क्रांतिकारकांची भेट घेऊन त्यांच्याबरोबर काही दिवस राहिले. भारतातील क्रांतिकारकांच्या केंद्राची माहिती डॉक्टरसाहेबांना कळली आणि या सर्वांनी इंग्रजांविरुद्ध बंड करण्याचे ठरविले. डॉ. साहेबांचे मिनेसाटा येथील मिलिटरी अकेडेमिमधील सैनिक शिक्षण पूर्ण झाल्यानंतर ते हेलेना येथे गेले. १९१४ मध्ये पहिले महायुद्ध सुरू झाले. दोस्तराष्ट्रांच्या (इंग्लंड, फ्रान्स, रशिया) सुरुवातीच्या पराभवाचा लाभ घ्यावा हा उद्देश होता. त्याकरिता भारतात शस्त्रे पाठवून भारतीय सैनिकांना फितूर करून इंग्रजांविरुद्ध उठाव करावा अशी योजना डॉ. खानखोजे आणि गदर पार्टीने आखली. भारताबाहेर राहणाऱ्या भारतीयांनी भारताला (युद्धाचा मार्ग पत्करून) स्वतंत्र करण्यासाठी प्रयत्न करणे हा गदर पक्षाचा उद्देश होता.

१९१३ मध्ये गदर पक्षाचा पहिला अंक निघाला. मराठी आवृत्तीचे काम डॉक्टरसाहेब आणि पिंगळे यांच्याकडे होते. इंग्रजांचे शत्रू म्हणून जर्मन लोकांची मदत मिळत होती. गदर पक्षाच्या प्रचारी आणि प्रहारी अशा दोन शाखा होत्या. प्रहारी शाखेचे गुप्तपणे शस्त्रास्त्राचे आणि सैनिकी शिक्षण देण्याचे कार्य डॉ. खानखोजे यांच्याकडे सोपविण्यात आले. या कार्याकरिता जर्मनीत बर्लिन कमेटीची स्थापना करण्यात आली. चट्टोपाध्याय, चंपकराम पिल्ले, भूपेन्द्रनाथ दत्त, बरकतउल्ला, डॉ. प्रभाकर हे बर्लिन कमेटीचे प्रमुख कार्यकर्ते होते. हरदयाळही त्यांच्यात समाविष्ट झाले. भारताकडे समुद्रमार्गाने (जपान सयाम) शस्त्रे पाठवावयाची आणि खुष्कीमार्गाने अफगाणिस्थान-बलुचिस्थान येथील स्वतंत्रप्रिय पठाणांना इंग्रजाविरुद्ध बंड करण्याची चिथवणी द्यावयाची अशी योजना आखण्यात आली. हे कार्य डॉ. खानखोजे

यांच्याकडे मुसलमानी आडनावामुळे सोपविण्यात आले. जर्मनीतून तुर्कस्थान व तेथून अफगाणिस्थानात जाऊन इंग्रजांविरुद्ध उठाव करावयाचा असे ठरले. १९१६ मध्ये खानखोजे जिब्राल्टर, ग्रीस, जर्मनी, रशिया मार्गाने अफगाणिस्थानात महमदखान बनून पोहोचले.

**इराणात महंमदखान :** खानखोजे यांनी इराणच्या फौजेत प्रवेश मिळविला. तीन वर्षे त्यांनी युद्धात भाग घेतला. महंमदखान बुशयारला जनानखान्यात काही काळ घालवून इंग्रजांना चुकवून बगदादला गेले. महंमदखानाचा पाठलाग इंग्रज करीत असतानाच खानखोजेच्या घोड्याला आणि त्यांना बंदुकीच्या गोळ्या लागल्या महंमदखानाला कैद करण्यात आले. तेथून त्यांनी पळून जाण्याची युक्ती केली. हागवणाचे दुखणे खानखोजेना होते. त्यांना वारंवार शौचाला जावे लागत असे. त्या वेळी श्रृंखला काढण्यात आल्या याचा फायदा घेऊन आणि इराणी लोकांच्या मदतीने जखमी वाघ निसटला. महंमदखान इराणी लुटारूंच्या टोळीत सामील होण्यापूर्वी तीन दिवस उपाशी अवस्थेत असताना डॉ. साहेबांनी आत्महत्येचा अयशस्वी प्रयत्न केला. इराणी टोळीत सामील झाल्यावर त्यांनी डॉ. साहेबांना अन्नपाणी दिले तेथून ते निसटले. इंग्रजांविरुद्ध प्रचाराचे कार्य खानखोजे यांनी चालूच ठेवले. १९१८ मध्ये पहिले महायुद्ध संपले. परंतु महंमदखानास पकडण्यासाठी इंग्रजांनी बक्षीस लावले पण हाजीरखानाने त्यांना इंग्रजांच्या स्वाधीन केले नाही. बखत्यारी टोळीतून अंतस्थपणे पळून जाण्यास डॉ. साहेबांना सांगितले. नंतर एका इराणी सरदाराने त्यांना आश्रय देऊन आगाखान हे नाव डॉ. साहेबांना दिले.

इराणी सरदार औषधोपचारासाठी लंडनला गेले. त्यांच्याबरोबर खानखोजे लंडनला गेले. १९१९ मध्ये डॉक्टरसाहेब भारतात आले आणि लोकमान्य टिळकांना गुप्तपणे मुंबई येथे भेटले. डॉ. खानखोजे टिळकांना गुरूवर्य असे संबोधित. खानखोजेंच्यामागे इंग्रज गुप्तहेर होते. तेव्हा भारतात राहणे धोक्याचे म्हणून १९२१ मध्ये ते बर्लिनला परतले आणि तेथून १९२४ मध्ये मेक्सिकोत गेले.

मेक्सिकोत डॉक्टरसाहेबांनी स्वतःचा बंगला बांधला. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला. वर उल्लेखिल्याप्रमाणे खानखोजे भारतात आले. मागून जानकीबाई भारतात आल्या ८ मे १९५५ मध्ये थोर देशभक्त भगतसिंगाच्या पुतळ्याचे अनावरण मिरजापूर येथे या दुसऱ्या क्रांतिकारक खानखोजे यांनी केले या वेळी कच्छवर पाकिस्तानने आक्रमण केले होते. तेव्हा मिरजापूरच्या स्टेशनवर स्वागत करणाऱ्या मंडळींना खानखोजे मार्मिकपणे म्हणाले, " या समारंभाला मला कशाला बोलाविले ? माझी खरी जागा आघाडीवर आहे. "

डॉ. साहेब भारतात आले. पण निराशा त्यांच्या पदरी पडली. अखंड भारत खंडित झाला होता. भारतीय समाज पाहून आनंदही झाला नाही. स्वतंत्र भारताच्या समाजात त्यांना चैतन्य दिसले नाही. तरी त्यांनी सामाजिक प्रबोधनाचे कार्य सुरू केले. नागपूर येथे नूतन भारत विद्यालयाची स्थापना केली. १५ ऑगस्टच्या स्वातंत्र्यदिनी भाषण देत असताना त्यांच्या डोळ्यांतून अश्रू निघत. मन गहिवरून येई. कारण भाषणापूर्वी " पंजाबसिंधगुजरात, मराठा हे राष्ट्रगीत होते. अर्धा पंजाबही गेला आणि पूर्ण सिंध गेला याचे दुःख त्यांना फार होत असे. वर्धा

येथे बालमेळाव्यात बक्षीस वितरणाचा कार्यक्रम डॉक्टरसाहेबांच्या हस्ते झाला. त्यावेळी डॉ. साहेद म्हणाले "प्रत्येकानी स्वतंत्र व्यवसाय सुरू करावा, नोकरी करू नये. पानाचा ठेला उघडला तरी चालेल. उद्योगधंदे स्थापन करावे. उद्योगाच्या घरी रिद्धीसिद्धी पाणी भरी" भारताला समृद्ध करा.

डॉ. खानखोजे यांची गणना स्वातंत्र्यवीर सावरकर, भगतसिंग, सुभाषचंद्र बोस, या सारख्या क्रांतिकारकात होते. त्यांचे ब्रीदवाक्य Earn while you learn हे असून भारतीय जवानांनी सैन्यात दाखल व्हावे. भारताला अखंड ठेवावे. आजही आपले लोकप्रिय पंतप्रधान भारताला अखंड ठेवा आणि बलवान समृद्ध करा असे म्हणत आहेत. खानखोजे युद्धविशारद होते. कृषितज्ज्ञ किंवा पंडित होते, थोर संशोधक व प्रखर राष्ट्रवादी व थोर क्रांतिकारक होते. या अद्भूत साहसी थोर क्रांतिकारक आणि प्रकाण्ड कृषि संशोधकाचा जन्म ७ नोव्हेंबर १८८४ रोजी झाला डॉ. खानखोजे यांचे जन्मशताब्दी वर्ष १९८४-१९८५ असल्यामुळे त्यांच्या मातृभूमीला दुरावलेला आपल्या थोर कार्याच्या विद्वानाला आणि सशस्त्र क्रांतिकारकाला अभिवादन.

## संदर्भ सूची


१. प्रा. रघुनाथराव रानडे माजी वार्डन नागपूर विद्यापीठ वसतीगृह आणि प्राध्यापिका सौ. रानडे. (यांची मुलाखत) डॅ.ए.यु.देशपांडे माजी मेडिकल ऑफिसर विद्यापीठ वसतीगृह यांची भेट. ॲडव्होकेट प्रसिद्ध कायदे पंडित श्री. मनोहर पुरुषोत्तम उपाख्य बापुसाहेब केळकर यांची मुलाखत. दुर्दैवाने ॲडव्होकेट मनोहर यांचा मृत्यू ४-१२-१९८५ रोजी झाला. दैनिक 'तरुण भारत' नागपूर ४-१२-१९८५.

२. श्री. लाडखेडकर, डॅ. भाऊसाहेब कोलते, श्री. आ. के. पाटील यांची मुलाखत.

३. प्रा.सौ. रानडे. सेवानिवृत्त अधिव्याख्याता भूगोल विभाग, नागपूर महाविद्यालय (कला व समाज विज्ञान संस्था यांची भेट.

४. प्रा. रानडे वार्डन, वसतिगृह, डॅ. रामदास परांजपे, श्रीमती माई चौरीकर (मामेबहीण) यांची मुलाखत.

५. 'एकता'चा अंक ३ श्रावण १९०३, १ ऑगस्ट १९८१ संपादक रामदास कळसकर लेख स्वदेशी, परदेशी-दरवेशी डॅ. खानखोजे पान २४ लेखक - विष्णु गंगाधर आगरकर. (शुक्रवार पेठ, पुणे २)

६. श्रीमती माई चौरीकर यांचेकडून मिळालेली माहिती.

७. रणझुंजार डॅ. पां. स. खानखोजे यांचे चरित्र (ग.वि.केतकर) पान ३-४

८. न. चिं. केळकर कृत लो. टिळकांचे चरित्र पूर्वार्ध सन १८९९ अखेर, सन १९२३ पान नं. ५२३ ते ५४३ पान ५८०

९. रणझुंजार डॅ. पां. स. खानखोजे यांचे चरित्र पान ४—५

१०. रा. वि. काळी कृत ' दिव्यत्वाची प्रचिती ' पान १७
११. रा. वि. काळी कृत ' दिव्यत्वाची प्रचिती ' पान १७, रणझुंजार डॉ. पां. स. खानखोजे यांचे चरित्र, पान ७, लेखक - ग. वि. केतकर.
१२. रा.वि. काळी कृत ' दिव्यत्वाची प्रचिती ' पान १८ पां. स. खानखोजे चरित्र पान २५
१३. रणझुंजार डॉ. पां. स. खानखोजे यांचे चरित्र पान २८, दिव्यत्वाची प्रचिती पान १८
१४. रणझुंजार पां.स. खानखोजे चरित्र, पान ३०
१५. केतकर कृत डॉ. खानखोजे यांचे चरित्र, पान ३६-३७. ' एकता ' अंक ३, पान २७
१६. केतकर कृत " डॉ. खानखोजे यांचे चरित्र पान ३८
१७. खानखोजे यांचे चरित्र ४०-४१
१८. एकता अंक ३ पान २७, चित्रमय जगत एप्रिल १९१५ अंक पान १९३ श्री संत यांचा लेख.
१९. ' एकता ' अंक ३ मान २७ चित्रमय जगत एप्रिल १९१५ अंक पान १९३
२०. रणझुंजार पां. स. खानखोजे यांचे चरित्र पान ९२. डॉ. जोशी धन्वंतरी यांची मुलाखत. (धरमपेठ) माजी संचालक कृषी विभाग. मध्यप्रदेश शासन. ' तरुण भारत ' २६-८-१९८५ प्रा. दादा मानकर यांचा लेख.
२१. अप्रकाशित डॉ. खानखोजे यांची पर्सनल फाईल नं. १५५ नागपूर विद्यापीठ 'He was appointed as a chairman of agriculture Enquiry Committee.
२२. माजी संचालक डॉ. जोशी (कृषी विभाग) यांची मुलाखत ' तरुण भारत ' नागपूर २६-८-१९८५ प्रा. दादा मानकर यांचा लेख पंकृवित " डॉ. खानखोजे यांचे अध्यासन निर्माण करावे "
२३. एकता अंक ३ पान ३१. विष्णु गंगाधर आगरकर यांचा लेख शके श्रावण १९०३ इ.स. ऑगस्ट १९८१, पां. स. खानखोजे यांचे चरित्र पान ७०
२४. डॉ. रामदास परांजपे, यांची मुलाखत वय ७३, महाल नागपूर, सौ. फाटे यांची मुलाखत - सौ. मालती फाटे डॉ. खानखोजे यांची मामेबहीण. आणि माझी सासूबाई श्रीमती माई चौरीकर यांची मुलाखत. ' एकता ' पान ३२
२५. एकता पान ३२, रणझुंजार डॉ. पां. स. खानखोजे यांचे चरित्र पान ७३-७५
२६. अप्रकाशित Dr. P.S. Khankhoje's personal file No.155 29th Oct. 1956. Resolution of the executive council dated 10-10-1956 Item No. 31 - Considered the proposal of the V.C. L.C. K.T. Mangalmart with regard to the appointment of Dr. P.S. Khankhoje as a Superintendent of the University Hostel resort that Dr. P.S. Khankhoje be appointed as a superintendent of University Hostel on a remuneration of Rs. 75 per month.

२७. अप्रकाशित Dr. P.S. Khankhojes personal file No.155 Dated 29th Oct. 1956. Item No. 31 Dr. Khankhoje moved yesterday. He occupied the quarter on 21-10-1956. Dr. Khankhoje appointment Letter on 27th Oct 1956 and he go the Letter on 29th Oct 1956. P.C. Sethi resign his post. In his place Dr. Khankhoje is appointed.

प्रा. रघुनाथराव रानडे यांची मुलाखत.

२८. रा. वि. काळी कृत दिव्यत्वाची प्रचिती, पान ६७ (१९८५)

२९. केतकर कृत डॅा. पां. स. खानखोजे यांचे चरित्र (१९६६) पान ४६, दिव्यत्वाची प्रचिती

३०. पान ७३

प्रितमसिंह पंछी कृत 'गदर की गुंज' पान ७२, केतकर कृत डॅा. पां. स. खानखोजे यांचे चरित्र, पान ५१, दिव्यत्वाची प्रचिती पान ७३

३१. केतकर कृत डॅा. पां. स. खानखोजे यांचे चरित्र, पा. ५१ दिव्यत्वाची प्रचिती पान ७३

३२. रा. वि. काळीं कृत दिव्यत्वाची प्रचिती पान ७३-७४. गदरचे राष्ट्रगीत 'करके गदर सोवियानुंकडिये। हिंदते निशान इनादाना छडिये। उठ्ठो शेरो जैसे बादल धार दे। लेंगे हे आजादी अस्सी नाम जोड दे। हे होते.

३३. केतकर कृत डॅा. खानखोजे यांचे चरित्र पान ५०-५१, रा.वि. काळी कृत दिव्यत्वाची प्रचिती पान ७४, पंछीकृत 'गदर की गुंज पान ७८.

३४. दिव्यत्वाची प्रचिती पान ७४, केतकर कृत डॅा. पां. स. खानखोजे यांचे चरित्र पान ५४-५७.

३५. केतकर कृत डॅा. पां. स. खानखोजे यांचे चरित्र पान ५७ ते ६२-६४. गदरचा राष्ट्रीय ध्वज लाल रंगाचा त्यावर भारताचा नकाशा 'हिंद हमारा जान है। और हिंद हमारा प्राण। भगवत बने हम हिंद के। और हिंद के कुरबान। हे राष्ट्रगीत झाले. दिव्यत्वाची प्रचिती पान ७४

३६. केतकर कृत डॅा. पां. स. खानखोजे यांचे चरित्र, पान ६४, ६५, ६६, ६९, ७०

३७. केतकर कृत डॅा. पां. स. खानखोजे यांचे चरित्र, पान ७५-८०

३८. सौ. सरल खानखोजे (ढबडगांव) मुख्याध्यापिका सरस्वती हायस्कूल, बालाघाट यांची मुलाखत (डॅा. पां. स. खानखोजे यांची पुतणी)

३९. अप्रकाशित डॅा. पां.स. खानखोजे यांची फाईल नं. १५५ नागपूर विद्यापीठ.

४०. प्रा. डॅा. भा. रा. अंधारे, इतिहास विभाग प्रमुख, कला व समाज विज्ञान संस्था. नागपूर.

•

थोडेसे फ्लॅशबॅक : ३

# लोकमान्य टिळकांची धुळ्यातील दोन व्याख्याने

## पहिले व्याख्यान

तारीख ६-१२-१९१७ रोजी रात्री ८ वाजता विजयानंद थिएटरात व्याख्यानाच्या जाहिराती वाटण्याचे आत आवार लोकसमुदायानी गच्च भरले होते. लोकसमुदाय १०।१५ हजाराजवळ असावा असे वाटते. लो. टिळक हे व्याख्यानाचे ठिकाणी रात्री ८ वाजता आले. रा.ब. देव वकील यांनी त्यांच्या सूचनेस सूचना आणली की, आजचे सभेचे अध्यक्षस्थान रा. कोतवाल वकील यांनी स्वीकारावे व त्यांच्या सूचनेस पुष्टी मिळाल्यावर रा. कोतवाल वकील हे अध्यक्षस्थानी विराजमान झाले. अध्यक्षांचे थोडे भाषण झाल्यावर धुळेकरांकडून लोकमान्यांना मानपत्र समर्पण करून हार वगैरे घातले. लोकमान्यांनी आपले भाषणास सुरुवात केली. ते म्हणाले आपण या ठिकाणी सर्व शहरवासीयांनी माझा जो सन्मान केला, त्याबद्दल मी आपला आभारी आहे. हा सन्मान माझा झाला की दुसऱ्याचा झाला याचा विचार केला तर हा माझा सन्मान नाही. येथे जे मानपत्र वाचले गेले, हे मानपत्र मजसारख्या व्यक्तीस नाही, तर आज आपल्या प्रांतात आपल्या जिल्ह्यात, आपल्या इलाख्यात व हिंदुस्थानात स्वराज्याचा जो घोष सुरु आहे तो नसता तर माझा सन्मान झाला नसता, आपण उत्साहपूर्वक जे मानपत्र दिले, त्याचा स्वराज्यातर्फे, ज्या चळवळीतर्फे मी स्वीकार करतो, ज्याप्रमाणे प्रतीक म्हणून मूर्ती ठेवावी लागते, त्याप्रमाणे माझी नश्वर मूर्ती स्थापिली आहे, असे म्हणण्यास हरकत नाही व माझा जो सन्मान केला त्यात आपला असा हेतू आहे, असे मी सांगू शकतो. दहा वर्षांपूर्वी स्वराज्य मागणे राजद्रोही गणले जात असे. ही स्थिती आता पालटली आहे. स्वराज्य शब्द आम्ही जेव्हा वापरू लागलो तेव्हा आमच्यातले काहीजण इंग्रजी राज्य घालवून देणार की काय? स्वराज्याचा अर्थ निर्भेळ स्वराज्य आहे की काय? अशा कुशंका निष्कारण करीत असत, ही कल्पना आता गेली. दादाभाईंनी स्वराज्याची कल्पना कलकत्ता येथे काँग्रेसमध्ये स्पष्टपणे ठेविली. या पूर्वी या देशात ही चळवळ होती. स्वराज्यव्यवस्था बरोबर नाही. अशा मताने पुष्कळ लोक प्रयत्न करीत असे. पेशवाईत, मोगलाईत आमच्या ताब्यात असलेली राज्यव्यवस्था गेली. या शंभर वर्षांत अधिकारी करतील ती पूर्वदिशा अशी स्थिती झाली आहे. पूर्वी सर्व व्यवस्था आपल्या देशात आपल्या हाती असे, खेड्यातील व्यवस्था खेड्यातील लोक करीत असत, खेड्यातील ही व्यवस्था इंग्रज सरकारास

पसंत पडली नाही. त्यांनी निरनिराळ्या राज्यव्यवस्था उत्पन्न करून परकीय अंमलदारांनी हळूहळू सर्व व्यवस्था आपल्या हाती घेतली, हल्लीच्या बुराक्रसाने सर्व राज्यव्यवस्था आपल्या हाती ठेविली आहे. अंमलदार रयतेच्या कल्याणाकरता असतो पण रयतेला विचारत नसतो अशी स्थिती झाली आहे. आपण ज्याप्रमाणे गुरांचा गोठा सांभाळतो, गुरे आपसांत भांडत नाहीत, मारीत नाहीत ही खबरदारी घेतो त्याप्रमाणे बुराक्रसी आमचा कारभार पाहतो, पण बुराक्रशी आम्ही माणसे आहोत गुरे नाहीत हे विसरले (हंशा) आमची कामे त्यांनी आपल्या हातात घेतली. धनगर आपल्या मेंढ्यांमध्ये शांतता राखतो त्याप्रमाणे त्यांनी आमच्यात शांतता राखीली, दंगाधोपा बंद केला. प्रत्येक खात्यात तुमची तक्रार असेल, तर अर्ज करण्याचा हक्क मात्र तुमच्याकडे ठेविला आहे. आम्ही म्हणतो दारूचे दुकान बंद करा. पण अंमलदार म्हणतो त्यात तुमचे कल्याण आहे अशी स्थिती झाली आहे. ही राज्यपद्धती पशूंना बरोबर आहे पण माणसांना बरोबर नाही, (टाळ्या) आम्ही या कामाला अयोग्य आहे, ही सबब सांगण्यात येते. राज्यकारभार कसा चालवावा हे आम्हाला माहिती होते. ही व्यवस्था आमच्यापासून इंग्रजांच्या ताब्यात गेली.

३०।४० वर्षे आम्ही प्रत्येक खात्यात ही सुधारणा करा, येथे बिघडते, तेथे बिघडते, असे सांगितले पण ऐकण्यात आले नाही; म्हणून आम्ही सांगतो सर्व राज्यकारभार आमच्या ताब्यात द्या (टाळ्या). मुलगा वयात आला म्हणजे वडिलोपार्जित इस्टेटीवर हक्क सांगतो त्याप्रमाणे आम्ही बुराक्रसीवर फिर्याद मांडून हक्क मागतो, ही राज्यव्यवस्था आपल्या हातात मागणे हे बेकायदेशीर नाही असे हायकोर्टाने ठरविले आहे. (टाळ्या). आमचा कारभार आम्ही पाहणे हे म्हणण्याचा हक्क माणसांना आहे, गुरांना नाही. शिक्षण मिळाले, पूर्वपरंपरा उत्तम आहे, अशा स्थितीत माझ्या देशाचा कारभार पाहण्यात मी चुकलो तर चुकलो, आमच्या चुका आम्ही सुधारणे हेच स्वराज्य. ' आम्ही स्वराज्य मागणार हा आमचा जन्मसिद्ध हक्क आहे. ' स्वराज्य कां मागता हा प्रश्न म्हणजे तुम्हास भूक कां लागते हे विचारण्यासारखे आहे. (हंशा) आम्ही माणसे आहोत. वयातीत आहो, आम्ही वेडे नाही म्हणून आम्हास स्वराज्य पाहिजे.

कराचे पैसे आमच्या देशात आमच्या सल्ल्याने, आमच्या हुकमतीने खर्च केले पाहिजेत, हेच स्वराज्य होय. मालक आमचे बादशहा आहेत, आमचा कायदा आम्ही करणार हे स्वराज्य मागा असा दादाभाईंनी उपदेश केला. कायदे कौन्सिलांत आमचे लोक आहेत, आम्ही ओरड करतो पण सरकार ऐकत नाही. आमच्या मतास विचारीत नाही. जमीन महसुलाच्या बिलाच्या वेळी आमचे कौन्सिलातील प्रतिनिधी उठून गेले, त्यांचे म्हणणे न ऐकण्यात सरकारने आपला अपमान म्हणण्याचेऐवजी त्याचा अपमान केला नाही काय ? कायदे करताना तुम्ही सल्ला द्या. चांगला असल्यास ऐकू, आम्ही तुमचा सल्ला घेत जाऊ पण अखेरचा निकाल आम्ही देऊ. बहुमत हुकमत या गोष्टी म्हणजे स्वराज्य होय. खुद्द व्हाईसरायसाहेबांनी असे जाहीर केले आहे की, स्वराज्य मागणे स्वराज्याची आकांक्षा ठेवणे व त्याबद्दल प्रयत्न करणे ही गोष्ट सरकारास कबूल आहे. हा हक्क प्रजेला दिला पाहिजे, पण त्यात आहे हा हक्क हळूहळू देण्यात यावा. लढाईमुळे इंग्रजांची खात्री झाली आहे की ही राज्यपद्धती चुकीची आहे, यात दोष आहेत. लढाईमुळे लढाऊ माणसांचा

तुटवडा पडला पण माणसे नाहीत. एकदम शिपाई कोठून आणावेत. शालीवाहनाच्या सैन्याप्रमाणे एकदम सचीव शिपाई करण्याचा शास्त्रीय शोध अद्यापी निघाला नाही. माणसांचा तुटवडा पडला. शंभर वर्षं राज्य करून माणसे नाहीत याचे कारण काय ? पूर्वी वाटेल तितके सैन्य उभेकरता येत होते, राज्यपद्धतीत दोष आहे. स्पष्टपणे स्वराज्याची मागणी आपण केली पाहिजे. हिंदुमुसलमान एक झाले. दोघांची मागणी एक आहे. या वेळी आम्ही गप्प बसलो. आम्ही निक्षुन सांगितले नाहीतर आमचा देश खड्यात पडण्याची वेळ आली आहे. या वेळी सर्वांनी एकदिलाने आपले मागणे स्पष्टपणे सांगितले पाहिजे. काँग्रेस लीगच्या योजनेस पाठिंबा दिला पाहिजे. होमरूल लीगचे सभासद होण्यास तुमचे काही नुकसान नाही. ही झटापट सुरू आहे. झटापटीत मागे पडू नका. जरा ढिले सोडाल तर मागे पडाल व राहाल हे लक्षात ठेवा. स्वराज्य म्हणजे काय असे कोणी विचारील तर आपला कारभार आपण पाहणे, असे उत्तर द्या. आजपर्यंत तुम्ही आम्हास जेवू घातले आता मी आपल्या हाताने जेवणार, हा मनुष्यधर्म आहे असे स्पष्टपणे सांगण्यास तयार झाले पाहिजे. ही लाट सर्व ठिकाणी उत्पन्न झाली पाहिजे. अशी सर्व पेचांतूनही स्वराज्य चळवळ या स्वरूपात आली आहे. स्वराज्याबद्दल खेड्यापाड्यातून लोकांना समजावून सांगा. निश्चय करून उद्योगाला लागा. यश देणे परमेश्वराच्या स्वाधीन आहे. परमेश्वर या वेळी अनुकूल आहे. ही गोष्ट लक्षात घ्या. आपण दिलेले मानपत्र होमरूलला आहे. माझ्याकडे राहू शकत नाही, स्वराज्याकरिता तन, मन, धन अर्पण करा अशी आपणास माझी विनंती आहे. (टाळ्यांचा गजर)

## दुसरे व्याख्यान

लोकमान्यांची स्वारी तारीख ७ - १२ - १७ रोजी रात्री ८ वाजता सभास्थानी आल्यावर मारवाडी मंडळातर्फे प.रामनारायण शास्त्री यांनी व रा. शिदोरे वकील यांनी संध्याश्रमातर्फे मानपत्र दिले नंतर लोकमान्य टिळक म्हणाले; अध्यक्ष महाराज व सभ्य गृहस्थ हो, मारवाडी ब्राह्मण मंडळीतर्फे आज मला जे मानपत्र दिले आहे त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो, हेही मानपत्र मजकरिता नसून स्वराज्याकरिता आहे असे मी समजतो. काल स्वराज्याबद्दल मी दोन शब्द सांगितले. आज त्याच विषयावर आणखी चार शब्द सांगणार आहे. स्वराज्य हा विषय असा आहे, याजवर १०।५ व्याख्याने पुरी पडायची नाहीत. स्वराज्याची कल्पना कशी आली, पुढे ही कल्पना कशी वाढत गेली व यानंतर काय निष्पन्न होणार, याची थोडी माहिती मी काल रोजी सांगितली. ‘ स्वराज्य हा आपला जन्मसिद्ध हक्क आहे प्रत्येकाने हा हक्क बजाविला पाहिजे. ’ नाहीतर तो मनुष्यपणाला मुकेल.

पूर्वी याला लोकमत अनुकूल नव्हते. आता आहे. विशेष करून बिझांट बाईना या चळवळीत पडल्यापासून फार मोठा धनिक व सुशिक्षित वर्ग या चळवळीत येऊन मिळाला. त्यांच्या अटकेमुळे तर बॅरिस्टर, वकील व व्यापारी हेसुद्धा स्वराज्यवादी बनले. स्वराज्याची चळवळ दक्षिणी लोकांचीच नसून सर्व जातीच्या लोकांची आहे. ही चळवळ मूठभर लोकांची आहे असे

काहीजण सरकारास उपदेश करतात पण ते किती चुकीचे हे आपणास कळून येईल. हा त्या लोकांचा उपदेश खोटा आहे पण यात त्यांचा आतला होतू असला पाहिजे असे मानावयास काही हरकत नाही.

पुण्याहून पेशवाई गेली, त्या वेळी लोकांना असे वाटले की, फक्त पेशवाईच्याऐवजी इंग्रजी आली व आपले हक्क शाबीत राहतील ही समजूत खोटी ठरली. जाहगिरदारांचे व सरंजामदारांचे हक्क नाहिसे होताहेत आतां कुलकर्णींवर गदा सुरू झाली आहे. सन १८५८ पर्यंत कंपनीचा कारभार सुरू होता, त्यांच्या नाण्यावर तराजू होता. राणी सरकारने ही व्यवस्था आपल्या ताब्यात घेऊन राज्यकारभार चालविला. देशात आगगाड्या सुरू झाल्या. तारायंत्रांनी देश बांधला गेला. हिंदुस्थानात एतद्देशीयत्व उत्पन्न झाले. सर्व प्रांत एक केले. सर्व भेद नाहीसे करण्यात आले. राज्यव्यवस्थेचे केंद्रीकरण झाले. अशा रीतीने बुराक्रसीने आपला कारभार ६० वर्षे केला. वतनदार नाहीसे करून नोकरपेशा सुरू केला. त्याप्रमाणे १९१७ सालापर्यंत बुराक्रसीने राज्यकारभार केला. सर्व हिंदुस्थान देश एक ठेवून त्याचा भाग्योदय कसा करावा याचा विचार केला पाहिजे. हे काम बुराक्रसीने केले नाही म्हणून स्वराज्याची योजना आहे. जंगल तोडल्यावर नांगरण्यात येते, नंतर पेरणी करावयाची असते. पहिली दोन कामे झाली, आता तिसरे काम करावयाचे आहे. कंपनीनें राज्य स्थापिले, बुराक्रसीने सुरळीत राज्यव्यवस्था केली, फलाची आशा केली नाही. आता दंगेधोपे राहिले नाहीत. शिक्षण साधारणपणे देण्यात आले. पण ते धनी आम्ही नोकर असा संबंध कसा टिकणार ? बरोबरीचे हक्क आम्हांस पाहिजेत. आजचा काल स्वराज्याच्या पेरणीचा आहे. त्याची फले पुढे आपणास मिळणार आहेत.

मला मोठ्या अधिकाऱ्याने विचारले स्वराज्य मिळाल्यास तुमचे काय होणार ? स्वराज्य मिळाल्यानंतर आमच्या अडचणी सुरू होतील, असे मी उत्तर दिले. स्वराज्य मिळाल्यावर आपल्यावर जबाबदारी वाढेल. आपल्या राष्ट्राला बरोबरीला आणावयाचे आहे. आपला अधिकार सुखावह बसण्याचा नाही. पैशाची अडचण येईल आपल्या कर्तृत्वाची व बुद्धीची जर काही जरुरी असेल, आपल्यामध्ये या गुणाची वाढ व्हावी असे वाटत असेल, देशापुरती माणसे व्हावीत असे वाटत असेल, ब्रिटिश साम्राज्याचे नव्हेतर हिंदुस्थानचे संरक्षण करणारी माणसे या देशात उत्पन्न व्हावी असे वाटत असेल तर स्वराज्याशिवाय उपाय नाही. वरील गोष्टी करण्याचा आमचा संकल्प आहे. हे सर्व प्रश्न आपणापुढे उभे राहतील. याला पिंजऱ्यातल्या पोपटाचे उत्तम उदाहरण आहे. आमची स्थिती पोपटासारखी आहे. देशाची उन्नती करण्याकरिता आम्हास स्वराज्य द्या. (टाळ्या)

स्वराज्याच्या मागण्या कमीत कमी किती पाहिजेत हे कॉंग्रेसलीगने ठरविले आहे. आम्हास स्वराज्यरूपी सबंध घर पाहिजे. हिंदुस्थानच्या बाहेरची व्यवस्था तुम्ही पहा लष्कर व आरमारची व्यवस्था तुम्ही पहा. पण देशाची व्यवस्था आम्ही करू. पैसा कसा खर्च करावा हे काम आमचेकडे ठेवा. बादशहाच्या छत्राखाली ही सर्व व्यवस्था आम्ही मागतो. आम्ही घर मागतो पण बुराक्रसी म्हणतो शौचकूप घ्या (हंशा) एकच खोली घ्या, सबंध घर मागू नका, पण या अर्धवट

मागण्यात अर्थ नाही. स्थानिक स्वराज्य देतो म्हणजे तुम्ही रस्ते झाडा, आरोग्य राखा, पैसा लागला तर वसूल करून घ्या, अशा व्यवस्थेने आमची भूक भागत नाही. आम्हाला कायदे कौन्सिलात बहुमत पाहिजे. स्वराज्य ही राष्ट्राची भूक आहे. ही भूक शांत होईल इतके अन्न घातले पाहिजे. लहान लहान घासांनी भागणार नाही. म्हणून एकदम हक्क दिले पाहिजे.

हल्ली चळवळ येथेच करुन भागणार नाही. आपले कोर्ट विलायतेत आहे. विलायतेतील लोकांनी निवडलेले प्रतिनिधी हे या गोष्टीचा निकाल करणार आहेत. हल्लीच्या परिस्थितीमुळे उपयोगाचा मोबदला म्हणून म्हणा अगर राज्यव्यवस्थेत व्यंग नजरेस पडले म्हणून म्हणा ते कारभार देण्यास तयार आहे. व या वेळी आपले प्रतिनिधी तिकडे पाठविणे जरुरीचे आहे. म्हणजे निदान बारा आणे तरी आपले पदरात पडतील. ही चळवळ विलायतेत पोहोचविली पाहिजे —

स्वराज्य मिळेपर्यंत स्वस्थ बसावयाचे नाही. होमरुलची संख्या जास्त वाढविली पाहिजे. स्वराज्याचे हक्क मिळाल्याशिवाय आम्हास नागरिक बनता यावयाचे नाही. परमेश्वराप्रमाणे स्वराज्याचा नित्यघोष लागला पाहिजे. सर्वांनी आपापल्यापरी मदत केली पाहिजे म्हणजे हल्लीच्या परिस्थितीत तुम्हाला हक्क न देणे इंग्रजांना कठिण जाईल. सन १८५८ सालच्या जाहिरनाम्यातील वचने उत्तम आहेत, ही वाक्ये कागदात उत्तम लिहिली आहेत. पण ती कागदातच राहिली आहेत.

स्वराज्याबद्दल लोकमत जागृत करणे हे स्वराज्य संघाचे काम आहे. काँग्रेसचे ठरावाची अंमलबजावणी करणे हे काम सर्वांचं आहे. जहालांचे आहे, मवाळांचे आहे, हिंदूंचे आहे, मुसलमानांचे आहे. जातीच्या कल्पना सोडून द्या. प्रतिनिधी म्हणतात स्वराज्य, पाहिजे तर जातीची वाट काय ? लॉर्ड सिडेनहॅमसारखे म्हणतात स्वराज्य जाती नाहीशा झाल्यावर देऊ. निरनिराळ्या जातीची काय व्यवस्था ही एक युक्ती आहे या युक्तीला फसू नका. स्वराज्य म्हणजे जातीचे प्रदर्शन आहे काय ? अधिकारीवर्गाच्या फुसलावणीने मग प्रत्यक्ष असो अगर अप्रत्यक्ष रीतीने म्हणा लोकांमध्ये हा बुद्धीभेद चालविला आहे. हा बुद्धीभेद श्रेयस्कर नाही. भेदामुळे नुकसान होईल. राज्यकारभारात जाती मत्सर नको. यापासून प्रतिपक्षाला मदत होईल. या बारीक कल्पना सोडून दिल्या पाहिजे. सर्व राष्ट्र एक आहे. सर्वांच्या हिताची गोष्ट आहे. खरा हक्क मेंबर होण्याचा नाही, मेंबर निवडण्याचा आहे. मत देण्याचा अधिकार इतका वाढेल की, प्रत्येक स्त्री-पुरुषास हक्क लागतील. जो कोणी राज्यकारभार चालविण्यास योग्य असेल, मग तो कोणत्याही जातीचा असो त्यासच निवडला पाहिजे.

तुम्ही उद्योग करा बाकीच्या गोष्टी परमेश्वराच्या स्वाधीन आहेत. तुमच्या पुढाऱ्यांना एकीचे बळ पाहिजे. स्वराज्यसंघास मदत करा, परमेश्वर तुम्हास सुबुद्धी देवो अशी प्रार्थना करून मी आपले भाषण संपवितो.

(टाळ्यांचा गजर)

आर्यावर्त, १५ - १२ - १९१७.

थोडेसे फ्लॅशबॅक : ४

## टाईम्सकाराचा खोडसाळपणा

मुंबईच्या टाईम्सकारांनी मानभावीपणा धारण करून काँग्रेसच्या पुढाऱ्यांमध्ये फाटाफूट करण्याचा नीच प्रयत्न आरंभिला आहे. ह्या आठवड्यात त्यांनी पांच स्फुट लेख लिहून काँग्रेसच्या नेमस्त व जालीम पक्षांची सरसकट नालस्ती केली आहे. इंग्लंडात बोलणारे मि. दादाभाई व ना. भी. गोखले निराळे व हिंदुस्थानात बोलणारे निराळे असा त्यांचेवर आक्षेप केला आहे. तसेच मि. सुरेंद्रनाथ बानर्जी यांचेवरही ते घसरले आहे. मि. पॉल व मि. टिळक यांचेवर त्यांनी बराच ताशेरा झाडला आहे. आता यंदा काँग्रेसचे सुकाणू ह्या जालीम पुढाऱ्यांचे हाती जाणार व काँग्रेस मोडेल व इंग्रजी राज्यकारस्थानासही मोठा धोका येईल असे लिहिण्याचा ह्या पत्रकाराचा झोक आहे. रा. टिळक, व मि. पॉल यांचे तावडीत काँग्रेस जाऊ नये म्हणून त्यांनी नेमस्त पक्षाची थोडी स्तुती करण्यास आरंभ केला आहे. नेमस्त पक्ष एखादे वेळी जरी रा. टिळकांचे पक्षाप्रमाणे वाहवतो. तरी एकंदरीत हा पक्ष उच्छृंखल नाही, त्याचेच धोरणाने काँग्रेसने चालावे असा मानभावी उपदेश त्यांनी केला आहे व यंदाचे काँग्रेसमध्ये मोठी धुमाकळी होईल असे भाकीत केले आहे. शिवाय त्यांचे म्हणणे हे पुढारी काँग्रेसमध्ये मात्र नेमस्त भाषण करितात व काँग्रेसचेबाहेर अगदी निराळे वर्तन करितात; करिता काँग्रेसमधील भाषणप्रमाणे नेमस्त आचरण पुढाऱ्यांनी ठेवावे. टाईम्सने मुंबईच्या काँग्रेसच्या वेळी नेमस्त अध्यक्ष सर हेनरी काटन यांची सुद्धा टवाळी केली. तेव्हा अशा लुंग्या पत्रकाराच्या उपदेशास आता फारशी किंमत नाही. टाईम्सचा उपदेश कोणास नको व तो कोणी पाळणार नाही. सर हेनरी काटन यांची काँग्रेसचे अध्यक्ष या नात्याने व्हाईसरायने नुसती मुलाखत घेऊ नये. इतकी काही काँग्रेस राजद्रोही अगर क्षुल्लक संस्था नाही. सरकारचे पाया पडून जर सरकार ऐकत नाही तर लोकांनी आता सरकारकडे याचना न करिता स्वावलंबनाचा कित्ता गिरवावा अशी दिशा लोकमतास लागणे हे स्वाभाविक आहे. यात लोकांची चूक नसून ती सरकारचीच आहे.

खानदेश वैभव, १६ - ११ - १९०६

थोडेसे फ्लॅशबॅक : ५

## खोडसाळ टाईम्सकार

मुंबईस ना. मि. सुरेंद्रनाथ बानर्जी यांचे स्वदेशीवर जोरदार भाषण झाले. ते टाईम्सकाराने साग्र न देता त्याबद्दल स्फुट लेखाखाली अेक खोडसाळ लेख लिहिला आहे. टाईम्सकार किती निंद्य व मुद्दाम गैरसमज करणारे लेख लिहितात हे मुंबई इलाख्यात सर्वांस पूर्णपणे ठाऊक आहे. ना. मि. सुरेंद्रनाथ यांनी मुंबईतील कापडाचे गिरणीवाले लोकांस थोडा दोष दिला की बंगालने स्वदेशी कापड पाळण्याचे व्रत करिताच त्याचा फायदा घेऊन दूर्गापूजेच्या वेळी मुंबईतील

कापडाचे गिरणीचे मालकांनी कापडाचे भाव कमी न करिता उलट ते वाढविले; मि. बानर्जी यांनी स्वदेशीचा फायदा घेऊन तुंबडी भरणाऱ्या कापडाचे गिरणीवाल्यास उपदेश केला. ही स्वदेशी चळवळ कायम ठेवणे तुमच्या हाती आहे. तुम्ही अशा ऐनवेळी फार नफ्याची हाव न धरिता कापडाच्या किंमती जरा कमी करा म्हणजे लँकेशायरच्या कापडास हिंदुस्थानांतून आयतीच गचांडी मिळेल. हे शेवटचे वाक्य अर्थात टाईम्सकारास फारच झोंबले; व त्यांनी ना. सुरेंद्रनाथ बानर्जींवर ताशेरा झाडला आहे की हा त्यांचा उपदेश मूर्खपणाचा आहे. आणि मुंबईच्या एका गिरणीचे मालकासही विषाद वाटून त्याने म्हटले आहे की, बंगाली लोक नुसते बोलके आहेत. मुंबईचे लोकांस व्यापारी तत्त्व पूर्णपणे ठाऊक आहे करिता ना. सुरेंद्रनाथ यांनी आम्हास उपदेश करण्याचे कारण नाही. ह्या आप्पलपोट्या गिरणीवाल्यास टाईम्सने पाठिंबा देऊन त्याने ना.सुरेंद्रनाथावर तोंडसुख घेणे स्वाभाविक आहे. परंतु आमचे मते ना.सुरेंद्रनाथ यांनी काढिलेले उद्‌गार अगदी रास्त आहे. हल्ली स्वदेशी कापडाचा खप जास्त होऊनही जर हे गिरणीवाले सारखे भाव वाढवीत आहेत. तर त्यास आळा घालणे हे प्रत्येक राष्ट्रभक्ताचे काम आहे.

खानदेश वैभव, ३० - ११ - १९०६

थोडेसे फ्लॅशबॅक : ६

## महात्माजींच्या स्वागतार्थ धुळ्याच्या व्यापारी मंडळीचा अनुकरणीय उत्साह कार्यास प्रारंभ

ता. १५ जानेवारी १९२७ रोजी शेट शालीग्राम रामचंद्र ह्यांच्या दिवाणखान्यात सभा भरली होती. ह्या सभेमध्ये :—

(१) महात्माजींना व्यापाऱ्यांतर्फे मानपत्र व

(२) थैली अर्पण करण्याविषयी एकमताने ठराव पास झाले त्या वेळी जागच्या जागी खालील आकडे पडले :—

२५१ श्री शालीग्राम रामचंद्र

२५१ श्री भवानजी कानजी

२५१ श्री गोविंदराम मोडुराम

२५१ श्री भोळाराम जोहारमल

इतर व्यापारी बंधूंकडून रक्कम जमविण्याकरिता खालील मंडळींची एक कमीटी नेमण्यात आली आहे. कमिटीच्या सभासदांची नावे :—

(१) रा.सा. गुलाबचंद हिरालाल (२) रा. सा. गोविंदजी खिमजी

(३) शेट लल्लुभाई माणकलाल (४) शेट काशीनाथ मुळचंद

(५) शेट सुरजमल गोविंदराम (६) शेट शालीग्राम रामचंद्र

(७) शेट रणजी भारमल दुकानचे वहिवाटदार — श्री जेठुभाई

(८) शेट चुनीलाल मगनलाल (९) शेट सुरजमल शंकरलाल

(१०) श्री. शिवनारायण हुंडीदलाल (११) शेट रामेश्वर जोहारमल

एकंदर व्यापारी मंडळींचा उत्साह व औदार्य पाहता (चार हजार) ४,००० रुपये सहज जमतील अशी उमेद आहे. ह्या रकमेचा विनियोग गोरगरिबांच्या उद्धाराकडे करण्यात येणार आहे. तरी जगद्वंद्य महात्मा गांधीच्या चरणी अर्पण करण्याकरिता जागोजागच्या मंडळींनी व इतर लोकांनी या पुण्यकार्याला सढळ हाताने मदत करावी, अशी विनंती आहे.

प्रबोध, २३ - १ - १९२७

थोडेसे फ्लॅशबॅक : ७

## महात्मा गांधी यांचा पश्चिम खानदेशातील कार्यक्रम

ता. १२ - १३ - १४ - १५ फेब्रु. १९२७

रविवार ता. १३ : धुळे तालुका व शहर येथील कार्यक्रम

| धुळे तालुका | धुळे शहरात प्रवेश |
|---|---|
| ६॥ ते ८ मालपूर कार्यक्रम | १०॥ वा. धुळे शहरात प्रवेश |
| ८ ते ९॥ दोंडाईचे ते सोनगीर | १०॥ ते ११ सकाळचे जेवण |
| ९॥ ते ९॥। सोनगीरला भेट | ११ ते २ निरामय वेळ |
| ९॥। ते १० सोनगीर ते नगांव | २ ते ५ धुळ्यास तीन कार्यक्रम |
| १० ते १०। नगांवला भेट | ५ ते ५॥ सायंकाळचे जेवण |
| १०। ते १०॥ नगांव ते धुळे | ५॥ ते ९॥ धुळ्यात बाकीचे कार्यक्रम |

प्रबोध रवि. १३ फेब्रु. १९२७

इहवृत्त : महात्माजीस अर्पण करण्याकरता धुळ्याच्या व्यापाऱ्यांनी चार हजारावर रकमेचे आकडे घातले आहेत स्तुत्य आहे.

१०-२-२७ रोजी म्युनिसिपालिटीची सभा होऊन एकमताने महात्माजीस मानपत्र देण्याचा ठराव झाला व त्यासाठी रु. २५० मंजूर झाले. आज दोन महिने सतत

आजारी असताही श्री. बहाळकर यांनी सदर सभेस हजर राहून आपली भक्ती व्यक्त केली हे त्यास भूषणावह होय.

खानदेशवृत्त :— खादी प्रचार, अस्पृश्यता निवारण व व्यसनाचा त्याग यावर महात्माजींचे भुसावळेस हृदयस्पर्शी भाषण झाले. त्यांना भुसावळकरांनी (एक हजार एकशे एक्कावन) ११५१ रु.ची थैली अर्पण केली.

ताजी खबर :— शिंदखेडे मुक्कामी महात्माजीस पांचशे रुपयांची थैली अर्पण करण्यात आली व ते चिमठाण्यास रवाना झाले.

प्रबोध, ६ - २ - १९२७

थोडेसे फ्लॅशबॅक : ८

## खानदेश वृत्त

निजामपूर ग्रामपंचायतची तारीख २९-१-२७ ची स्पेशल मिटिंग झाली. यात महात्मा गांधी यांना मानपत्र व खर्चाप्रीत्यर्थ रुपये वीस (२०) असा ठराव श्री. उत्तमदास हरजीवनदास यांनी मांडला व या ठरावास दुजोरा वे.शा.सं. श्री. माणक श्री दवे व श्रीयुत मोतिराम शामजी पाटील यांनी देऊन ठराव सर्वांनुमते पास झाला.

शहादे म्युनिसिपालिटीने महात्माजीस मानपत्र देण्याचा ठराव सतरापैकी १४ जणांच्या बहुमताने पसंत केला. दोन सरकारी अधिकारी व एक मुसलमान सभासद असे बाकी तीन तटस्थ राहिले.

पश्चिम खानदेशात महात्मा :

महात्माजींच्या दौऱ्याचा कार्यक्रम प्रसिद्ध झाल्यावर मोराण्याचे रा. उत्तमराव यांनी स्वागत मंडळाची भेट घेऊन नेराहून कुसुंब्यास जाताना वाटेतील मोराण्यास महात्माजींनी भेट द्यावी अशी आग्रहाची विनंती केली. कुसुंब्याहून खेड अवघे दोन मैल असून प्रवासाला पंधरा मिनिटे धरली आहेत, ती जास्त आहेत. त्यातून काही मिनिटे काढून मोराण्यास पांच मिनिटे महात्माजींची भेट करविण्याचे स्वागत मंडळाने कबूल केले.

ता. १२-२-२७ रोजी अमळनेरकर महात्माजीस एक हजारांची थैली अर्पण करणार आहेत. इतर तालुक्याच्या गावांनी ह्यांचे अनुकरण करावे. श्री. भरुचा व श्री. बाळुभाई मेहता ह्यांनी तेथे प. खानदेशातील पाचशे रुपयांची खादी खपविली.

निजामपूरला महात्माजींनी भेट दिली त्या वेळी तेथे ५० रु.ची खादी खपली. गावच्या हिंदुमुसलमानांच्यावती शेट गुलाबदास बुलाखीदास ह्यांनी रु. १०१ ची थैली अर्पण केली. वैद्य माणकभाई दवे ह्यांनी मानपत्र वाचले, ग्रामपंचायतीची थैली सरपंच ठाकोरदास भाई ह्यांनी दिली, व मानपत्र दत्तात्रय बळवंत कुलकर्णी ह्यांनी वाचले.

प्रबोध, ६-२-१९२७.

## मंडळ वृत्तान्त-

# खानदेश इतिहास सेमिनार

'खानदेशाचा इतिहास' हा दुर्लक्षित व उपेक्षित असून या विषयावर आतापावेतो संशोधनही अभावानेच झाले आहे. राजवाडे संशोधन मंडळाने 'खानदेशाच्या इतिहासाच्या' संदर्भात साधने व कागदपत्रे जमा करण्याचा संकल्प केला आहे. त्याचप्रमाणे खानदेशच्या इतिहास संशोधनाला चालना मिळावी म्हणून विविध उपक्रम हाती घेण्याचे मंडळाने ठरविले आहे. थाळनेर येथील उत्खनन-प्रकल्प हा त्यापैकी एक उपक्रम असून पुरातत्त्व विभागाच्या सहकार्याने हा प्रकल्प मंडळाने हाती घेतला आहे. दुसरा, उपक्रम म्हणजे 'खानदेश इतिहास सेमिनार' हा होय.

१४ एप्रिल १९८५ रोजी राजवाडे वस्तुसंग्रहालयाच्या दालनात खानदेश इतिहास सेमिनार संपन्न झाला. सेमिनारचे उद्घाटन साप्ताहिक दौंडाईचे लोकमानसचे संपादक व धुळे जिल्हा इंदिरा कॉंग्रेसचे अध्यक्ष डॉ. हेमंत देशमुख यांच्या हस्ते झाले. 'प्राचीन व मध्ययुगीन खानदेश' या विभागाचे अध्यक्षस्थान पुरातत्त्व विभागाचे संचालक डॉ. अ. प्र. जामखेडकर यांनी भूषविले तर 'अर्वाचीन खानदेश' या विभागाचे अध्यक्षस्थान पुणे विद्यापीठाच्या इतिहास विभागाचे प्रपाठक डॉ. अरविंद देशपांडे यांनी भूषविले. सेमिनारच्या समारोपप्रसंगी आमदार माननीय श्री. पी. के. अण्णासाहेब पाटील हे उपस्थित राहणार होते. तथापि प्रकृती ठीक नसल्यामुळे खूप इच्छा असूनही त्यांना उपस्थित राहता आले नाही. सेमिनारमध्ये दोन्ही विभागांत एकंदर तेरा निबंध अभ्यासकांनी सादर केले.

## प्राचीन व मध्ययुगीन विभाग

(१) मेथी येथील मंदिरे- *श्री. शं. पु. साठे*

(२) Contribution of Khandesh to Mughal Trade- *Dr. T. T. Mahajan*

(३) अकबर आणि फारुकी राजे- *प्रा. जी. एम. पाटील*

(४) मार्टिनचा खानदेशात संचार- *प्रा. कु. सुनंदा अहिरे*
(५) खानदेशात विल्यम नॉरीस- *सौ. विजया देशपांडे*
(६) गुर्जर जमातीचा शोध- *डॉ. मु.ब. शहा*
(७) खानदेशाच्या इतिहासाची साधने- *डॉ. प्र.न. देशपांडे*
(8) Early Settlements in Khandesh- *Prof. S.R. Chaudhari*

## अर्वाचिन खानदेश

(१) १८५७ चा खानदेश- *डॉ. श्याम कायंदे*
(२) खानदेशातील अज्ञात संतकवी-तोताराम महाराज- *डॉ. विश्वास पाटील*
(३) पेशवेकालीन खानदेशमधील शेतीचा पाणीपुरवठा- *डॉ. जी.बी. शहा*
*(४) धुळे शहरातील १९३० चा स्वातंत्र्यसंग्राम-सौ. त्रिशला शहा*
(५) खानदेशातील वनवासी- *डॉ. कृ.के. कडवे*

या सेमिनारमध्ये सौ. विद्या गाडगीळ, डॉ. घोडके, प्रा. हातेकर इत्यादी अभ्यासकही आपापले निबंध सादर करणार होते. परंतु त्यांचे निबंध वेळेवर येऊ शकले नाहीत.

सर्व निबंधांवरील चर्चा अतिशय रंगली. चर्चेमध्ये श्री. शंकरराव गोरख पाटील, श्री. जोशी, पत्रकार श्री. म. वि. कुलकर्णी, इत्यादींनी भाग घेतला. सेमिनार यशस्वी होण्यासाठी मंडळाचे कार्याध्यक्ष श्री. बाळासाहेब मुंदडे, कार्योपाध्यक्ष श्री. रावसाहेब ओगले, चिटणीस डॉ. प्र.न. देशपांडे, डॉ. मु.ब. शहा, डॉ. व्ही. जी. पुराणिक आणि श्री. अतुलभाई जोशी यांनी परिश्रम घेतले. मंडळाचे कर्मचारी श्री. देवगुरुजी, श्री. शिंपी, श्री. जगदीश पळशीकर आणि सेवक श्री. कार्ले व श्री. भागवत यांचे परिश्रमामुळे सेमिनारची व्यवस्था अतिशय समाधानकारक झाली.

या सेमिनारला भारतीय इतिहास अनुसंधान परिषदेकडून २००० रु. चे अनुदान प्राप्त झाले.

सेमिनारमध्ये सादर करण्यात आलेल्या शोधनिबंधांपैकी निवडक शोधनिबंध 'संशोधक' त्रैमासिकांतून यथावकाश प्रसिद्ध होणार आहेत. सेमिनारचे अध्यक्ष डॉ. अ.प्र. जामखेडकर आणि डॉ. अरविंद देशपांडे यांची अध्यक्षीय भाषणेही निबंधांबरोबर प्रकाशित करण्याचे योजिले आहे.

•

# खानदेश इतिहास सेमिनार

## डॉ. अरविंद देशपांडे यांचे अध्यक्षीय भाषण

सर्वसाधारणपणे असे मानण्याचा प्रघात आहे की, इतिहासाच्या प्राचीन, मध्ययुगीन आणि अर्वाचीन अशा कालखंडाच्या विभागणीमागे इतिहासकारांच्या सोयीचे समीकरण असते. अभ्यासाच्या सोयीसाठी असे कालखंड पाडले जातात, हा समज जरी पूर्णपणे चुकीचा नसला तरी असे म्हणता येईल की, अभ्यासाची सोय हा या कालविभाजनाचा परिणाम आहे, कारण नाही. वर्गीकरण करीत असताना सर्व कालखंडांचा निदान धावता परिचय असणे आवश्यक आहे. कालविभाजनाची पध्दत सकृद्दर्शनी कालसापेक्ष वाटत असली तरी या प्रक्रियेमागे कालापेक्षा जास्त महत्त्वाची कारणे संभवतात. एखाद्या कालखंडाला प्राचीन, मध्ययुगीन किंवा अर्वाचीन म्हणण्यामागे त्याच्या कालक्रमापेक्षा त्याकाळातील विचारप्रवाह, जीवनपध्दती, समाजजीवन, आर्थिकजीवन इत्यादी घटकांचा विचार अभिप्रेत असतो. मानवी जीवन गतिप्रधान असते व त्या गतीमध्ये स्थितीबदलही अपेक्षित असतो. स्थितीबदलाच्या प्रक्रियेलाच इतिहास म्हणतात. ज्या गोष्टीच्या स्थितीत बदल होत नाही तिला इतिहास नसतो. तिला कदाचित केवळ काळ असेल. बदल ही इतिहासाची प्रेरणा आहे किंबहुना इतिहासाचे उद्दिष्ट, हे बदल, ही स्थित्यंतरे स्पष्ट करून सांगणे हेच असते. सर्वसामान्य समाजजीवनातील बदल क्रांतीस्वरूप नसतात. ते घडण्याची प्रक्रिया एका सूक्ष्म आणि तरल पातळीवर घडत असते. आपण बदलत आहोत हे या समाजजावनातील घटकांना प्रत्येक क्षणी जाणवत असते असे म्हणणे धाडसाचे आहे. बदल घडत असताना तो न जाणवणे हा समाजजीवनाचा एक विशेष मानावा लागेल. घडणारा सूक्ष्म बदल आणि सातत्य हे मानवी जीवनाचे दोन प्रभावी घटक आहेत. इतिहासाची ती दोन परिमाणे आहेत. इतिहासाच्या प्रागतिक संवादी स्वरूपाचे बदल व सातत्य हे दोन ध्रुव आहेत. गती हे त्यांचे समन्वयीकरण आहे. इतिहासाच्या स्वरूपाला एक गतिमान रूप आपल्या मनात प्राप्त होते त्यामागे ही सातत्य-बदल यांच्यातील संवादात्मक प्रक्रिया कारणीभूत असते. थोड्या धाडसाने असेही म्हणता येईल की ज्याला इतिहास स्थिर दिसतो त्याला इतिहास जाणवत नाही.

हे खरे असले तरीही समाजजीवनातील बदल दृश्य स्वरूपात दिसण्यास थोडा कालावधी लागतो. तात्त्विक दृष्ट्या विसंगतीचा दोष स्वीकारूनही इतिहासाचा विद्यार्थी असेच म्हणेल की, बदलाची प्रक्रिया ही नित्य असली तरी दैनंदीन नाही. बदलाचे सामाजिक परिणाम समाजजीवनात स्थिर होण्यासाठी, स्पष्टपणे दिसण्यासाठी काही काळ तरी बदल स्थिर व्हावा लागतो. समाजजीवनाच्या अंतरंगात बदल घडून येत असताना समाजजीवन शांत व स्थिर दिसते ते या विरोधामुळेच. या स्थैर्याला स्वतःचे असे एक व्यक्तित्व असते. प्राचीन, मध्ययुगीन किंवा अर्वाचीन या संज्ञा आपण त्या व्यक्तित्वाच्या संदर्भात वापरतो. हे व्यक्तित्व एकसुरी, एकपदरी नसते. समाजजीवनाची विविध अंगे त्यात अनुस्यूत असतात. या विविध अंगांना जोडणारी मानसिक, सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक व तदनुषंगाने राजकीय अशी जी जाण असते ती जाण म्हणजे त्या समाजाचा कालविशेष किंवा व्यवच्छेदक लक्षण असे म्हणता येईल. कालनिर्देशक संज्ञा या व्यवच्छेदक लक्षणांना उद्देशून वापरल्या जातात. हे एकदा लक्षात घेतले म्हणजे विसाव्या शतकातही सरंजामशाही वृत्ती दिसण्यातील विरोधाभास सहज दूर होऊ शकतो.

इतिहासाच्या वाटचालीतील एकही काळ असा नव्हता की, ज्या वेळेस तत्कालीन लोक आधुनिक नव्हते. तरीही १६ व्या शतकातही महाराष्ट्राला आधुनिक महाराष्ट्र समजण्यास आज आपण तयार नसतो. हा विरोध केवळ कालसापेक्ष आहे असे म्हणणेही धाडसाचे होईल. १८५१ मध्ये मृत्यू पावलेल्या दुसऱ्या बाजीरावाला आम्ही आधुनिक म्हणत नाही. परंतु १८३२ मध्ये 'दर्पण' सुरू करणाऱ्या बाळशास्त्री जांभेकरांना आम्ही आधुनिक मानतो मग प्रश्न पडतो तो असा की, आधुनिकता म्हणजे काय? विशिष्ट प्रेरणा, उत्पादनपद्धती, वितरणव्यवस्था, सामाजिक बदल म्हणजे आधुनिकता असे मानावयाचे काय? तसे असेल तर अन्य प्रकारच्या प्रेरणा, आर्थिक च सामाजिक व्यवस्था इतिहासाच्या प्रत्येक कालखंडात आपणास दिसून येतात. त्यांच्यातील वैशिष्ट्यपूर्ण बदल म्हणजे आधुनिकता असे म्हणता येईल का? हे मान्य केले तर आधुनिकता ही एक बाह्य गोष्ट ठरते. एका विशिष्ट प्रकारे समाजजीवन नियंत्रित किंवा अनियंत्रित झाले म्हणजे ते आधुनिक झाले. परंतु हे असे नसते याची अनेक उदाहरणे सापडतात. आधुनिकता ही समाजाची वृत्ती आहे. बदल आपोआप घडून येण्यापेक्षा ते घडवून आणणे, त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्याचा सतत प्रयत्न करणे, बदलाच्या प्रक्रियेला जाणीवपूर्वक हातभार लावणे, ते बदल सातत्याच्या प्रवाहात उघड्या डोळ्यांनी सामावून घेणे, प्रसंगी सातत्यही बदलण्याची तयारी ठेवणे व या सर्व सव्यापसव्याविषयी जागरुक असणे असे काहीसे या वृत्तीचे स्वरूप सांगता येईल. या जाणिवेमागे काही मूलभूत तात्त्विक निकष आहेत. समाज-व्यक्तिसंबंध, व्यक्तिराज्यसंबंध, व्यक्ती-व्यक्तिसंबंध अशा अनेक संबंधांविषयीचे स्पष्ट संकेत आहेत. या संकेताशी या निकषातून तयार झालेले समाजाचे व्यक्तिमत्त्व म्हणजे आधुनिकता अशी कामचलाऊ व्याख्या करता येईल.

आधुनिकतेची ही व्याख्या स्थैर्याचा आभास निर्माण करीत असली तरी तो फसवा आहे. आधुनिकता हा काही साक्षात्कार नाही. ही एक ऐतिहासिक प्रक्रिया आहे. आधुनिकतेची जाणीव घटनांमधून निर्माण होते. भारताच्या संदर्भात तर ती संघर्षात्मक संवादातून निर्माण झालेली आहे. पाश्चात्त्य जीवनपद्धती व भारतीय जीवनपद्धती यांच्या संघर्षातून भारतीय आधुनिकता निर्माण झाली. त्यामुळे तिचे स्वरूप निव्वळ अनुकरणात्मक न राहता समन्वयात्मक झाले आहे. हे संघर्ष ज्याप्रमाणे वैचारिक पातळीवर घडत होते त्याप्रमाणे अत्यंत ऐहिक पातळीवरही घडत होते. या संघर्षातून आपल्या वेगळेपणाची, आपल्या सांस्कृतिक अस्तित्वाची ओळख समाजाला घडत होती त्याचबरोबर दुर्बलतेचीही प्रचीती येत होती. ही दुर्बलता नष्ट करण्याचे वैयक्तिक आणि सामाजिक पातळीवर जे प्रयत्न झाले ते प्रयत्न आणि त्यामागची स्थितीबदलाची जाणीव यामुळे भारतीय आधुनिकता साकार झाली. या संघर्षाचा, या जाणिवांचा इतिहास म्हणजे आधुनिक भारताचा इतिहास.

या व्यापक संदर्भात आपल्याला खानदेशच्या इतिहासाचा विचार करावा लागेल. १८ व्या शतकांतील खानदेश हा खालावलेली मुघल बादशाही आणि विजिगीषु मराठेशाही यांच्यामधील दुवा होता. भौगोलिकदृष्ट्यासुद्धा खानदेश हा या दोन सत्तांना जोडणारा प्रदेश होता. सांस्कृतिकदृष्ट्या तो तीन संस्कृतींचा संगम होता. पश्चिमेकडे गुजरात, उत्तरेकडे माळवा आणि दक्षिणेकडे महाराष्ट्र हे तीन खानदेशाचे केवळ भौगोलिक नव्हेत, तर सांस्कृतिक संदर्भ होते. खानदेशच्या इतिहासावर या संस्कृतीचा स्पष्ट प्रभाव दिसतो.

इंग्रज-मराठे यांच्यातील तिसरे युद्ध १८१७ च्या नोव्हेंबरात पुण्याला सुरू झाले. ३ जून, १८१८ रोजी पेशवा दुसरा बाजीराव धुळकोट येथे मालकमला शरण गेला. व पेशवे-इंग्रज युद्ध संपुष्टात आले. परंतु खान्देशात मात्र हे युद्ध चालूच राहिले १८१८ ते १८५८ या चाळीस वर्षांच्या कालावधीत असे एकही वर्ष नाही की ज्या वेळी खान्देश पूर्णपणे शांत होता. इंग्रजांची प्रख्यात 'साम्राज्यशाही शांतता' खानदेशात मात्र अभावानेच दिसते. काही आधुनिक इतिहासकारांनी या अशांततेला राष्ट्रीय उद्रेकाचे स्वरूप मानले आहे. इंग्रजांविरुद्ध केलेला कोणताही उठाव हा केवळ इंग्रजांविरुद्ध असणे या एकाच कारणामुळे राष्ट्रीय ठरत असेल तर ते समीकरण बरोबर होईल. या उठावाचे उत्तरदायित्व खानदेशातील भिल्लांकडे जाते. महाराष्ट्रातील इतर जनतेने इंग्रजी सत्ता मान्य केली तरी भिल्लांनी मान्य केली नव्हती. राष्ट्रीयत्वाची वर उल्लेखलेली ऋणात्मक कल्पना ग्राह्य मानण्याचे कारण नाही. हे उठाव राष्ट्रीय होते की नाही हा वादाचा मुद्दा होऊ शकतो. परंतु त्यांची वास्तवता नाकारता येत नाही. या उठावाचा विचार शास्त्रीय दृष्टीने झालेला दिसत नाही. या उठावातील काही मूलभूत वास्तवता काही ना काही कारणांनी नागर संस्कृतीने सतत नाकारली आहे, हे मान्यच केले पाहिजे. भारतीय समाजव्यवस्थेत आदिवासींना एक अनन्यसाधारण स्थान आहे. त्या स्थानाची वास्तवता भारतीय संस्कृतीचा वारसा सांगण्याऱ्यांनी मान्य केलेली नाही ही दुर्दैवाची गोष्ट आहे.

आमच्या इतिहासकारांना आदिवासी लोकांचा इतिहास लिहिण्याची इच्छा होत नाही. याचे एक कारण म्हणजे आदिवासी समाजाला आम्ही आमच्यापेक्षा वेगळे, थोडेफार मागासलेले व भिन्न संस्कृतीचे समजतो. परंतु जर त्यांची संस्कृती भिन्न असेल तर या विविधतेने नटलेल्या भारतीय संस्कृतीच्या संदर्भात त्यांच्याविषयीच्या अभ्यासाची जास्तच गरज आहे. भिल्लांच्या उठावातील सामाजिक संघर्ष हे दुसरे असेच वास्तव. या उठावांना इंग्रज विरुद्ध भारतीय असे स्वरूप दिले की सामाजिक वास्तवाकडे डोळेझाक करता येते. परंतु नेमके हे वास्तव काय होते याचा जास्त जाणीवपूर्वक आणि सहानुभूतीपूर्वक विचार करणे अगत्याचे आहे.

डॉ. एस. बी. चौधरींनी आपल्या या ग्रंथात भिल्लांच्या उठावांना जवळजवळ राजकीय स्वरूप देऊन त्यांचे सामान्यीकरण करून टाकले आहे. या उठावाचे वेगळेपण त्यामुळे नष्ट झाले आहे. त्याचा एक मोठा फायदा म्हणजे या उठावामागे इतर भारतीय समाजाची जी काही जबाबदारी होती तिचा उहापोह किंवा विचार करण्याची जबाबदारी ओघानेच नाहीशी होते. परंतु वैचारिकदृष्ट्या अथवा नैतिकदृष्ट्या हे धोरण कचखाऊ किंवा कातडीबचाऊपणाचे आहे. भिल्लांच्या असंतोषाला इंग्रज जेवढे जबाबदार होते तितकेच भारतीयही जबाबदार होते हे वास्तव टाळता येत नाही.

भिल्लांचे मूळ काय, ते कोणत्या वंशाचे, शास्त्रीयदृष्ट्या त्यांना नेमके कोणत्या वर्गात घालता येईल हे व यासारखे प्रश्न आजही अनुत्तरित आहेत. प्रा. टी. ए. नाइकांनी आपल्या ग्रंथात या प्रश्नांचा उहापोह करण्यासाठी बरीच जागा खर्ची घातली आहे. एक संशोधनाचा विषय आणि पद्धती म्हणून या विवेचनाचे महत्त्व कोणीच नाकारणार नाही. परंतु या विश्लेषणाने भिल्लांचे ऐतिहासिक वास्तव बदलत नाही. पारंपरिक समाजव्यवस्थेत भिल्लांचे स्थान निकृष्ट होते हे सत्य आहे. भिल्लांचे वर्णन पंचम म्हणजे चातुर्वण्य व्यवस्थेच्याही पलीकडे असे केलेले आपणास आढळते. १९ व्या शतकात सुरुवातीला भिल्लांचे स्थान पंचम असले तरीही समाजव्यवस्थेत ते स्थिर होते असा सबळ सामाजिक आणि आर्थिक पुरावा उपलब्ध आहे. खानदेशातील बलुतेदारपद्धतीत भिल्ल हा एक महत्त्वाचा बलुतेदार होता. त्याला 'जागल्या' म्हणत. चोराचिलटांपासून गावाचे रक्षण करण्याची जबाबदारी भिल्लाकडे होती. या कामाबद्दल भिल्लांना जमिनीचे वतनही होते. या वतनाला अनेक ठिकाणी 'सलामी वतन'' असे म्हटलेले आढळते.

सलाम म्हणजे संरक्षण. सुरक्षितता. १८१८ मध्ये खानदेशात या वतनापोटी भिल्लांकडे जवळजवळ ३२ हजार बिघे जमीन होती, असे खानदेशाचा कलेक्टर म्हणतो तर याउलट १८३५ मध्ये भिल्लांकडे ८ हजार बिघे जमीन असल्याचा उल्लेख ग्रॅहमच्या अहवालात मिळतो. म्हणजे केवळ १७ वर्षांच्या कालावधीत भिल्लांची जवळजवळ ३/४ जमीन नाहीशी होते. या सगळ्याचा परिणाम भिल्लांचे उठाव होण्यात झाला नसता तरच आश्चर्य. १८१८ ते १८८५ या काळात भिल्लांच्या उठावाने इंग्रज सरकार हैराण झाले होते. याच्या हताशपणाचे उत्कृष्ट चित्रण

तत्कालीन कागदपत्रांत सापडते. अनेक भिल्लांना पकडण्यात आले. त्यांच्या पुढाऱ्यांना शिक्षा झाल्या. काही हद्दपार झाले तर चिल नायकासारख्या भिल्लांना ठार मारण्यात आले. त्यांच्या वस्त्या उद्ध्वस्त करण्यात आल्या, त्यांच्या बायकामुलांना बेघर करण्यात आले. दहशत निर्माण करणे हे साम्राज्यवादाचे एक तंत्रच असते. ह्या तंत्राचा पुरेपूर वापर इंग्रजांनी केला. या सगळ्या उलाढालीचा व उद्रेकाचा अन्वयार्थ कसा लावावयाचा, इतिहासात सामान्यतः त्याची नोंद पुंडाई करावयाची की त्याला राष्ट्रीय उठाव म्हणून हौतात्म्य द्यावयाचे ? तत्कालीन सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक परिस्थितीच्या संदर्भात याचा शोध घेणे विवेकाचे ठरेल.

महाराष्ट्रातील इंग्रजी सत्तेची स्थापना ही घटना म्हणजे महाराष्ट्राच्या, किंबहुना संपूर्ण भारताच्या इतिहासातील एक अनन्यसाधारण अनुभव होता. यापूर्वी भारतावर परकीयांचे आक्रमण झाले नाही असे नाही. परंतु त्याचा परिणाम येथील परिस्थिती आमूलाग्र बदलण्यात झाला नाही. आक्रमकांचे आक्रमक व्यक्तित्व बदलून त्यांनी येथील समाज, संस्कृती व वैशिष्ट्यपूर्ण अर्थ-समाज व्यवस्था यात स्वतःला सामावून टाकले. अनेक अर्थानी ते खरेखुरे भारतीय झाले. त्यांचा धार्मिक अभिनिवेशही येथील एखाद्या धर्मपंथाप्रमाणे बनला. याउलट इंग्रज भारतात आले तेच मुळी भारताचे स्वतःच्या फायद्यासाठी आर्थिक शोषण करण्यासाठी. कोणतेही नवे उपक्रम हाती न घेण्याची एलफिन्स्टनची घोषणा पोकळ होती. "आम्ही भारतीयांच्या सांस्कृतिक आणि सामाजिक जीवनात हस्तक्षेप करणार नाही" हा दावा मनःपूर्वक असला तरी अव्यवहार्य होता. प्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ सोरोकिन याने म्हटल्याप्रमाणे कोणताही सामाजिक बदल अपरिहार्य असतो. इंग्रजांनी केलेल्या आर्थिक शोषणाचे परिणाम येथील समाजजीवनावर होणे अपरिहार्य होते.

१९ व्या शतकातील भारत संपूर्णपणे कृषिप्रधान देश होता. समाजरचना कृषिउत्पादनावर अधिष्ठित होती. समाजातील वेगवेगळ्या संस्था व व्यक्ती यांचे परस्परसंबंध कृषिप्रधान अर्थव्यवस्थेने ठरलेले होते. औद्योगिकतेच्या अभावी भारताचे आर्थिक शोषण म्हणजे कृषिअर्थव्यवस्थेत बदल हे समीकरण तर्कशुद्ध होते. तदनुषंगाने समाजव्यवस्थेत बदल होणे सयुक्तिकच होते. या समाजव्यवस्थेत भिल्लांसारख्या आदिवासी समाजाचे नेमके स्थान काय होते ? पारंपरिक समाजव्यवस्थेत त्यांना रखवालदारीचे बलुते होते. ब्रिग्जने एलफिन्स्टनला कळविल्याप्रमाणे संपूर्ण खानदेशात पोलिसखात्याचे कार्य भिल्लांच्या हाती होते.

डोंगरी भिल्ल व पठारी भिल्ल असे भिल्लांचे दोन वर्ग केले जातात. परंतु ही वर्गवारी वरवरची आहे. आपल्या २४ ऑक्टो. १८१८ च्या पत्रात ब्रिग्ज लिहितो की डोंगरी भिल्ल आणि पठारी भिल्ल संपूर्णपणे एकमेकांसारखे आहेत. परिस्थितीनुरुप ते डोंगरी किंवा पठारी राहातात. परिस्थिती एकतर युद्धजन्य किंवा दुष्काळी असे. यापैकी कोणत्याही प्रसंगी भिल्ल गावे सोडून डोंगराच्या आश्रयाला जात. गावातील त्यांच्या जमिनी साधारणपणे गावाच्या सीमेलगतच असत. युद्धाची पहिली झळ त्यांनाच पोहोचत असे. भिल्लांच्या जमिनी फारशा उत्कृष्ट असत असेही नाही, असा

खान्देशचा कलेक्टर कर्नल रॉबर्टसन याचा दावा आहे. त्यामुळे युद्धजन्य काळात त्यांच्याकडे काही राखीव अन्नधान्य नसे. खानदेश जमावातील कागदपत्रांनुसार इंग्रजी अमदानीच्या पूर्वीसुद्धा भिल्लांचे दंगे होत असत. परंतु त्यांच्या स्वरूपाविषयी लिहिताना एक तत्कालीन पत्रलेखक लिहितो की "भिल्ल भुकेमुळे दंगा करतात." दंगा करणे ही त्यांची सहजप्रवृत्ती नसून तो परिस्थितीचा परिणाम होता.

१९ व्या शतकाच्या पहिल्या दशकात खानदेशवर, विशेषतः उत्तर खानदेशावर अनेक अरिष्टे कोसळली. संतप्त यशवंतराव होळकरांची पुणे स्वारी खान्देशातूनच गेली. त्याच्या पाठोपाठ पेंढाऱ्यांची गदा आली. याचा परिणाम संपूर्ण खानदेशच्या आर्थिक जीवनावर झाला. १८१० मध्ये सुलतानपूर परगण्यातील २८० खेड्यांपैकी फक्त ३७ खेडी नेहमीप्रमाणे गुजराण व उत्पादन करीत होती. ११ खेडी पूर्णपणे उद्ध्वस्त झाली होती. २१ खेडी लुटारूंच्या ताब्यात होती. इतर खेडी मोडकळीस आली होती. (पहा. मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड २३, लेखांक ३५), या परिस्थितीचा आर्थिक परिणाम तर्कशुद्ध होता. ज्या काळात शासनाची आर्थिक गरज मोठ्या प्रमाणात वाढली होती त्या काळात शासनाचे महसुली उत्पन्न कमी झाले. दुसऱ्या बाजीरावाने महसूल गोळा करण्यासाठी मक्ते देण्यास सुरुवात केली. या मक्तेदारांना जास्तीत जास्त उत्पन्न मिळविणे हेच एकमेव ध्येय असल्याने परंपरा ही त्यांच्या मार्गातील एक अडचण होती. भिल्लांच्या पारंपरिक हक्कांची त्यांनी पायमल्ली केली असल्यास नवल नाही. सिमकॉक्सने म्हटल्याप्रमाणे ज्या वेळेस पोलिसदलाची नितान्त आवश्यकता होती त्या वेळेसच पोलिसांना काही खायला नव्हते. स्वाभाविकच भिल्लांचे शेतीतील लक्ष उडाले. जेव्हा खानदेशच्या कलेक्टरने देवीसिंग नायकाला पुन्हा गावात येऊन स्थायिक होण्यास सांगितले तेव्हा देवीसिंग उत्तरला, "आणि खावे काय? गवत आणि काड्या?"

१८१८ च्या सुमारास भिल्लांची समस्या एका दुष्टचक्रात अडकलेली दिसते. सरकारदप्तरी १८१८ त एकूण ४०३२ खेडी होती, पैकी १२४३ खेडी पूर्णपणे नष्ट झालेली होती. ९७ खेडी तर नकाशावरून नाहीशीच झाली होती. नष्ट झालेल्या या खेड्यात प्रत्येकी किमान एक भिल्ल कुटुंब होते असे मानले तर सुमारे १२५० कुटुंबांचा आर्थिक आधार नष्ट झाला. खेड्यातील इतर समाज - घटकांप्रमाणे भिल्लांना स्थलांतर करणे सोपे नव्हते. त्या खेड्यांना त्यांचे "जागले" होतेच, जादा भिल्ल कुटुंबाचा खेड्याला आर्थिक भारच होणार होता. सामाजिकदृष्ट्या भिल्ल हा 'इतरेजन' होता. त्याची कृषिक्षमता मर्यादित आहे अशी हाकाटी तत्कालीन मराठी मामलेदारांनी केली त्यामागचे रहस्य हेच असावे. काहीही असले तरी कामगार क्षेत्रात भिल्लांना फार मोठ्या स्पर्धेला तोंड द्यावे लागत होते असे चित्र दिसते. भिल्ल हा मुळातच 'मर्यादित शेतकरी' होता. त्याचे उपजीविकेचे दुसरे साधन जंगल हे होते. अर्थातच ह्या परिस्थितीत तो जंगलाकडे वळणे स्वाभाविक होते.

कृषिउत्पादनावर आधारित महसूली उत्पन्न वाढविणे इंग्रजी महसूल विषयक धोरणाचे महत्त्वाचे उद्दिष्ट होते. त्यानुसार जमिनीची फेरमोजणी करणे, वसुलीचे नवे

नियम करणे इत्यादी गोष्टीवर त्यांनी भर दिला. जास्तीत जास्त जमीन लागवडीखाली आणणे या धोरणामागे शेतकऱ्यांचे भले करणे ह्यापेक्षा शासनाचे उत्पन्न वाढविणे हेच महत्त्वाचे उद्दिष्ट होते. नव्या जमिनी इस्तव्याने दिल्या गेल्या त्या कोणाला भिल्लांना नाहीत तर भिल्लेतर कृषिसमाजाला, ह्यात भिल्लांच्याही जमिनी होत्या. त्याच वेळी वसूल पैशात गोळा करण्याचे आदेश निघाले. अर्थव्यवस्थेचे हे चलनीकरण तदनुषंगाने येणाऱ्या चलनाच्या सुधारणेशिवायच करण्यात आले. त्यामुळे बाजारातील चलनाची चणचण वाढली. वसुलीची रक्कम भरण्यासाठी आवश्यक तो पैसा गाठी नसल्याने बहुतांश शेतकरीसमाज हळूहळू कर्जबाजारी होऊ लागला. सावकारीचे प्रमाण वाढले. सर्वसामान्य शेतकऱ्यांची अवस्था कठीण झाली, तर भिल्लांसारख्या कुंपणावरच्या वर्गाची परिस्थिती जास्तच अनुकंपनीय झाली. नव्या वसुली धोरणामुळे भारतीय समाजातील दोन वर्ग स्पष्टपणे निर्माण होऊन त्याचे एकसंधपण लयाला गेले.

अशा रीतीने भिल्लांचा प्रश्न वर्गीय प्रश्न झाला. नव्या शेतमालकवर्गाला भिल्ल बांडगूळ वाटू लागले. १८१९ च्या आपल्या पत्रात ब्रिग्ज लिहितो : "ग्रामस्थांची भिल्लांविषयीची द्वेषभावना इतक्या पराकोटीला गेली आहे की त्यांचा संपूर्ण नायनाट करण्याच्या कोणत्याही योजनेत ते आनंदाने सहभागी होतील." स्वतःचे अनेक गुन्हे भिल्लांच्या नावावर खपवून त्यांना सरकारदरबारी बदनाम करण्याची एक रीतसर मोहीमच ह्या लोकांनी उघडली असावी असा संशय तो प्रकट करतो. भिल्लांचा उद्रेक इंग्रजांविरुद्ध नसून एका नव्या समाजव्यवस्थेविरुद्ध होऊ लागला. इंग्रज अमदानीत नव्याने पुढे आलेल्या वर्गाने भिल्ल, कोळी इ. आदिवासींना समाजव्यवस्थेतून प्रयत्नपूर्वक हद्दपार केले आणि नव्या भांडवलशाही समाजरचनेला स्थैर्य प्राप्त करून देण्याचा प्रयत्न केला. १८५० पर्यंत चाललेल्या या उद्रेकांना रेल्वेच्या आगमनाने अधिक तीव्रता प्राप्त झाली. रेल्वेसाठी जी जंगलतोड झाली तिच्याविषयी स्वतः इंग्रजांनीच विषादाने उद्गार काढले आहेत. (पहा. गॅझेटियर ऑफ बॉम्बे., खानदेश १८८१) जंगल कंत्राटदारांच्या जुलूमामुळे जंगलवासी भिल्लांपुढे एक नवेच संकट उभे राहिले. त्यांचे जंगलावरचे अस्तित्वही आता संकटात आले. त्यामुळे त्यांच्या उद्रेकांना एक नवे परिमाण निर्माण झाले. मर्यादित शेतकरी व मर्यादित जंगलवासी या त्यांच्या दोन्ही अस्तिवांवर गदा आली. पारंपरिक समाज व अर्थ रचनेत त्यांच्या या दोन्ही व्यक्तित्वांना वाव होता. पण नव्या व्यवस्थेत त्यांचे हे दुहेरी अस्तित्व लयाला गेले. उरले ते केवळ अस्तित्व टिकवण्याची धडपड करणारे आदिवासी, इंग्रज सरकारच्या सहानुभूतीशून्य कायदेकानूच्या पकडीत ते पकडले गेले आणि कागदोपत्री एक गुन्हेगारी जमात म्हणून त्यांच्यावर टिळा लागला.

या जंगली लोकांना सुसंस्कृत करण्याचे तत्कालीन समाजाचे व शासनाचे प्रयत्न फारसे यशस्वी झाले नाहीत. याचे एक कारण म्हणजे तत्कालीन समाजाने वापरलेला सांस्कृतिक दृष्टिकोण. हा समाज असंस्कृत आहे ह्या भावनेनेच

त्यांच्याकडे पाहिले गेले. मुळातच भारतीय समाजाची सांस्कृतिकता एका वर्गाच्या संस्कृतीशी निगडित केली गेली होती. भारतीय संस्कृती म्हणजे वेदांची, उपनिषदांची, आर्यांची आणि परिणामी उच्च वर्णीयांची संस्कृती असे समीकरण केवळ भारतीयच नव्हे तर सुशिक्षित इंग्रजही करीत असत. या समीकरणात या उच्चभ्रू संस्कृतीच्या परिघावर असलेल्या समाजघटकांची मोजदाद नव्हती. त्यामुळे सांस्कृतिकदृष्ट्या त्यांना बाहेर ढकलणे शक्य होते. मध्ययुगीन जीवन हे जास्त समावेशक होते. कदाचित या घटकांची आर्थिक आवश्यकता त्या काळात जास्त असेल. परंतु आधुनिक काळात ती गरज मध्यवर्ती शासन व कामगारवर्ग पुरी करू शकला. त्यामुळे हे घटक दूर फेकले गेले.

आदिवासी समाजाकडे आधुनिकता आली ती अशी नकारात्मकतेने. सहानुभूतीशून्य शासन, सहृदयता आटलेला समाज, आर्थिक शोषण या सगळ्यांचा बळी होण्याचे दुर्दैव या समाजघटकाच्या वाट्याला आले. परंपरा आणि नवता यांचा संघर्ष त्यांच्या जीवनात आशयबद्ध गतिमानता घेऊन आला नाही तर एका अर्थी शून्यता घेऊन आला. या संघर्षाला सामोरे जाण्याची ताकद त्यांच्या परंपरेत नसेलही. परंतु आपल्यापरीने हा तिढा सोडविण्याचा प्रयत्न त्यांनी केला. त्यांच्या या संघर्षात्मक प्रयत्नातच त्यांच्या आधुनिकतेची बीजे पेरलेली होती.

आधुनिक काळातील आदिवासी इतिहासाची मांडणी मध्यमवर्गीय संदर्भ सोडून करणे आवश्यक आहे. कुठल्याही इतिहासाच्या मांडणीत सामाजिक मूल्यांची एक चौकट अभिप्रेत असतेच. परंतु ही चौकट म्हणजे पूर्वग्रह असता कामा नये. ज्या वेळेस इतिहासकार आपल्या चौकटीचा गुलाम होतो त्या वेळेस त्याची इतिहासकार म्हणून उपयुक्तता संपते. शेवटी प्रत्येक चौकट म्हणजे एक साधनच असते, साध्य नसते. त्या चौकटीत न बसणारे सगळे काही त्याज्य असते हा अभिनिवेश झाला, विवेक नाही. इतिहासकाराचे कार्य हे समजावून घेणे आणि समजावून देणे हेच असते. न्याय-निवाडा करणे शक्य असते, समजावून घेणे नाही. आधुनिक काळाच्या विविध मूल्याधिष्ठित चौकटीच्या प्रभावाखाली जर इतिहासकार आपली सहृदयता गमावून बसला तर तो एक संगणक यंत्र होईल, माणूस उरणार नाही. आणि शेवटी इतिहास म्हणजे माणसाचा माणसाने माणसांसाठी लिहिलेला आलेख असतो हे विसरता येत नाही.

•

## मंडळ वृत्तान्त

# थाळनेर येथे पुरातत्त्वीय उत्खनन

धुळे जिल्ह्यातील थाळनेर हे गाव इतिहासप्रसिद्ध असून मध्ययुगात फारुकी वंशाची येथे राजधानी होती. थाळनेर हे तापी नदीच्या काठी वसलेले असून पश्चिमेकडे गावाला लागूनच पुरातन किल्ला आहे. फारुकींच्या अगोदर म्हणजे साधारणपणे तेराव्या शतकात थाळनेर शहर अहिरांचे किंवा गवळी राजांचे सेनाधिकारी जावजी आणि गावजी यांच्या कारकीर्दीत भरभराटीस आले. इ.स. १३७० च्या सुमारास फिरोजशहा तुघलकने मलिक राजा फारुकी यास गुजराथच्या दक्षिण सरहद्दीवरील प्रदेश म्हणजे आजचा बहुतांशी खानदेश जागीर म्हणून दिला. मलिक राजा फारुकीने थाळनेर हे ठिकाण आपले केन्द्र म्हणून निवडले. खानदेशामध्ये फारुकींची राजवट सोळाव्या शतकाच्या अखेरीपर्यंत होती. इ.स. १६०० मध्ये मुघल सम्राट अकबरने फारुकींचा पराभव करून त्यांचे राज्य नष्ट केले. या घटनेबरोबरच मुघलांचा दक्षिणेत प्रवेश झाला. मुघल काळातही थाळनेर हे महत्त्वाचे ठिकाण असून सुरत-बऱ्हाणपूर मार्गावरील महत्त्वाचे व्यापारी केन्द्र होते अशी माहिती १६६० मध्ये टॅव्हर्नियरने दिलेली आढळते. उत्तर मराठेशाहीत होळकरांची सत्ता थाळनेर भागावर प्रस्थापित झाली. १८१८ मध्ये इंग्रजांनी मराठेशाहीचा शेवट केल्यानंतर इतर भागाप्रमाणे थाळनेरवर इंग्रजांची सत्ता प्रस्थापित झाली. १९४७ मध्ये भारताला स्वातंत्र्य प्राप्त होईपर्यंत महाराष्ट्रातील इतर प्रदेशाप्रमाणे थाळनेरही पारतंत्र्यात होते. स्वातंत्र्योत्तर काळात भारताची, महाराष्ट्राची चौफेर प्रगती होत आहे. थाळनेर मात्र दुर्लक्षित व उपेक्षित राहिले आहे.

दोन वर्षांपूर्वी आम्ही थाळनेर येथील फारुकींच्या कबरी पाहण्यासाठी गेलो असताना तापी नदीच्या काठी असलेल्या पुरातन किल्ल्याची पाहणी केली. त्या वेळी असं लक्षात आले की किल्ल्यातील उंचवट्याच्या भागात उत्खनन केल्यास मध्ययुगीन थाळनेरच्या इतिहासावर नवा प्रकाश पडू शकेल. त्यानुसार आम्ही महाराष्ट्र शासनाच्या व केन्द्र शासनाच्या पुरातत्त्व विभागाकडे उत्खननास परवानगी मिळविण्यासाठी विनंती-अर्ज केले. आनंदाची गोष्ट म्हणजे केन्द्र सरकारच्या पुरातत्त्व विभागाने इ.वि.का. राजवाडे संशोधन मंडळास थाळनेर येथे पुरातत्त्वीय

उत्खनन करण्यास परवानगी दिली. महाराष्ट्र शासनाच्या पुरातत्त्व विभागाने उत्खननासाठी सर्व प्रकारचे सहकार्य देण्याचे मान्य केले. केन्द्र सरकारच्या पुरातत्त्व विभागाने डॉ. अ.प्र. जामखेडकर, संचालक, पुरातत्त्व विभाग, मुंबई व डॉ. प्र. न. देशपांडे चिटणीस, इ.वि.का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे या दोघांची थाळनेर येथील उत्खननासाठी संचालक म्हणून नेमणूक केली.

३ जून १९८५ पासून राजवाडे संशोधन मंडळ व महाराष्ट्र शासनाचा पुरातत्त्व विभाग यांच्या विद्यमाने थाळनेर येथे पुरातत्त्वीय उत्खननास प्रारंभ करण्यास आला. धुळे जिल्ह्यातील पुरोगामी विचारसरणीचे सुप्रसिध्द नेते श्री. व्यंकटराव रणधीर यांच्या हस्ते उत्खननाचा मुहूर्त करण्यात आला. २५ जून १९८५ पर्यंत उत्खनन चालू होते. पावसाळ्याला प्रारंभ झाल्यामुळे उत्खननाचे पहिले सत्र संपवण्यात आले. केन्द्रसरकारच्या पुरातत्त्व विभागाची मंजुरी मिळाल्यानंतर उत्खननाचे दुसरे सत्र ऑक्टोबर-नोव्हेंबर १९८५ पासून सुरु करण्याचे योजिले आहे.

उत्खननात सापडलेल्या वस्तुंची व खापरांची वर्गवारी करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. उत्खननाविषयी सविस्तर वृत्तांत यथावकाश देण्यात येईल उत्खनन सुरु असताना राजवाडे संशोधन मंडळाचे अध्यक्ष माननीय श्री. शिवाजीराव भावे कार्याध्यक्ष श्री. बाळासाहेब मुंदडे, राजवाडे बँकेचे चेअरमन श्री. नामदेवराव गायकवाड, पत्रकार श्री. म. वि. कुलकर्णी, राजवाडे मंडळाचे श्री. देवगुरुजी, श्री. जगदीश पळशीकर, श्री. कार्ले, श्री. भागवत इत्यादींनी उत्खनन स्थळाला भेट दिली. पुरातत्त्व विभागाचे संचालक डॉ.अ. प्र. जामखेडकर व राजवाडे मंडळाचे चिटणीस डॉ. प्र. न. देशपांडे, यांनी उत्खननाचे मार्गदर्शन केले. पुरातत्त्व विभागाचे श्री. शं. पु. साठे, श्री. चेतन साळी, श्री.लाटे, श्री. कुलकर्णी, श्री. रोकडे, इत्यादींनी उत्खननकार्यात सहभाग घेतला तर राजवाडे मंडळाच्या वतीनं सौ. विजया देशपांडे, कु. सुनंदा अहिरे प्रभृतींनी सहभाग घेतला.

## थाळनेर येथील उत्खनन

१९८५-८६ या वर्षातही थाळनेर येथील पुरातत्त्वीय उत्खनन पुढे चालू ठेवण्यासाठी राजवाडे संशोधन मंडळाने केन्द्रीय पुरातत्त्व विभागाकडे परवानगी मागितली. या उत्खननप्रकल्पाला पुरातत्त्व विभागाची नुकतीच मान्यता आलेली असून महाराष्ट्र शासनाच्या पुरातत्त्व विभागाच्या सहकार्याने हे उत्खनन साधारणत: जानेवारी १९८६ मध्ये सुरू करण्यात येणार आहे. या उत्खननासाठी मानद संचालक म्हणून राजवाडे इतिहास संशोधन मंडळाचे मुख्य चिटणीस डॉ. प्र. न. देशपांडे आणि महाराष्ट्र शासनाच्या पुरातत्त्व खात्याचे संचालक डॉ. अ. प्र. जामखेडकर यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

•

## मंडळ वृत्तांत

# राजवाडे संशोधन मंडळाचे प्रकल्प

## प्रकल्प १ : हस्तलिखितांची सूची

सौ. विजया देशपांडे • कु. सुनंदा अहिरे

इतिहासाचार्य विश्वनाथ काशीनाथ राजवाडे संशोधन मंडळाचे संग्रही काही हस्तलिखितांची आणि मोडी कागदपत्रांची दप्तरे आहेत. यापैकी ६,००० हस्तलिखिते आणि २०,००० मोडी लिपीची कागदपत्रे आहेत. ६ हजार हस्तलिखितांमध्ये मराठी काव्ये, मराठी स्फुट काव्ये, संस्कृत हस्तलिखिते, मंत्रतंत्रविद्या, धार्मिक पोथ्या, हिंदी काव्य, धार्मिक पोथ्या, औषधाचे बाड, हिंदीगुजराथी मारवाडी भाषेची हस्तलिखिते आहेत. या सर्व हस्तलिखितांची एकूण ८५ दप्तरे आहेत. दप्तर क्र. ६० मध्ये बारामतीकर काळे दप्तर, पातशाही सुभ्यांच्या तनखा, सारिका शतक, अर्थशास्त्र पोथ्यांच्या लिखाई, पत्रे याद्या वगैरे पत्रव्यवहार आहे. दफ्तर क्र. ६२ मध्ये समाजशास्त्र, आडनावाचा इतिहास, श्रीवर्धन येथील पेशव्यांच्या देशमुखी वतनाचे खरेदीखत, पेशव्यांचे आज्ञापत्र, फारशी व मोडीपत्रे ऐतहासिक पत्रे आहेत. दफ्तर क्र. ७० मध्ये देउसकर संबंधी, वाई येथील शंकर लक्ष्मण वैद्य यांचेकडील कागदपत्रे, कै. गोपाळ हरी देशमुख यांचे अक्षरातील ऐतहासिक कागद, बारामतीकर काळे दफ्तर, सातारचे प्रतापसिंह महाराज यांच्या दफ्तरातील याद्या, ताराबाईची काही पत्रे, नाना फडणीसाच्या दत्तकाचा अर्ज इ. हस्तलिखिते आहेत. दफ्तर क्र. ११ मध्ये एकूण ६८७ हस्तलिखिते असून यात सात पुडके वेगवेगळी बांधलेली आहेत. या दफ्तरात प्रामुख्याने बारामतीकर काळे दफ्तर, ऐतिहासिक कागदपत्रांच्या नकला, मराठी इतिहास आज्ञापत्र, व्यवहार कर्जरोखे, जबान्यापत्रे, गगाबाई अजरवालीच्या दत्तकाचे कागद इ. आहेत.

याशिवाय वाईचे त्र्यंबकशास्त्री भट (भट घराणे) यांची एकूण ३,८१८ (तीन हजार आठशे अठरा) इतकीं कागदपत्रे आहेत.

या सर्व हस्तलिखितांची सूची करण्याचे काम पूर्ण झाले आहे. सूची करतांना हस्तलिखित क्रमांक, हस्तलिखिताचे नाव, एकूण पत्रसंख्या, शब्दसंख्या, अक्षरसंख्या स्पष्ट करण्यात आले आहे. याशिवाय, पत्रांचा आकार (लांबी रुंदी) रचनाकार, लेखनकार, लेखनकाळ कॉलमव्दारे स्पष्ट केलेले आहे. विशेष म्हणजे प्रत्येक पानावर किंवा पत्रावर जे वैशिष्ट्यपूर्ण उल्लेख आलेले आहेत, ते 'विषय संक्षेप' या शेवटच्या

कॉलममध्ये स्पष्ट करण्यांत आलेले आहे. उदा. 'अभंगाचे बाड' या नावाचे हस्तलिखित असून या बाडांत अनेक रचनाकारांनी काव्ये लिहिलेली आहेत. ती स्वतंत्रपणे नेमक्या कोणत्या पत्रक्रमांकावर आलेली आहेत तेही कॅटलॉगमध्ये स्पष्ट करण्यांत आलेले आहे. हस्तलिखिताच्या शेवटी प्राप्तकर्ता किंवा लेखनकर्ता यांची नावे व लेखनकाळ बारकाईने तपासून ते कॅटलॉगमध्ये नमूद करण्यात आलेले आहे. याशिवाय हस्तलिखिताचे अक्षर आणि त्याची अवस्था स्पष्ट केलेली आहे.

मोडीलिपीमध्ये मराठी गद्य अर्थातच बखर वाङमयाची स्वतंत्र दफ्तरे आहेत. या दफ्तरांमध्ये अंताजी माणकेश्वर यांची बखर पत्रे ४३ पूर्ण, नागपूर भोसले यांच्या दोन स्वतंत्र बखरी, छत्रपती राजाराम महाराजांची बखर - दुर्मिळप्रत - कर्ता मल्हार खंडेराव चिटणीस पत्रे १७, यक्ष प्रश्नांची बखर पत्रे १६६, भाऊसाहेबांची कैफियत बंद ३८, प्रल्हादाची बखर पत्रे ५, रायगडची हकीगत पत्रे ७, रामदास स्वामींची बखर - कर्ता हनुमानस्वामी बंद १५२, शालीवाहन बखर त्रुटीत पत्रे १३, शिवाजीची सभासदी बखर बंद ७६ इ. आहेत.

छत्रपती शिवाजीमहाराजांच्या बखर वाङमयात '१०९ कलमी बखर' नव्याने संशोधीत केलेली आहे. याशिवाय मराठी कोश, मराठी याज्ञीकि ग्रंथ, छापील मराठी दुर्मिळ ग्रंथ, माहात्म्य, कामशास्त्र, भूगोल, अंकगणित, जमाखर्च, भूमिती इ. विभागातील हस्तलिखितांचे सूचीचेही काम पूर्ण करण्यात आलेले आहे.

## प्रकल्प २ : मोडी कागदपत्रांची सूची

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळाच्या संग्रही मोडी कागदपत्रांची दफ्तरे आहेत. प्रारंभी या सर्व दफ्तरातील कागदपत्रांची मोजणी करण्यात आली. ही कागदपत्रे सुमारे २०,००० ( वीस हजार ) आहेत. त्यांची एकूण ९० दफ्तरे आहेत.

या ९० दफ्तरातील प्रत्येक दफ्तराची छाननी करण्यात आली.या छाननीमध्ये शासकीय स्वरूपाची कागदपत्रे (राजकीय), न्यायविषयक कागदपत्रे, धार्मिक आणि आर्थिक, जमाखर्चाची कागदपत्रे, सनदापत्रे, आज्ञापत्रविषयक कागदपत्रे, विनंतीविषयक कागदपत्रे, विविध कागदपत्रे, (कोणी कोणास लिहिली हा मजकूर नसलेली) जबानी पत्रे, पुरवणी पत्रे इ. विविध विभागांची कागदपत्रे आहे. या कागदपत्रांना विभागाप्रमाणे रॅपर लावून, नावे टाकून स्वतंत्र बांधली आहेत.

प्रत्येक दफ्तरात साधारणपणे १५० ते ३००पर्यंत कागदपत्रे आहेत.

प्रत्येक दफ्तरातील कागदपत्रांची सूची तयार करताना पत्र कोणी कोणास लिहिले, तारीख ( सुहुर सनाची ) इ.स. प्रमाणे तारीख काढणे, पत्र अस्सल आहे का नकलेच्या स्वरूपात आहे हे कॅटलॉगमध्ये स्पष्ट करण्यात आलेले आहे. याशिवाय विषयसंक्षेप स्पष्ट केला आहे. विशेष म्हणजे प्रत्येक पत्राला लाल शाईत नवीन क्रमांक देऊन सांकेतिक भाषेत स्पष्ट केले आहे. उदा. र ।बा । २५ -रघुनाथ

बाजीराव क्र. २५, वि । प २० - विविध पत्रे २०, म । क ४०- महिपतराव कचेश्वर ४० येणेप्रमाणे लिहिले आहे.

आतापर्यंत तीनहजार ( ३,००० ) कागदपत्रांची सूची किंवा कॅटलॉगिंग पूर्ण करण्यात आलेले आहे. यामध्ये राजवाडे खंड १ ला, राजवाडे खंड ३ रा, यातील अस्सल कागदपत्रांची सूची तयार करण्यात आली आहे. याशिवाय दफ्तर क्र. १ छत्रपती प्रतापसिंह राजे भोसले, एकूण कागदपत्रे २००, दफ्तर क्रमांक ४३, एकूण पत्रे १८०, दफ्तर क्र. ७६ एकूण पत्रे ३००, अशा बऱ्याच दफ्तरातील कागदपत्रांच्या सूचीचे काम पूर्ण झाले असून राहिलेल्या दफ्तरांचे काम नियमीत सुरू आहे.

मोडी कागदपत्रांमध्ये अप्रकाशित असलेली कागदपत्रे 'संशोधक' या राजवाडे मंडळाच्या त्रैमासिकामधून प्रकाशित करण्यात येतात. आतापर्यंत 'किल्ल्याचा झाडा', 'छावणीचा नकाशा', 'विठ्ठल शिवदेव विंचूरकर याचे अप्रकाशित पत्र', 'मराठेशाहीतील प्रधानांचे अधिकार आणि मानपान आणि परंपरा', 'आठरा टोपीकर' इत्यादी अप्रकाशित कागदपत्रे प्रकाशित केली आहेत 'चिटनीसी कलमे' असणारे बाड प्रकाशित करण्याची संकल्पना आहे.

## मंडळ वृत्त

## प्रा. अरविंद पाठक यांचेकडून राजवाडे मंडळास हस्तलिखितांची भेट.

प्रा. अरविंद पाठक यांचेकडे वडिलोपार्जित हस्तलिखित पोथ्यांचा संग्रह होता. या पोथ्यांचा उपयोग इतिहास संशोधन मंडळास होईल हे लक्षात घेऊनच प्रा. पाठक यांनी सर्व पोथ्यांची बाडे आणि अन्य हस्तलिखिते इ.वि.का.राजवाडे संशोधन मंडळास भेट देण्याचा निर्णय घेतला. ३० जून १९८५ रोजी प्रा. अरविंद पाठक स्वत: सर्व दफ्तरे घेऊनच राजवाडे मंडळात आले आणि त्यांनी बाडे आणि हस्तलिखिते मंडळाचे मुख्य चिटणीस डॉ. प्र. न. देशपांडे यांच्या स्वाधीन केली. त्या वेळी पुरातत्त्व विभागाचे संचालक डॉ. अ. प्र. जामखेडकर हे उपस्थित होते.

प्रा. अरविंद पाठक यांनी मंडळास भेट दिलेल्या ६० हस्तलिखितांमध्ये हेमाद्रि प्रयोग, ऐरिणी प्रार्थना, पांडव प्रताप, रामविजय, हरिविजय, नारदी संहिता, वाज संहिता इत्यादी महत्त्वपूर्ण हस्तलिखिते आहेत. हरिविजय पोथीच्या हस्तलिखितामध्ये प्रत्येक अध्यायाच्या प्रारंभी रंगीत व कलापूर्ण चित्रे काढलेली आहेत. शिला प्रेसवर छापलेल्या काही पोथ्याही प्रा. पाठक यांनी मंडळास दिलेल्या असून त्यामध्ये 'त्र्यंबक माहात्म्य' आणि 'गोदा माहात्म्य' या दोन पोथ्या दुर्मिळ व महत्त्वाच्या आहेत.

डॉ.प्र. न. देशपांडे व डॉ. जामखेडकर यांनी सर्व हस्तलिखितांची पाहाणी करून ऐरिणी प्रार्थनेसारख्या अप्रकाशित काव्याचे अधिक संशोधन होण्याची आवश्यकता प्रतिपादन केली.

राजवाडे मंडळाच्यावतीने डॉ. देशपांडे यांनी प्रा. पाठक यांना धन्यवाद दिले.

प्रा. श्री. अरविंद पाठक मालेगाव यांचेकडन खालील हस्तलिखिते राजवाडे संशोधन मंडळास मिळाली.

(१) हरिविजय ( प्रत्येक अध्यायास चित्रे आहेत. )
(२) रामविजय, हस्तलिखित आहे.
(३) श्रीमद्भागवत, शिळा प्रेस छापील.
(४) देवी माहात्म्य, जीर्ण पोथी
(५) पदपाठाची पोथी, जीर्ण जुनी पोथी.
(६) महिम्नस्तोत्र पोथी, शिळाप्रेस.
(७) गुरुचरित्र, शिळाप्रेस, पोथी
(८) त्र्यंबक माहात्म्य, शिळाप्रेस
(९) दिवाकरकृत दान चंद्रिका.
(१०) गोदा माहात्म्य, ( १७६९-७८-१८५७ ) शिळाप्रेस
(११) ऋषीपंचमी कथा
(१२) फलज्योतिष (अपूर्ण)
(१३) सोळा सोमवार कथा
(१४) वैश्वदेव प्रयोग
(१५) शांती पाठ
(१६) संस्कार भास्कर ( अपूर्ण )
(१७) पंचांगे (२०)
(१८) शिवगीता, शिळाप्रेस.
(१९) गृह्यसूत्रे (२०) सहस्रदेव.
(२१) संहिता, हस्तलिखित पूर्ण असलेली.
(२२) रामविजय
(२३) पांडवप्रताप, हस्तलिखित पूर्ण पोथी
(२४) रामविजय, हस्तलिखित.
(२५) भक्तिविजय, (शिळाप्रेस)
(२६) नारदीसंहिता, (हस्तलिखित)
(२७) एक अपूर्ण असलेली पोथी (शिळाप्रेस)

(२८) अभंग
(२९) ऊपाकर्ण (हस्तलिखित)
(३०) हेमाद्रि प्रयोग („)
(३१) पुरुषसुक्त
(३२) शांतीपाठ (हस्तलिखित)
(३३) एक अपूर्ण हस्तलिखित पोथी
(३४) ऐरिणी प्रार्थना हस्तलिखित.
(३५) वंशवृवर्णम्, हस्तलिखित
(३६) स्त्री-गुणक्रमगुणावली (हस्तलिखित)
(३७) पोथ्या (काही अपूर्ण असलेल्या)

**संशोधक त्रैमासिकासंबंधी केंद्र सरकारच्या नियमानुसार द्यावयाची माहिती.**

| | |
|---|---|
| (१) प्रकाशन स्थळ | इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे |
| (२) प्रकाशनाची मुदत | त्रैमासिक |
| (३) मुद्रकाचे नाव | श्री. चिं. स. लाटकर,<br>४६१/४, सदाशिव पेठ,<br>टिळक रस्ता, पुणे ४११०३० |
| (४) प्रकाशकाचे नाव | डॉ. प्र. न. देशपांडे<br>मुख्य चिटणीस, इ.वि.का.राजवाडे<br>संशोधन मंडळी, धुळे |
| (५) संपादकाचे नाव | डॉ. प्र. न. देशपांडे<br>डॉ. मु.ब. शहा, श्री. अतुल जोशी |
| (६) राष्ट्रीयत्त्व व पत्ता | भारतीय चिटणीस,<br>इ.वि.का.राजवाडे<br>संशोधन मंडळ, धुळे |
| (७) मालक व पत्ता | इ.वि.का. राजवाडे<br>संशोधन मंडळ, धुळे |

•

# ' सं शो ध क '

## वर्गणीच्या संदर्भात महत्त्वाचे निवेदन

## आजीव वर्गणीदारांची योजना

' संशोधका 'च्या सर्व जिज्ञासू वाचकांना नम्रपणे कळविण्यात येते की, मार्च १९८५ पासून ' संशोधक ' त्रैमासिकाच्या वार्षिक वर्गणीत नाइलाजाने वाढ करावी लागत आहे. कागद व छपाई यांच्या किंमती एवढ्या बेसुमार वाढत आहेत की, यापुढे केवळ संशोधनाला वाहिलेली मासिके नियमितपणे प्रसिद्ध करणे जिकिरीचे होणार आहे. सरकारकडून अनुदानात भरघोस वाढ झाली तरच संशोधनपर नियतकालिके तरू शकतील.

' संशोधक ' त्रैमासिकाचा प्रत्येक अंक नियमितपणे व वेळेवर प्रकाशित व्हावा यासाठी आम्ही सतत प्रयत्नशील असतो. त्याचप्रमाणे अंकातील साहित्य अव्वल दर्जाचे व मूलगामी संशोधनाला वाहिलेलेच असावे या दृष्टीनेही आम्ही विशेष परिश्रम घेत असतो. तरीपण ' संशोधक ' त्रैमासिक अधिक आकर्षक पद्धतीने निघावे, प्रतसंख्या वाढावी, साहित्यही अधिकाधिक देता यावे यासाठी वगणीत वाढ करण्याचा निर्णय आम्ही घेतला आहे. **मार्च १९८५ पासून ' संशोधक ' त्रैमासिकाची वार्षिक वर्गणी रुपये २५ ( पंचवीस ) ठरविण्यात आली आहे. किरकोळ अंकाची किंमत रुपये ७ ( सात ) राहील.**

त्याचबरोबर आम्हास संशोधकासाठी आजीव वर्गणीदारांची योजना जाहीर करण्यात आनंद होत आहे. **मार्च १९८५ पासून संशोधक त्रैमासिकाचे आजीव वर्गणीदार होण्यासाठी वर्गणी म्हणून केवळ २०० रुपये चेक / ड्रॉफ्ट / म. ऑ. ने पाठवावेत.**

संपादक
' संशोधक ' त्रैमासिक

**फक्त २०० रुपये भरा आणि आयुष्यभर ' संशोधक ' प्राप्त करा.**

# शिरपूर वरवाडे नगरपरिषद, शिरपूर,

( जि. धुळे )

## हाती घेतलेली विकासाची कामे व उपक्रम

१. पाणी-पुरवठ्याची समस्या कायम स्वरूपाने सोडविण्यासाठी रु. २·५ कोटी खर्चाची तापी पाणीपुरवठा योजना.

२. विजयस्तंभ ते कोर्टापावेतो रस्त्याचे डांबरीकरण करणेची रु. ३ लक्ष ११ हजाराची योजना.

३. नगरपरिषदेच्या क्षेत्रातील नागरिकांना नगरपरिषद दवा-खान्यातून विनामूल्य वैद्यकीय सेवेची सिद्धता

४. नगरपरिषद हद्दीतील सर्व रस्त्यांची दररोज चोख साफसफाई ठेवणेची दक्षता.

तरी सर्व नागरिकांना विनंती की, करांची रक्कम विनाविलंब भरावी.

| | | |
|---|---|---|
| सी. व्ही. पाटील<br>मुख्याधिकारी | सुरेशचन्द्र माथुर<br>उपाध्यक्ष | अमरीशभाई पटेल<br>अध्यक्ष |

कृषिपूरक व्यवसाय म्हणून सहकारी दूध व्यवसाय
रुजविणारी व वाढविणारी संस्था

# शिंदखेडा तालुका दूध उत्पादक कृषिपूरक उद्योग सह. संघ लि. दोंडाईचा जि. धुळे

रजिस्टर नं. : डी. एल. ए./पी. आर. डी. (ए.) १११ ऑफ ६८
स्थापना ता. ३०-७-६८

दोंडाईचा फोन नं. : १०२, २०२ नरडाणा फोन नं. : ५८

| | |
|---|---|
| **सभासद संख्या** | १५१ |
| **अधिकृत भांडवल** | ९००,०००/- |
| **भरपाई झालेले भाग भांडवल** | १२,६०,०००/- |

## आमची वैशिष्ट्ये

१) संघाचे २० हजार लिटर क्षमतेचे दोंडाईचा व नरडाणा येथे चिलिंग सेंटर
२) संघाचे मालकीचे ५ रोड टँकर्स
३) संघाचे दूध संकलनासाठी ७ पिंजरा गाड्या
४) वीज पुरवठा बंद पडल्यास दोन्ही सेंटरवर जनरेटर
५) तालुक्यात एक संकरित गो-पैदास केंद्र सुरू झालेले आहे.
६) पाश्चरायझेशन प्लॅण्ट दोंडाईचा येथे सुरू झालेला आहे.
७) राष्ट्रीयीकृत धुळे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून संघामार्फत अल्प अत्यल्प व भूमिहीन शेतमजुरांना दुभती जनावरे, खरेदीसाठी कर्जाची व्यवस्था.

**रंगराव माधवराव पाटील**
व्हा. चेअरमन (माजी आमदार)

**ज. दौ. ऊर्फ दादासाहेब राऊळ**
चेअरमन (एल. एल. बी.)

**पी. जे. सिसोदिया** मॅनेजर (बी. ए.)

## सन्माननीय सभासद

| | |
|---|---|
| श्री विजयसिंह ओंकारसिंह राऊळ | रावजी काशिराम पाटील |
| ंबर झावरू बागल | भिकाजी दामू पाटील |
| पसिंह मानसिंह सिसोदिया | शंकरराव सहादूराव गागरे |
| सिंह आननसिंह राजपूत | पुरुषोत्तम चैत्राम पाटील |
| ानाथ कृष्णा पाटील | हिंमतराव पंढरीनाथ पवार |
| न ढोमण पाटील | प्रदीपकुमार गोविंदभाऊ वाणी |
| राव धर्मा पाटील | जिल्हा दुग्धविकास अधिकारी, धुळे |

|| श्री विश्वनाथो विजयते ||

# राजवाडे मंडळ प्रकाशने

## मंडळाकडे विक्रीसाठी उपलब्ध असलेल्या ग्रंथांची यादी

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. राजवाडे मराठी धातू कोश | पृष्ठे | ३७० | रुपये | ३० |
| २. राजवाडे नामादी व्युत्पत्ती कोश | ,, | ३५० | ,, | ३० |
| ३. समर्थ शिवाजी अन्योन्य संबंध ( भा. रा. भट ) | ,, | १०९ | ,, | ०५ |
| ४. ज्ञानेश्वरीच्या नवव्या अध्यायाचे संस्कृत रूपांतर ( वि. का. राजवाडे ) | ,, | १८३ | ,, | ०७ |
| ५. राजस्थान महाराष्ट्र संघर्ष ( शु. पु. जोशी ) | ,, | ३०० | ,, | १२ |
| ६. राजवाडे चरित्र ( भा. वा. भट ) | ,, | ६३२ | ,, | ५० |
| ७. मराठ्यांच्या इतिहासाची साधने ( मो. रा. जोशी ) | ,, | ६६० | ,, | ५० |
| ८. ऋग्वेदातील ज्योतिषमूलक कालनिर्णायक गमके | ,, | १०० | ,, | ०७ |
| ९. संस्कृत भाषेचा उलगडा ( वि. का. कुळकर्णी ) | ,, | २१० | ,, | १० |
| १०. जानकी सैंवर ( सं. द. रा. भट ) | ,, | २८८ | ,, | २० |
| ११. आज्ञापत्र ( ऑफसेट प्रिंट ) मूळ हस्तलिखित | | | ,, | २० |
| १२. अमृतानुभव ( ऑफसेट प्रिंट ) मूळ हस्तलिखित | | | ,, | ४१ |
| १३. योगचिंतामणी ( ऑफसेट प्रिंट ) | | | ,, | ४१ |
| १४. वेडिया नागेश ( सं. डॉ. मु. ब. शहा ) | | | ,, | १० |
| १५. छत्रपतींची १०९ कलमी बखर ( सं. डॉ. प्र. न. देशपांडे ) | | | ,, | १० |
| १६. ज्ञानेश्वरी पदकोश ( श्री. शिवाजीराव भावे ) | | | ,, | १०० |
| १७. संशोधक, " सुवर्ण महोत्सवी अंक " | पृष्ठे | ३०० | ,, | ४० |

## विक्रीसाठी ठेवलेले इतर ग्रंथ

| | | | | |
|---|---|---|---|---|
| छ. शिवाजी महाराजांची पत्रे ( डॉ. प्र. न. देशपांडे ) | ,, | ३०० | ,, | ६५ |

**विशेष सवलत :** वरील १८ पुस्तकांचा संच किंमत रु. ५४८ चा केवळ रु. ४०० ला मिळेल. २ अगर अधिक ग्रंथ घेणाऱ्यास १५ टक्के कमिशन. काही ग्रंथांच्या प्रती अगदीच मर्यादित – टपाल खर्च वेगळा लागेल.

**' संशोधक ' त्रैमासिक :** इतिहास संस्कृती संशोधनाला वाहिलेले दर्जेदार त्रैमासिक गेली ५३ वर्षे प्रकाशित होत आहे. वार्षिक वर्गणी फक्त रु. २५|– प्रत्येक अंक किंमत रु. ७|– ५२ वर्षांतील उपलब्ध असलेल्या सर्व अंकांचा संच केवळ रु. ३००|– त उपलब्ध. ( त्यात सुवर्णमहोत्सवी अंक ४० योगचिंतामणी रु. ४१|– आज्ञापत्र रु. २०|– समाविष्ट )

**' संशोधक ' त्रैमासिकाची तहहयात वर्गणी फक्त रु. २००.**

**मुख्य चिटणीस,**

इ. वि. का. राजवाडे संशोधक मंडळ, धुळे ४२४००१

# कृषि उत्पन्न बाजार समिती, दोंडाईचे

## ता. शिंदखेडा, जि. धुळे

मुख्य बाजार दोंडाईचे
फोन नं. ८, ५१ आणि ८१

दुय्यम बाजार – (१) नरढाणा, फोन नं. ३४
(२) शिंदखेडा, फोन नं. ३२
(३) बेटावद, पी. सी. ओ.

### खास वैशिष्ट्ये

§ भव्य, प्रशस्त, आकर्षक व अद्ययावत सर्व सुखसोयींनी युक्त असे बंदिस्त बाजार आवार § दरसाल दुय्यम बाजारासह ६ लाख क्विंटल निरनिराळ्या शेतीमालाच्या उलाढालीचे केंद्र. सुमारे ९ ते १० कोटी रुपयांची वार्षिक उलाढाल § नियंत्रित शेतीमालाची मालधन्याचे समक्ष त्याचे संमतीने उघड लिलावाने विक्री; लायसेन्सड् मापाड्याकरवी त्वरित चोख वजनमापाची सोय, कर्मचाऱ्यांची कार्यक्षम देखरेख, आडत, मापाई, हमाली वगैरेचे अधिकृत निश्चित दर § मालविक्रीची रक्कम त्वरित मिळणेची सोय § अनधिकृत कपातीस अगर सुटीस बंदी, भेसळ मालाला प्रतिबंध § स्वच्छ व निर्भेळ माल आणण्यासाठी व शेतीमालाचे प्रतवारीसंबंधी प्रचार § दररोजच्या बाजारभावाची रेडिओवर व स्थानिक वर्तमानपत्रात प्रसिद्धी §वांध्याचा त्वरित निकाल § माल साठविणेसाठी वेअरहाऊसिंग कार्पोरेशनची व इतर सुसज्ज गुदामे § रेल्वेलाईन यार्डालगत तार-टपाल बँकांच्या व टेलिफोन, वीज इत्यादी सोयींनी परिपूर्ण § भरपूर दूध देणाऱ्या जर्सी, होस्टीन, सईवाल, गीर व थारपारकर गाईंचे तसेच जाफर, सुरती, म्हैसाणा इत्यादी म्हशींचे उत्तर महाराष्ट्रातील सर्वांत मोठे व सुप्रसिद्ध विक्री केंद्र § हजारो शेतकरी व व्यापारी याबाबत मार्केटचा फायदा घेतात.

**मा. विठ्ठलसिंग देविसिंग गिरासे**
उपसभापती

**मा. जिजाबाराव पुंडलीक पाटील**
सभापती

### कमिटीचे माननीय सभासद

मा. आमदार रंगराव माधवराव पाटील
मा. वसंतराव धर्मा पाटील
मा. संभाजी भादू पाटील
मा. रघुनाथसिंह रेतनसिंह गिरासे
मा. रमेशचंद्र मुरलीधर लखोटे
मा. राजेंद्र निळकंठराव सिसोदे
मा. रामदास रावजी पाटील
डॉ. हेमन्त भास्कर देशमुख
दोंडाईचे वरवाडे नगरपरिषद
मा. केशव हरी पाटील
मार्केट उपसचिव

मा. यशवंतराव दगाजी पाटील
मा. चिंधा रामचंद्र देसले
मा. अर्जुन ढोमण वारुडे
मा. आसाराम बळीराम महाजन
मा. नानकराम सतरामदास रूपचंदाणी
मा. मंगलसिंग निमजी राजपूत ऊर्फ
ठाणसिंग जिभाऊ
मा. डी. एम. पाटील
असिस्टंट रजिस्ट्रार, शिंदखेडा
मा. तुकाराम सुकलाल वाघ
मार्केट सचिव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, दोंडाईचे**

# शहादा तालुका दूध उत्पादक व कृषिपूरक उद्योग सह. संघ, लि. शहादा जि. धुळे

फोन नं. : ७१, १७०    ऑडिट वर्ग ' अ '

| | | |
|---|---|---|
| **अधिकृत भाग भांडवल** | : | **रु. १५/– लाख** |
| **भरपाई झालेले भाग भांडवल** | : | **रु. २०३१९००/–** |
| **वर्षात गोळा केलेले दूध लिटर** | : | **१००७७७०५ लिटर्स** |
| **नफा ता. ३०।६।८५ चा** | : | **रु. ११५७१/–** |

संघाजवळ चार रोड मिल्क टँकर्स असून दूध कलेक्शनसाठी ६ ट्रक्स् संघाच्या स्वतःच्या मालकीच्या आहेत.

तालुक्यातील भूमिहीन आदिवासी शेतमजूर, अल्पभूधारक व दुर्बल घटक यांना शासकीय अनुदानासहित दुभत्या गाई मोठ्या प्रमाणात उपलब्ध करण्याचे सतत प्रयत्न संघ करीत आहे.

तालुक्यातील अनेक दुर्लक्षिलेल्या जंगल भागात आदिवासींना संघटित करून त्यांच्या प्राथमिक सहकारी दूध उत्पादक सोसायट्या स्थापनेसाठी संघाचे प्रयत्न चालू आहेत व आज अखेर ३५ आदिवासींच्या सोसायट्या स्थापन करून संबंधित सभासदांना दुभत्या गाई मिळवून देऊन त्यांचे संसारात आर्थिक हातभार लावण्यास संघ सिद्ध आहे.

**अॅड. हिंमतराव नारायण पाटील**
व्हा. चेअरमन

**तुकाराम रामदास पाटील**
चेअरमन

**माणिकराव नथु सैंदाणे**
मॅनेजर

**संचालक मंडळ**

| | | |
|---|---|---|
| मोतीलाल फकिरा पाटील | सुभाष बुला पाटील | भारत रतिलाल पाटील |
| शिवदास मदन पाटील | दत्तु सदाशिव पाटील | सत्तरसिंग जाधव भामरे |
| विजयसिंह रामसिंह गिरासे | बी. के. रघुवंशी | अशोक सदाशिव पाटील |
| ( स्वीकृत ) | ( बँक प्रतिनिधी ) | ( कर्मचारी प्रतिनिधी ) |

# नवापूर नगरपालिका, नवापूर, जि. धुळे

आपल्या शहराच्या विकासासाठी नागरिकांनी नगरपालिकेचे कर वेळेवर भरून सहकार्य करावे.

आपल्या शहर-स्वच्छतेसाठी व आरोग्य-रक्षणासाठी केरकचरा कुंडीत टाकावा.

कुटुम्ब नियोजनाच्या राष्ट्रीय कार्यासाठी नगरपालिकेस सहकार्य करावे.

राष्ट्रीय वनसंपत्तीचे संरक्षण करून सामाजिक वनीकरणात सहभाग घेऊन नगरपालिकेस सहकार्य द्यावे.

जन्म-मृत्यूची नोंद करून राष्ट्रीय कार्यास हातभार लावावा.

जकात कर वेळीच भरून नगरपालिकेस सहकार्य द्या.

**के. भा. महाजन**
चीफ ऑफिसर

**विपीनभाई चोखावाला**
अध्यक्ष

नवापूर नगरपालिका, जि. धुळे

# धुळे नगरपालिका, धुळे

( १ ) आपले शहर स्वच्छ व सुंदर बनविण्यात सहभागी व्हा व सहकार्य करा.

( २ ) नगरपालिकेची मालमत्ता ही जनतेची मालमत्ता आहे. ही आपलीच मालमत्ता आहे असे समजून संरक्षण करा. तिचा नाश करू नका.

( ३ ) जकात भरल्याशिवाय कोणताही माल नगरपालिका हद्दीत आयात करू नका.

( ४ ) शहराच्या विकासासाठी लोकोपयोगी कामे त्वरित व्हावीत याकरिता कर वेळेवर भरून सहकार्य करा.

( ५ ) झाडे ही आपली संपत्ती आहे. त्याची जोपासना करावी. झाडे लावून त्यांचे संरक्षण करावे. बेकायदेशीर तोड थांबवा.

( ६ ) कुटुंब कल्याण योजनेची यशस्वी अंमलबजावणी करा.

( ७ ) अल्पबचत करा.

( ८ ) पाण्याचे नळ उपयोगानंतर बंद करा आणि पाणी वाया जाऊ देऊ नका.

**वसंत सुदाम सोनार ( पिंगळे )**
अध्यक्ष
धुळे नगरपालिका, धुळे